# वार्तापत्र

यशवंतराव
चव्हाण प्रतिष्ठान
मुंबई

१०५
वी जयंती







**यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१७**
**सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ पद्मभूषण श्री. मन मोहन शर्मा (एफ.आर.एस.)**





# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१७












# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम. एम. एच. /बी. ओ. एम. – ५३९/८५

यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई – ४०० ०२१.

दूरध्वनी क्रमांक : २२०२८५९८, २२०४५४६० फॅक्स : २२८५२०८१/८२

**➢ विश्वस्त मंडळ सदस्य ➢**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. शिवाजीराव पाटील–निलंगेकर | |
| ७. | मा. श्री. राम प्रधान | |
| ८. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| ९. | मा. श्री. दिलीप वळसे–पाटील | |
| १०. | मा. श्री. अजित निंबाळकर | |
| ११. | मा. श्री. बी. के. अग्रवाल | |
| १२. | मा. श्री. अमित डहाणूकर | |
| १३. | मा. श्री. डॉ. समीर दलवाई | |
| १४. | मा. श्री. ना. धों. महानोर | |
| १५. | मा. सौ. प्रभा कुलकर्णी | |

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६. मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

१७. मा. श्री. एन. जे. जमादार
सचिव व वरिष्ठ विधी सल्लागार

**➢ कार्यकारिणी मंडळ सदस्य ➢**

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. लक्ष्मण माने
१०. मा. श्री. विनायकराव पाटील
११. मा. श्री. के. बी. आवाडे
१२. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१३. मा. श्री. जीवनराव गोरे
१४. मा. श्री. विजय शिर्के
१५. मा. श्री. जयराज साळगांवकर
१६. मा. श्री. गणपतराव अप्पासाहेब पाटील
१७. मा. श्री. राजेश टोपे
१८. मा. श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पां. पाटील
१९. मा. श्री. यशवंतराव गडाख–पाटील
२०. मा. श्री. चंद्रशेखर मारुतराव घुले–पाटील
२१. मा. अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२२. मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

**➢ कार्यकारी समिती ➢**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष | ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष | ६. | मा. श्री. अजित निंबाळकर | विश्वस्त सदस्य |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष | ७. | मा. श्री. जीवनराव गोरे | सदस्य |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस | ८. | मा. श्री. यशवंतराव गडाख–पाटील | सदस्य |

**विभागीय केंद्र**

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कऱ्हाड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पां. पाटील |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | मानद अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| विभागीय केंद्र, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. शेखर निकम |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. अंकुशराव कदम |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. डॉ. जनार्दन वाघमारे |
| विभागीय केंद्र, अमरावती | अध्यक्ष | – |
| जिल्हा केंद्र, अहमदनगर | अध्यक्ष | श्री. यशवंतराव गडाख–पाटील |
| जिल्हा केंद्र, सोलापूर | अध्यक्ष | श्री. गो. मा. पवार |
| जिल्हा केंद्र, अंबाजोगाई (बीड) | अध्यक्ष | डॉ. द्वारकादास लोहिया |
| जिल्हा केंद्र, ठाणे | अध्यक्ष | श्री. मुरलीधर नाले |
| जिल्हा केंद्र, जळगांव | अध्यक्ष | श्री. रवींद्र प्रल्हादराव पाटील |
| जिल्हा केंद्र, पालघर | अध्यक्ष | श्री. सुनिल देवराव रणाईत |
| नवी मुंबई केंद्र | अध्यक्ष | श्री. प्रमोद कर्नाड |

**विविध विभाग**

| | | |
|---|---|---|
| सृजन | संकल्पना व संयोजक | सौ. सुप्रिया सुळे |
| शिक्षण | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | प्रमुख संयोजक | डॉ. वसंत काळपांडे |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| | सहसंयोजक | श्री. विश्वास ठाकूर |
| | संघटक | श्री. नीलेश राऊत |
| अपंग हक्क विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |
| वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजक | श्रीमती ममता कानडे |
| कृषी व सहकार व्यासपीठ | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. विनायकराव ना. कांबळे |

**मध्यवर्ती कार्यालय**

| | | |
|---|---|---|
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व कलादालन रंगस्वर | सरव्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडिअर श्री. सुशील गुप्तन |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम व्यवस्थापक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | वित्त व लेखा व्यवस्थापक | श्री. महेश चव्हाण |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | आस्थापना व्यवस्थापक | श्री. संजय बनसोडे |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | ग्रंथालय संसाधन व ज्ञान व्यवस्थापक | श्री. अनिल पाझारे |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएट्स |
| सांविधानिक लेखा परीक्षक | मे. सी. व्ही. के. असोसिएट्स, मुंबई | चार्टर्ड अकाउंटंट |
| अंतर्गत हिशेब तपासनीस | मार्क ॲण्ड असोसिएट्स, मुंबई | |

# संपादकीय

आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या १०५ व्या जयंती दिनाच्या निमित्ताने प्रतिष्ठानच्या वार्तापत्राचा हा अंक वाचकांच्या हाती सोपवत आहोत. दिवसेंदिवस प्रतिष्ठानच्या कार्याचा विस्तार होत आहे. विभागीय केंद्रासोबतच आता जिल्हास्तरीय केंद्रे उभी राहू लागली आहेत. अनेक विषयांची हाताळणी करताना नवनवे कार्यकर्ते येऊन जोडले जात आहेत. ऑक्टोबर २०१७ ते जानेवारी २०१८ या कालावधीत मुंबईतील तसेच सर्व विभागीय व जिल्हा केंद्रावर संपन्न झालेल्या कार्यक्रमाचा हा अहवाल आहे. या कालावधीत राज्यात मोठ्या प्रमाणावर घडामोडी घडत असतात. प्रतिष्ठानच्या वतीने देखील मुंबई येथे ८ वा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव संपन्न झाला. अनेक मान्यवरांची तसेच रसिक प्रेक्षकांची उपस्थिती या महोत्सवास लाभली. याच काळात औरंगाबाद येथेही चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. डिसेंबर महिन्यात मुंबई येथे फिल्मिंगो हा लघुपट महोत्सव संपन्न झाला. तेथील ५ लघुपट फ्रान्समधील कान येथील आंतरराष्ट्रीय महोत्सवासाठी निवडण्यात आले होते. दोनच दिवसांपूर्वी माहिती मिळाली की त्या पाचही लघुपटांचा समावेश महोत्सवात करण्यात आला आहे. त्याबद्दल खरंच खूप समाधान आहे आणि नव्या पिढीच्या कला निर्मितीचा अभिमानही वाटतो. इतरही नियमित उपक्रमांतून विविध सामाजिक घटकांसाठी अनेक उपयुक्त कार्यक्रम घेण्यात आले आहेत. 'एकल' महिलांच्या महत्त्वाच्या प्रश्नांबाबत मोहीम हाती घेतली आहे. विकास अध्ययन केंद्र व इतर काही सहकारी संस्थांच्या सहकार्याने बैठका, परिषदा सुरु आहेत. शासनाने त्याबाबत धोरण आखून त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी म्हणून प्रयत्न सुरू आहेत. ट्रान्सजेंडरचा दुर्लक्षित प्रश्नही सामाजिक, राजकीय अजेंड्यावर प्राधान्याने यावा असाही प्रयत्न आहे.

दरवर्षी प्रमाणे सामाजिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवा पिढीला यशवंतराव चव्हाण युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावर्षीचा यशवंतराव चव्हाण विशेष युवा क्रीडा पुरस्कार भारतीय हॉकीपटू आकाश चिकटे यांना, तर राज्यस्तरीय युवा क्रीडा पुरस्कार युवकांमध्ये क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल मोहोम्मद नुबेर शेख (बुद्धिबळ) व युवतींमध्ये किशोरी शिंदे (कबड्डी) यांना, तर सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल सतीश सिडाम यांना (ताडोबा वनक्षेत्रातील आदिवासी हक्कांसाठी कार्यरत) व कृपाली बिडये (हिजडा आणि ट्रान्सजेंडर समूहासाठी कार्यरत) यांना देण्यात आला.

यावर्षीचा राष्ट्रीय पुरस्कार ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. एम. एम. शर्मा यांना प्रदान करण्यात येत आहे. एका परम आदरणीय व्यक्तिमत्वाचा यानिमित्ताने आपण गौरव करत आहोत. देश व समाज ज्या व्यक्तीमुळे प्रगतिपथावर वाटचाल करतो, त्यातील हे एक नाव! त्यांना आमच्या सर्वांच्या वतीने आदरपूर्वक अभिवादन करते. त्यांच्या कामाविषयी अधिक सविस्तर माहिती त्यांच्या सन्मानपत्रातून आपण वाचावी अशी विनंती आहे.

प्रतिष्ठानच्या अहमदनगर केंद्राचे अध्यक्ष व माजी खासदार, महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्व म्हणजे माननीय यशवंतराव गडाख साहेब यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांना उत्तम आरोग्य लाभो हीच सदिच्छा. त्याचप्रमाणे पुणे विभागीय केंद्राचे कार्याध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक माननीय लक्ष्मीकांत देशमुख यांची बडोदे येथे झालेल्या ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन. त्यांचे अध्यक्षीय भाषण अतिशय विचारप्रवर्तक होते. त्याची चर्चाही खूप झाली. त्यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीस खूप खूप शुभेच्छा. आज या जयंती दिनाच्या निमित्ताने स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या 'भूमिका' व 'माझ्या विद्यार्थी मित्रांनो' या दोन ग्रंथांच्या ऑडिओ सीडीज तसेच प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या 'National Security' या परिसंवादातील लेख व चर्चा या विषयावर संपादित केलेले पुस्तक प्रकाशित होत आहे. वाचक त्याचे स्वागत करतील अशी खात्री वाटते.



–सुप्रिया सुळे

# वार्तापत्र

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
मा. यशवंतराव चव्हाण यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन
वर्ष : २२ वे / अंक ४२ वा / प्रकाशन : १२ मार्च २०१८

सल्लागार
**मा. शरद काळे**
**मा. हेमंत टकले**

मानद संपादक
**सुप्रिया सुळे**

कार्यकारी संपादक
**दत्ता बाळसराफ**

सहसंपादक
**सुरेश पाटील**
**अनिल पाझारे**

विशेष सहाय्य
**पद्मभूषण देशपांडे**

सहाय्य
**मिनल सावंत- पाडावे**
**रमेश मोरे**
**मनिषा खिल्लारे**
**महेश साळवी**

**केंद्रातील सहकारी :**
विद्याधर खंडे, संगीता गवारे, स्मिता रायकर, महेश चौधरी, यतीन घोडेकर, राजेंद्र रुपवते, निवृत्ती भोर, संजना पवार, शैलेश चव्हाण, शोभा लोंढे, अनिल चिंदरकर, सुकेशनी मर्चंडे-शेवडे, सुहास बाभल, प्रियंका देसाई, विजय नागरे, जयेश गुजराथी, विश्वदत्त मुळे, सुरेश कोठावळे, महादेव सगरे, सुरेश सावंत, अशोक जाधव, मंगेश शिंदे, सतीश लाड, भक्ती जांभवडेकर, सुषमा साळुंखे, स्वाती शेलार यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार

## अनुक्रमणिका

- माननीय यशवंतराव चव्हाण लेख ........................... ६
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार -२०१७ मानपत्र ........... ०९

**मध्यवर्ती कार्यालय व विविध विभाग**

- नवमहाराष्ट्र युवा अभियान ........................... ११
- अपंग हक्क विकास मंच ........................... १६
- शिक्षण विकास मंच ........................... १८
- वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान ........................... २०
- कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम ........................... २१
- सृजन ........................... २५
- महाराष्ट्र महिला व्यासपीठ ........................... २६
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय ........................... २७
- माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी ........................... ३०

**विभागीय केंद्र, कार्यवृत्त**

- विभागीय केंद्र, कऱ्हाड ........................... ३१
- कृषी व सहकार व्यासपीठ आणि विभागीय केंद्र, पुणे...... ३२
- विभागीय केंद्र, नागपूर ........................... ३४
- विभागीय केंद्र, नाशिक ........................... ४५
- विभागीय केंद्र, रत्नागिरी ........................... ५०
- विभागीय केंद्र, औरंगाबाद ........................... ५३
- विभागीय केंद्र, लातूर ........................... ५९
- विभागीय केंद्र, अहमदनगर ........................... ६१
- विभागीय केंद्र, सोलापूर ........................... ६३
- विभागीय केंद्र, ठाणे ........................... ६४
- देवराष्ट्रे अहवाल ........................... ६५
- प्रतिष्ठानची प्रकाशने ........................... ७०

हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-कार्यकारी संपादक श्री. दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता, मीडिया आर अँड डी (इं) प्रा. लि., कांदिवली (प) येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई ४०० ०२१ येथे प्रकाशित केले. नोंदणी क्र. ७१५८७/९९

# वर्ग संघर्ष आणि जाती संघर्ष

**– यशवंतराव चव्हाण**

मार्क्सने मांडलेले वर्गसंघर्षाचे तत्त्व, हा इतिहासशास्त्रातील एक क्रांतिकारक सिद्धान्त आहे. तो अमुक एका देशाला लागू आहे आणि अमुक एका देशाला लागू नाही, असे होऊ शकत नाही. हिंदुस्थानलाही तो लागू आहे. जोपर्यंत समाजात शोषित–पीडित लोक आहेत आणि त्यांना शोषून काढणारे लोक आहेत, तोपर्यंत मार्क्सचा सिद्धान्त भारतातही आहेच. शोषकांचे अत्याचार वाढतील, तसतसा हा वर्गसंघर्ष वाढत जाईल, यात मला मुळीच शंका वाटत नाही. माझे तर उलट असेच मत आहे की, हिंदुस्थानात वर्गसंघर्ष नव्हता, असे कधी झाले नाही. त्या संघर्षाची व्याप्ती अधूनमधून कमी–अधिक झाली असेल, इतकेच काय ते. पण संघर्षाची ही भावना अगदी पूर्वीही होती आणि आजही आहे; आणि मला वाटते, ती यापुढेही राहणारच आहे; कारण आपण इतर वर्गापेक्षा श्रेष्ठ आहोत, असे मानणारा वर्ग भारतात आजच्याप्रमाणेच पूर्वीही होता आणि त्याचे ते वर्चस्व न मानता ते झुगारून द्यावे, असे वाटणारा वर्गही पूर्वी होता व आजही आहे. तेव्हा हिंदुस्थानमध्ये वर्गसंघर्ष ही काही नवीन घटना नव्हे.

वर्गसमन्वयाची भावना व भाषा आपल्या संस्कृतीत आहे, असे मानून घेणे ही देखील एक प्रकारची सोयीस्कर गैरसमजूत आहे. उलट, भारतीय संस्कृतीच्या निर्मात्यांनी या दीन–दलितांनाही काही मन आहे, भावना आहेत, याचा फारसा विचार केलेला नाही, असेच खेदाने म्हणावे लागते. समन्वयाची भाषा काढताना ती घडवून आणतानाही नेहमी दलित वर्ग कायमचा शोषणाखाली जखडला जाईल, असाच प्रयत्न झालेला आहे. हा आपल्या समाजव्यवस्थेचा दोष आहे. शोषित आहे, तो शोषित राहू नये, असा प्रयत्न कधी झाला नाही. शोषिताने प्रतिकार करावा, इतके सामर्थ्य त्याला समाजव्यवस्थेने कधी प्राप्त होऊ दिले नाही.

भारतीय संस्कृतीच्या अगदी भरभराटीच्या काळातही चातुर्वर्ण्य–प्रणाली निर्माण करून समाजात कायमचा जातिभेद निर्माण करण्यात आला. जो शूद्र आहे, तो शूद्रच राहिला पाहिजे, असे युगानुयुगे सांगितले गेले. तेव्हा ज्या व्यवस्थेने माणसामाणसांत भेद केला, काही लोकांना हीन मानले, त्या व्यवस्थेत समन्वय हा शब्दही वर्णाश्रमव्यवस्थेला कायमरूप देण्यासाठीच होता, असेच म्हणावे लागते. हिंदुस्थानच्या इतिहासाचा असा समन्वयवादी अर्थ लावणे, हे वास्तवाकडे पाठ फिरवणे होणार आहे. शोषण करणारा समाज, वर्ग किंवा जाती आहेत, तोवर शोषित राहणारच आणि शोषित असले की, असंतोष किंवा संघर्ष येणारच. हजारो वर्षांपासून हेच होत आले आहे आणि शोषणरहित समाजाचा उदय सर्व जगभर होईपर्यंत असेच घडत राहणार आहे.

वर्गसंघर्ष म्हटला की, तो अहिंसक असणे संभवत नाही. कारण एक तर वर्गविग्रहाची भावना पराकाष्ठेला पोहोचल्याशिवाय संघर्ष पेटणार नाही. संघर्ष हिंसक व्हायला नको असेल, तर तो पेटणारच नाही, अशी व्यवस्था करायला हवी. वर्गसंघर्षाने हिंसक वळण घ्यायला नको असेल, तर वर्गविग्रहाची भावना दूर करायला हवी. आर्थिकदृष्ट्या दुर्बळ आहे, एवढ्याच खातर कुणावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घ्यायला पाहिजे आहे. आजही कुणी दरिद्री असेल, गरीब असेल, तर तो दोष त्याचा नसून संपूर्ण समाजव्यवस्थेचा आहे, असे मानले पाहिजे. ते न करता वर्गसंघर्ष हिंसक राहणार, की अहिंसक राहणार, ही चर्चा नुसती पोकळ व कोरडी ठरणार आहे. समाजात विविध स्तरांवरील वर्ग आहेत व त्यातला एक वा अनेक सबल वर्ग दुसऱ्या कमकुवत वर्गांचे शोषण करतात, हेच वर्गसंघर्षांचे मूळ कारण आहे. पूर्वी आपला समाजच अशिक्षित होता. आपल्यावर अन्याय होत असला, तरी ते 'आपले नशीब' असे मानण्याची शिकवण त्याला देण्यात आली होती. आता समाज जागा होतो आहे. हरिजनही आता साक्षर होत आहेत, शहाणे होत आहेत. त्यांच्या नव्या पिढीला परंपरेने चालत आलेले अन्याय, अत्याचार सहन होत नाहीत. ते दूर करण्यासाठी आजचा शोषित कंबर कसून उभा राहू म्हणतो आहे. त्याचा त्याच्या हक्कासाठी होणारा लढा हा वास्तविक समाजाने कौतुकाने स्वीकारला पाहिजे आहे. इतकेच नव्हे, मी तर म्हणेन, त्याला सर्वतोप्रकारे मदत केली पाहिजे. हा संघर्ष अटळ आहे. आणि एकदा तो अटळ आहे, हे मान्य केले की, मग ती एक लढाई ठरते आणि लढाई नेहमी अहिंसकच राहिली पाहिजे, ही

इच्छा चांगली आहे, पण व्यवहारात तसे घडणे अशक्य आहे.

मला वाटते, हरिजनांना अन् शोषितांना त्यांच्याच बाबतीत समाज पक्षपात करतो, असे वाटू न देणे, ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. जातपात कोणतीही असो, सामाजिक प्रतिष्ठा असो वा नसो, आर्थिक स्थिती खालावलेली असो वा चांगली असो, सारा समाज आपल्याकडे 'माणूस' म्हणून पाहतो आहे, ही भावना त्यांच्यात वाढीस लावली पाहिजे. ते होणार नसेल, तर तो वर्ग संघटित होणार व आपल्या हक्कांसाठी संघर्षाला सज्ज होणार. परंतु हा वर्ग असा उग्र बनणार नाही, हिंसाचार करणार नाही, यावर उत्तम उपाय म्हणजे, समाजातील आर्थिक आणि सामाजिक विषमता दूर करणे हाच आहे. मार्क्सने सांगितलेली वर्गविग्रहाची कल्पना किंवा वर्गसंघर्षाचा सिद्धान्त त्या देशात होता, तसाच्या तसा कदाचित हिंदुस्थानात दिसत नसेल. येथील निरनिराळ्या वर्गांची कल्पना व रचना कदाचित निरनिराळी असेलही; परंतु वर्ग आहेत, विषमता आहे, त्यांच्या हितसंबंधांत विरोध आहे, पिढ्यान पिढ्या तो वाढतो आहे. जातिव्यवस्था ही अत्यंत वाईट स्वरूपाची वर्गविग्रह व्यवस्थाच आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. या जातिव्यवस्थांना सध्या जे विकृत स्वरूप आले आहे, त्या स्वरूपासाठी त्या निर्माण करण्यात आलेल्या नव्हत्या, असे म्हणण्यात फारसा अर्थ नाही नि तसे म्हणणे म्हणजे स्वतःची फसवणूक करणे ठरेल. आपल्या समाजात प्रत्येक पिढीत किंवा युगात म्हणा, हवे तर, जातिव्यवस्था ही कायम स्वरूपाच्या जातिभेदात बदलत चालली आहे, हे ओळखणारे नेते किंवा समाजसुधारक नव्हते, की काय? पण तरीही हा ऱ्हास झाला व समाजजीवनात जातिभेदाचे हे विष खोलवर भिनले. कामावरून ठरलेली जात जन्मावरून ठरणाऱ्या जातीला वाट करून का गेली? काम कोणतेही असो, आधी जात कोणती, त्याचा विचार त्यानंतर बळावला. त्यातूनच कामापेक्षा जन्म महत्त्वाचा ठरला आणि येथूनच आमच्या देशात जातिभेद हेच वर्गभेदाचे दुसरे नाव होऊन बसले.

आज हरिजन हा वर्ग राहिलेला नाही, ती जात बनली आहे. कदाचित शोषितांची आणि शोषकांची नवी जातच या देशात तयार होण्याचा धोका आहे. ती जात जन्मावरून नव्हे, तर आर्थिक संपन्नतेवरून किंवा विपन्नतेवरून ठरणार आहे. म्हणजे मार्क्सचा सिद्धान्त प्रत्यक्षात आलाच. भारतात तरी वर्गसंघर्ष आणि जातिसंघर्ष यांचा तोंडवळा बऱ्याच अंशी एकसारखाच आहे.

जयप्रकाशांनी हरिजनांवर होणाऱ्या अत्याचारांच्या संदर्भात वर्गसंघर्षाची कल्पना मांडली आहे. परंतु माझ्या मते अशा वर्गसंघर्षातून हरिजनांचा लाभ होणार आहे, की नाही, या तात्त्विक चर्चेचा हा प्रश्न नाही. हरिजनांची आजची परिस्थिती काय आहे, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. हिंदुस्थानमध्ये आज अत्याचार ज्या पद्धतीने होताहेत, त्याची माहिती काढायचा जर प्रयत्न केला, तर असे दिसून येईल की, या सर्वांचे मूळ कारण सामाजिक अहंकाराचे आणि मोठेपणाचे जुने विचारच आहेत. त्याचबरोबर आजचे जे आर्थिक कार्यक्रम आहेत, त्या आर्थिक कार्यक्रमांना विरोध म्हणून हरिजनांवर हे अत्याचार होत आहेत.

या अत्याचारांची पाहणी करण्यासाठी माझ्या पक्षाने खासदारांच्या ज्या तुकड्या बिहार, गुजरात, उत्तरप्रदेश या राज्यांत पाठवल्या होत्या, त्यांनी आणलेल्या माहितीवरून दिसते की, ज्यांना जमिनी नव्हत्या, त्यांना जमिनी दिल्या, म्हणून त्यांच्यावर राग काढण्यात आला. कालपर्यंत बिनजमिनीचे असलेले हे लोक आता जमिनीचे मालक व्हायला लागले, जमीनदार व्हायला लागले, हे अनेकांना पाहवले नाही.

त्याचप्रमाणे ज्यांना राहायला जागा नव्हत्या, त्यांना त्या मिळाल्या, तर अत्याचार करणाऱ्यांनी त्या परत हिसकावून घेतल्या. वेठबिगारी पद्धतीत पिढीजात गुलामी करायला माणसे मिळत होती. त्यांना वर्षाकाठी काही धान्य दिले, थोडे कपडे दिले आणि पिढ्यानपिढ्या आमचेच काम केले पाहिजे, म्हणून बांधून घेतले. तर अशी जी वेठबिगारी चालू होती, तिला विरोध करायला लोक उभे राहिल्याबरोबर त्यांच्यावर अत्याचार झाले आहेत. त्यातून हा संघर्ष निर्माण झालेला आहे.

म्हणजे हा संघर्ष मुळामध्ये आहेच. त्यांचे शोषण चालूच होते. त्यांचे सामाजिक, आर्थिक शोषण वर्षानुवर्षे चालले आहे आणि आज त्यांनी बरोबरीच्या नात्याने वागायचा प्रयत्न करतो म्हटल्याबरोबर, जणू काही आपले जन्मसिद्ध अधिकार जातील, या भावनेने शोषक त्यांच्यावर नुसती कुरघोडीच नव्हे, तर हिंसक हल्ले करतो आहे. हे चित्र काय दर्शवते? हेच की, हा वर्गसंघर्षच आहे. दुसरे काहीही नाही. आणि हा जो शोषक आहे, तो हिंसेचा वापर करून शोषिताला दाबायचा प्रयत्न करतो आहे, अशा परिस्थितीत तो शोषित वर्ग जर प्रतिकाराला उभा राहिला, तर त्याच्याविरुद्ध तक्रार कशी करता येईल?

अशा परिस्थितीत या वर्गाने त्याच्यावर जो अन्याय होतो आहे, त्याच्याविरुद्ध संघटित झाले पाहिजे आणि त्याचा संघटित प्रतिकार केला पाहिजे. अर्थातच संघर्ष केला पाहिजे. कारण हा त्यांच्या मूलभूत हक्काचा प्रश्न आहे. या संघर्षासाठी समाजातील सुजाण व्यक्तींनी त्याला आपणहून सर्व प्रकारची मदतही केली पाहिजे. कारण अशा संघर्षातून त्याला जो लाभ मिळेल, तो चिरस्थायी राहणार आहे. कुणाच्या तरी उपकाराने

किंवा उदारतेमुळे त्याला काही दिले, तर त्याने त्याचे भागायचे नाही. त्याचे समाधानही होणार नाही. कुणी त्याला दया दाखवली तर त्याने काय होणार? अशा कृत्रिम मदतीने किंवा दयेने सामाजिक अन्याय, अत्याचार कधीच दूर होत नसतात. वरून येणाऱ्या कुणाच्या तरी दयेवर अवलंबून राहून सामाजिक एकता कधीच निर्माण होत नसते.

मी काही समाजात वितुष्ट निर्माण करावे, अशा मताचा नाही. वितुष्टे टाळली पाहिजेत, वितुष्टे निर्माण होणार नाहीत, असे प्रयत्न केले पाहिजेत, अशाच मताचा मी आहे. त्यासाठी समाजातल्या सर्व लोकांनी, शासकांनी, नेत्यांनी प्रयत्न केले पाहिजेत. याच भावनेने आमच्या पक्षातील खासदारांनी आणलेल्या माहितीच्या आधारे आपले पंतप्रधान मोरारजी यांना मी पत्र लिहिले आहे की, शासनाने आपली यंत्रणा या लोकांवरील अत्याचाराच्या प्रतिकारासाठी आणि असे अत्याचार होणार नाहीत, याची खबरदारी घेण्यासाठी सज्ज उभी करायला पाहिजे. हे शासनाचे काम आहे. सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रांतील जे कोणी नेते असतील, त्या सर्वांचे हे काम आहे. हा काही एका पक्षाचा वा राजकारणाचा प्रश्न नाही. समाजातील न्यायाचा प्रश्न आहे.

**(तरुण भारत, नागपूर १९७७ च्या दिवाळी अंकातून साभार)**

**‘आम्ही आमच्यामध्ये नाना तऱ्हेच्या सामाजिक भेदाभेदांची मोठी थोरली उतरंड रचली म्हणून हिंदुस्थान दुबळा झाला. आम्ही खटपट करतो आहोत आर्थिक क्रांती करावयाची, औद्योगिक क्रांती करावयाची. हातात आलेल्या मोठ्या थोरल्या स्वातंत्र्याच्या शक्तीचा, लोकशाहीच्या सत्तेचा वापर करावयाचा प्रयत्न चालला आहे, पण गाडा अजूनही काही पुढे जात नाही. याचे कारण समाजातील ही उतरंड आहे. उतरंड हा शब्द मी मुद्दामच वापरीत आहे; कारण आम्ही सर्व एकमेकांच्या डोक्यावर बसलो आहोत आणि वरचा जो खालच्याच्या डोक्यावर बसला आहे, त्याचे तोंड बंद करून बसला आहे. खालच्याला काही वावच नाही. समाजामध्ये आम्ही ही जी उच्चनीचतेची, जातिभेदाची, वर्णभेदाची उतरंड रचलेली आहे ती केवळ एकाच प्रांतात रचलेली नसून सर्व हिंदुस्थानभर रचलेली आहे. ही उतरंड मोडण्याचे काम ज्या दिवशी आपण करू त्या दिवशी आपण खरी क्रांती केली असे मी म्हणेन.’**

**- मा. यशवंतराव चव्हाण**

# YASHWANTRAO CHAVAN NATIONAL AWARD, 2017 FOR NATIONAL INTEGRATION, DEMOCRATIC VALUES OR, SOCIAL AND ECONOMIC DEVELOPMENT IN INDIA

## CITATION

Prof. Man Mohan Sharma was born in 1937 in Jodhpur, Rajasthan. His grandfather worked in Bikaner State Railway and his father worked for Jodhpur State Railway. After completing his school and graduate education in Jodhpur, he joined a newly started Engineering College called Mungiram Bangur Memorial College. Departing from the usual pattern of going for Civil Engineering, he chose to enroll for Chemical Engineering. fter that he joined the UDCT (University Department of Chemical Technology). It was a big change for him from a small place in the Rajasthan desert to a thriving city like Mumbai.

In one of his interviews he has recalled his first impression of life in Mumbai, On the very first day I opened the water tap and found water gushing out. I had never seen tap water and that too flowing out with such force. The second was the heavy monsoon rain, about which I did not have the foggiest idea. I also found that the Bombay guys were good in English and I had to teach myself English. nother unique experience was that I could travel through the entire city in a tram for just one anna.

He did his Masters in UDCT and became a temporary lecturer. The department allowed him to travel to U.K. for research where he was a Cambridge scholar. Within the first few months, he had papers published in renowned journals. The quality of his work was so good that he completed his Ph. D in one year. major achievement at a very young age was to get a patent in his name in 1964. He was given an offer by Shell to join anywhere including NOCIL, coming up in India. However, he wanted to make a career in research and teaching. He was appointed as Professor of Chemical Engineering in UDCT, now renamed as Institute of Chemical Technology, after grant of autonomous status. He continued to be Professor of Chemical Engineering from 1964 to 1997 and in 1989, became the Director of the Institute of Chemical Technology.

He was the youngest recipient of the Shanti Swarup Bhatnagar Prize in Engineering Sciences in 1973. He was elected a Fellow of the National Science cademy in 1976 and became its President during 1987 to 1990. His crowning achievement came in 1990, when he was elected as a Fellow of Royal Society, UK. He was the first Engineer from India to be elected to this prestigious body.

He built a reputation for himself and UDCT by establishing mutually beneficial relationship with industries by helping them in solving their problems through research. He was involved in giving ideas about new projects. He believed that the secret of research was to identify a

relevant and solvable problem. s a result, his students also got involved in current technological problems faced by the chemical industry. Many of his students became captains of industries in the chemical sector. His first Ph.D. student became the President of a billion-dollar company in the U.S. He created an ambience of excellence in UDCT where teaching, research and consulting dominated his professional life. During his career, he has guided 71 Ph.Ds., which is unheard of in Engineering, even today. He believes that a teacher's worth has to be measured not only by what he has taught but by what his students and collaborators have achieved. Leading by his own example, he also ensured that his students got their papers published in highly reputed international journals under their own name. s a result, UDCT became a renowned Institute not only in India but also abroad.

He has been a recipient of several coveted medals and honours. To highlight a few, mention may be made of Vishwakarma Medal in 1985, Meghnad Saha Medal in 1994, Sir J. C. Bose Memorial Lecture in 1994, Medal for Promotion and Services to Science in 2008, Leverhulme Medal in 1996. He was elected National Fellow of the Royal cademy of Engineering in 2005 and Foreign Fellow of US National cademy of Engineering in 2006. He has served as Member, Scientific dvisory Council to the Prime Minister from 2006-2014, Chairman, Board of Governors; IIT, Madras and Director, Central Board of Directors, Reserve Bank of India.

He has published 250 research papers in Chemical Engineering and allied subjects. He was honoured with Padma Bhushan in 1987 and Padma Vibhushan in 2001. He is a living legend and an outstanding example of a guide, teacher and mentor under whose stewardship students have won acclaim and continued to perform in the forefront of applied research.

The Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai, feels privileged in conferring the Yashwantrao Chavan National ward, 2017, on Prof. Man Mohan Sharma for his outstanding contribution to economic development in India.

| | | |
|---|---|---|
| **Mumbai** | **Dr. Anil Kakodkar** | **Sharad Pawar** |
| **12th March, 2018** | Chairman | President |
| | Panel of Jury | Yashwantrao Chavan Pratishthan, |
| | | Mumbai |

# नवमहाराष्ट्र युवा अभियान

## कार्यवृत्त

नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे काम संयोजक दत्ता बाळसराफ, संघटक निलेश राऊत पाहतात.

विजय कान्हेकर आणि वैशाली मोटे या समन्वयक आहेत, तर कार्यालयीन संघटक म्हणून सुरेश पाटील व सहाय्यक म्हणून मिनल सावंत, रमेश मोरे, मनीषा खिल्लारे, महेश साळवी कार्यरत आहेत.

**चित्रपट चावडी या उपक्रमांतर्गत, 'सिंहासन' सिनेमा व चर्चा :**

ज्येष्ठ पत्रकार आणि साहित्यिक अरूण साधू यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी प्रतिष्ठानमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांच्या 'सिंहासन' व 'मुंबई दिनांक' या कांदबरी व कथासंग्रहातील निवडक प्रसंगांवर आधारित सिनेमा बनला; ''सिंहासन''. आपल्या सर्वांचा परिचित असा हा चित्रपट. १९७९ ला तो सिनेमा प्रदर्शित झाला....संपूर्णपणे राजकारणच केंद्रबिंदू असलेला हा मराठीतील पहिला चित्रपट... सत्तेच्या सिंहासनासाठी केल्या जाणाऱ्या राजकारणावर आधारित हा सिनेमा आहे.. राजकीय डावपेज, बेरीज–वजाबाकी आणि अनुत्तरित गणितंही...हे राजकारण अनेकदा सामान्य माणसांच्या आकलनापलीकडे असते...पण एक पत्रकार म्हणून खुर्चीभोवतालचे हे डावपेच, टिपता येतात...याचंच यथार्थ चित्रण या सिनेमात आहे. जब्बार पटेल दिग्दर्शित व विजय तेंडुलकर पटकथा लिखित...निळू फुले, श्रीराम लागू, अरुण सरनाईक, मोहन आगाशे, नाना पाटेकर, रिमा लागू, सतीश दुभाषी, उषा नाडकर्णी यांचा प्रगल्भ अभिनय आणि हृदयनाथ मंगेशकर यांचं संगीत असलेला हा राजकीय चित्रपट.

'सम्यक संवाद' व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई च्या वतीने अरूण साधूंना श्रद्धांजली म्हणून 'सिंहासन हा सिनेमा शुक्रवार दिनांक १० नोव्हेंबर २०१७ रोजी दुपारी ४:३० वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मंत्रालयाजवळ, नरीमन पॉईंट येथे दाखविण्यात आला व त्यानंतर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

**ज्येष्ठ साहित्यिक अरूण साधू यांना आदरांजली :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि ग्रंथाली प्रकाशन यांच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक अरूण साधू यांची प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. शरदरावजी पवार यांच्या अध्यक्षतेखाली 'स्मृतिसभा' आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी दिनकर गांगल, कुमार केतकर, जब्बार पटेल, गिरीश कुबेर, मीना गोखले, प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष अरूण गुजराथी, प्रतिष्ठानचे सरचिटणीस शरद काळे आणि कोषाध्यक्ष हेमंत टकले हे उपस्थित होते. तसेच साहित्य, पत्रकारिता आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या सभेला उपस्थिती दाखविली. यावेळी साधूंच्या 'सिंहासन' 'मुंबई दिनांक' 'झिपऱ्या' अशा एकाहून एक सरस कलाकृतींचा आवर्जून उल्लेख करण्यात आला. या प्रसंगी अरूण साधू यांच्या अनेक आठवणींना उजाळा दिला गेला.

**८वा यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव संपन्न...**

१९ जानेवारी ते २५ जानेवारी २०१८ दरम्यान ८वा यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव पार पडला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई आणि पुणे फिल्म फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव रंगला होता. २५ जानेवारी २०१८ रोजी महोत्सवाची सांगता कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी महोत्सवाचे संचालक जब्बार पटेल, प्रतिष्ठानचे सरचिटणीस शरद काळे, मुख्य समन्वयक महेंद्र तेरेदेसाई, संयोजक दत्ता बाळसराफ यांची उपस्थिती होती.

कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांनी महोत्सव अतिशय सुंदर झाल्याचे सांगितले. तसेच प्रत्येक वर्षी इथे असाच चित्रपट महोत्सव होईल असेही त्यांनी सांगितले.

यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव– २०१८ या महोत्सवाचे यंदा '८ वे' वर्ष होते. यावेळी चित्रपट दिग्दर्शक व निर्माता रमेश सिप्पी यांना भारतीय चित्रपटसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल सरचिटणीस शरद काळे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच यंदा या महोत्सवात चित्रपट रसिकांसाठी विविध भाषेतील आणि विविध देशातील काही निवडक ८५ चित्रपटांची मेजवानी होती. महोत्सवाचे मुख्य आकर्षण होते 'स्मिता पाटील स्मृती व्याख्यान'. अभिनेते सचिन खेडेकर यांची महोत्सव संचालक जब्बार पटेल यांनी छानशी मुलाखत घेतली, तसेच मोहन क्रिशनन यांनी मास्टर क्लास 'पोस्ट प्रॉडक्शन' या विषयावर २३ जानेवारी रोजी उपस्थितांना मार्गदर्शन केले. २२ जानेवारीला सुश्रुत वैद्य यांनी हिंदी चित्रपटातील गाण्यामधील सामाजिक उत्क्रांतीचे प्रतिबिंब या विषयावर मार्गदर्शन केले.

पुढच्या वर्षी हा महोत्सव १८ जानेवारी ते २४ जानेवारी २०१९ रोजी होणार आहे. असे प्रतिपादन महोत्सवाचे संचालक जब्बार पटेल यांनी केले.

**यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक व क्रीडा पुरस्कार २०१७ संपन्न :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दरवर्षी दिल्या जाणाऱ्या 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक, क्रीडा, विशेष क्रीडा पुरस्कार २०१७' चा सोहळा कल्चरल सेंटर, सिंहगड इन्स्टिट्यूट कॅम्पस, सिंहगड रोड, वडगाव, पुणे येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे, श्री. अजित निंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पुरस्काराचे यंदाचे एकोणिसावे वर्ष असल्याने कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात गर्दी होती.

सन २०१७ सालचा 'यशवंतराव चव्हाण विशेष युवा क्रीडा पुरस्कार' भारतीय हॉकीपटू आकाश चिकटे (हॉकी), तर या वर्षीचा 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा क्रीडा पुरस्कार– युवक व युवती' क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल मोहम्मद नुबैरशेख (बुद्धिबळ) व किशोरी शिंदे (कबड्डी) यांना तर सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सतीश सिडाम (ताडोबा वनक्षेत्रात आदिवासी हक्कासाठी कार्यरत) व कृपाली बिडये (हिजडा आणि ट्रान्सजेन्डर समूहासाठी कार्यरत) यांना 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक पुरस्कार देण्यात आला. सर्व पुरस्कार प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची स्थापना झाल्यापासून समाजातल्या वेगवेगळ्या घटकांसोबत काम करण्याचा प्रयत्न आम्ही सातत्याने करत असतो. तसेच कै. यशवंतराव चव्हाण साहेबांची अपूरी राहिलेली स्वप्नं यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मागील ३० वर्षांपासून महाराष्ट्रातल्या सगळ्या घटकांसोबत राहून पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहे, असे प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांनी सांगितले. नंतर ताईंनी शिक्षण क्षेत्रात प्रथम नामक संस्थेचा उल्लेख करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

**फिल्मिंगो आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव २०१७ :**

'प्रयोग मालाड' आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक आणि समीक्षक श्री. अशोक राणे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आयोजित 'फिल्मिंगो आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव, २०१७' दिनांक २२ ते २४ डिसेंबर २०१७ दरम्यान यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र, मुंबई येथे संपन्न झाला. महोत्सवाच्या उदघाटन सोहळ्यास सुप्रसिद्ध अभिनेते संदीप कुलकर्णी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते 'फिल्मिन्गो २०१७' च्या कॅटलॉगचे प्रकाशन करण्यात आले. श्री. राणे यांनी उद्घाटन सोहळ्याचे प्रास्ताविक केले.

या महोत्सवात एकूण १६० लघुचित्रपट सहभागी झाले होते. त्यामध्ये भारतासमवेत इंग्लंड, अमेरिका, इटली, यु.ए.ई., ऑस्ट्रिया, कॅनडा, आणि श्रीलंका येथील स्पर्धकांचा समावेश होता. फिल्मिन्गो महोत्सवातून गेल्या वर्षी Cannes Short Film Corner ला निवड झालेले लघुपट, त्याचप्रमाणे स्पंदन परिवार व Whistling Woods International मधील पारितोषिक प्राप्त लघुपट या फिल्मिंगो महोत्सवामध्ये दाखविण्यात आले. श्री. रघुवीर कुल, श्रीमती रेखा देशपांडे, श्री. अनंत अमेंबल, श्री. अरुण गोंगाडे, आणि श्री अवधूत परळकर या मान्यवरांनी अंतिम फेरीचे परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली.

दिनांक २३ डिसेंबर २०१७, महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी श्री. अमरजित आमले आणि श्री. विजय कळमकर यांचा मास्टर क्लास हे महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले. उपस्थित प्रशिक्षणार्थीना मार्गदर्शन करताना चित्रपट निर्मितीविषयीची आस्था आणि निष्ठांवर अधिक भर देऊन निर्मिती प्रक्रियेसंबंधीचे विविध कंगोरे त्यांनी उलगडून दाखविले. १७२ प्रशिक्षणार्थींनी मास्टर क्लासचा लाभ घेतला.

दिनांक २४ डिसेंबर २०१७ रोजी झालेल्या सांगता समारंभातील पारितोषिक वितरण सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिध्द निर्माते आणि दिग्दर्शक एन. चंद्रा आणि विशेष अतिथी म्हणून प्रभात चित्र मंडळाचे अध्यक्ष माननीय श्री. किरण शांताराम, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे दत्ता बाळसराफ आणि नवमहाराष्ट्र युवा अभियानचे निलेश राऊत मंचावर उपस्थित होते.

या महोत्सवात सर्वोत्कृष्ट ठरणारे पहिले पाच लघुपट, प्रतिष्ठित अशा 'कान्स फेस्टिवल २०१८', फ्रान्स येथे पाठविण्याची जबाबदारी 'प्रयोग मालाड' ही संस्था स्वीकारणार आहे, असे यावेळी जाहीर करण्यात आले. अर्पिता वोरा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अत्यंत आकर्षक आणि नीटनेटके केले.

**यशवंतराव चव्हाण सामाजिक युवा पुरस्कार –२०१७**

| अ. क्र. | नाव | कार्य तपशील |
|---|---|---|
| १. | सतीश शंकर सिडाम | गेल्या १० वर्षापासून ताडोबा क्षेत्रातील ३० गावांमध्ये वनअधिकार कायद्याअंतर्गत अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रयत्नशील. आतापर्यंत ५० लोकांना व्यक्तिगत दावे मिळवण्यासाठी मदत.<br>आदिवासी महिलांच्या आरोग्य आणि रोजगार संदर्भात २० महिलांना प्रशिक्षण. |
| २. | कृपाली बिडये | हिजडा आणि ट्रान्सजेन्डर समूहासाठी केलेल्या कामासाठी राष्ट्रीय आय–व्हॉलिटीअर अॅवॉर्ड २०१७.<br>समाजाने या समूहाला नीट समजाऊन घ्यावे, यासाठी या मेळाव्याच्या माध्यमातून मुख्यत: प्रयत्न.<br>त्यांच्यातील बुद्धिमत्ता, कलाकौशल्य व्यवस्थापन आणि उद्योजकीय गुणवत्ता समाजासमोर मांडून त्यांना प्रयत्न. |

**यशवंतराव चव्हाण युवा क्रिडा पुरस्कार –२०१७**

| अ. क्र. | नाव | कार्य तपशील |
|---|---|---|
| १. | शेख मोहम्मद नुबैरशाह सलीमशाह | १२ व्या बँकॉक ओपन आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक.<br>अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभाग आणि या बहुतेक स्पर्धात प्रथम क्रमांकांचे स्थान. |
| २. | किशोरी शिंदे | २००८ सालच्या इंडोनेशियातील बीच एशियन गेम्समध्ये भारतीय टीमचे प्रतिनिधित्व करत सुवर्ण पदक मिळविले. |

**यशवंतराव चव्हाण विशेष युवा क्रीडा पुरस्कार –२०१७**

| अ. क्र. | नाव | कार्य तपशील |
|---|---|---|
| १. | आकाश चिकटे | भारतीय हॉकीपटू असून आतापर्यंत ४८ आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये यशस्वी गोलकीपर म्हणून सहभाग.<br>ढाका येथील हिरो एशिया कप – २०१७ या स्पर्धेत सर्वोत्तम गोलकीपर म्हणून सन्मानित. |

**यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा –२०१७**

| अ. क्र. | पुरस्कार | विजेते महाविद्यालय | नियतकालिक नाव | अंकाविषयी |
|---|---|---|---|---|
| १. | प्रथम | कर्मवीर रामरावजी आहेर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय देवळा, जि. नाशिक | बांधिलकी | बांधिलकी २०१६–१७ : कर्मवीर रामरावजी आहेर कला व वाणिज्य महाविद्यालय, या वर्शिकाचा अंक नेहमीच दर्जेदार असतो. या खेपेला त्यांनी विद्यार्थ्यांच्या दैनंदिनीना वाहिला होता. कोंकणी, आदिवासी, मारवाडी आणि मराठी भाषांमधील मजकूर समाविष्ट कर्नुअत आला होता. या सर्व मजकुराला संग्राह्य मुली आहे हे ध्यानी घेऊन या नियतकालिकाची रचना व मांडणी पुस्तकाप्रमाणे करण्यात आली होती. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | द्वितीय | Nagesh Karajagi Orchid College of Engg. Tech, Dist. Solapur | Orchid ura 2017 | ऑर्किड ऑरा २०१७ – नागेश कराजगी ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नोलॉजी. या नियतकालिकाची सजावट व मांडणी अतिशय आकर्षक होती. महाविद्यालयाचे अभ्यासक्रम , उपक्रम यासोबत विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला भरपूर वाव देण्यात आला आहे. चित्रं, छायाचित्र , व्यंगचित्र यांना विशेष स्थान देण्यात आलं होतं. |
| ३. | तृतीय | विद्याभारती महाविद्यालय, सी.के. नायडू रोड, अमरावती–४४४ ६०२. | प्रतिभा | प्रतिभा – या नियतकालिकात नशेबंदी , भ्रष्टाचार, स्वतंत्र विदर्भ अशा अनेक विषयांवरील साहित्य होतं. विविध भाषांमधील अभिव्यक्तीला प्रोत्साहन देण्यात आलं होतं. |
| ४. | उत्तेजनार्थ | नूतन विद्या प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लालसगांव, जि. नाशिक | नक्षत्र –भारतीय स्वातंत्र्याची ७० वर्ष | नक्षत्र ः या वर्षीचा अंक भारतीय स्वातंत्र्याची ७० वर्ष या विषयाला वाहिलेला आहे. विविधतेत एकता, सर्वधर्म समभाव, विज्ञान ,तंत्रज्ञानाचा स्वीकार, आणि बहुजन हिताय, बहुनाज सुखाय हा भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील मुल्यं विविध लेखांमधून अधोरेखित करण्यात आला आहे. भ्रष्टाचार , काळा पैसा शेतकरी अशा अनेक प्रश्नांची दखल घेण्यात आली आहे. |
| ५. | उत्तेजनार्थ | राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर | माई | माई – राधाबाई काळे महाविद्यालय, या नियतकालिकामध्ये महिलांच्या प्रश्नांना प्राधान्य , वीषयांचं वैविध्य, आकर्षक मुखपृष्ट व मांडणी हि या अंकाची वैशिष्ट्ये आहे. |

**तृतीयपंथींसाठी राज्यस्तरीय स्वतंत्र धोरण असावे :**

मागील आठवड्यात एकल महिलांसाठी 'स्वतंत्र धोरणाची आवश्यकता' या विषयावर चव्हाण सेंटर मध्ये राज्यभरातल्या महिलांसोबत कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांनी चर्चा केली होती. चर्चेमध्ये तृतीयपंथींचा सुध्दा समावेश होता. त्या अनुशंगाने आज दुपारी तृतीयपंथीयांच्या शिष्टमंडळाने प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांची शिक्षण, व्यवसाय आणि नोकरी अशा ब–याच समस्यांसाठी भेट घेतली. त्यानंतर सुप्रिया सुळे यांनी मी लवकरच मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन तृतीयपंथींसाठी राज्यस्तरीय स्वतंत्र धोरणाची मागणी करणार असल्याचं शिष्टमंडळाला सांगितलं.

**एकल महिलांसाठी 'स्वतंत्र धोरणाची आवश्यकता' :**
**राज्यस्तरीय चर्चासत्र संपन्न...**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विकास अध्ययन केंद्र, कोरो, कम्युनिटी डेव्हलपमेंट ट्रस्ट, यांच्या संयुक्त विद्यमाने एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरणाची आवश्यकता या विषयावर राज्यस्तरीय चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला राज्यभरातून महिला वर्ग उपस्थित होता. विशेष म्हणजे प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांनी हजर असलेल्या तृतीयपंथी यांच्याशी संवाद साधला. या कार्यक्रमाला प्रतिष्ठानचे सरचिटणीस शरद काळे आणि कार्यक्रम व्यवस्थापक दत्ताबाळ सराफ यांची प्रमुख उपस्थिती होती. मराठवाड्यात २०१५ व २०१६ या दोन वर्षांमध्ये पडलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर 'एकल महिला व पाणिप्रश्न' या विषयावर संशोधन अहवाल प्रसिध्द करण्यात आलेला होता. त्या अनुषंगाने औरंगाबाद येथे ९ सप्टेंबर २०१७ रोजी 'एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरणाची आवश्यकता' या विषयावर विभागीय चर्चासत्र आयोजित केले होते. या कार्यक्रमात झालेल्या सर्व चर्चेतून एक समान सूर समोर आला तो म्हणजे एकल महिलांसाठी 'स्वतंत्र धोरणाची आखणी' करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने चर्चा आयोजित करण्यात आली होती. यावेळी कार्यक्रमांच्या अध्यक्ष विद्या बाळ, सुजाता खांडेकर, फिरोज अश्रफ यांनी उपस्थितांना वेगवेगळ्या उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले. शहरी आणि ग्रामीण भागातील एकल महिलांच्या समस्या या विषयावर मा. दीप्ती राऊत यांनी मार्गदर्शन केले. विशेष समाज घटकातील एकल महिलांच्या या विषयावर सुजाता खांडेकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच मुस्लीम समाज्यातील एकल महिलांच्या समस्या मा. जुलेखा आणि तृतीयपंथी यांच्या समस्या माधुरी सरोदे, दिशा शेख यांनी केले.

## विज्ञानगंगा :

**दि. २७ आक्टोंबर, २०१७ : 'विश्वातील सर्वात मोठी आकाशगंगा' – डॉ. सोमक रॉय चौधरी** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञानगंगा' या कार्यक्रमात 'विश्वातील सर्वात मोठी आकाशगंगा' या विषयावर ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. सोमक रॉय चौधरी यांनी उपस्थितांशी संवाद साधला. या कार्यक्रमात भारतीय शास्त्रज्ञांनी शोध लावलेल्या विश्वातील सर्वात मोठी आकाशगंगा जिला 'सरस्वती' असे नांव देण्यात आले, ती शास्त्रज्ञांनी कशाप्रकारे शोधून काढली तसेच शोध घेताना कोणकोणत्या अडचणी आल्या याबद्दल त्यांनी सविस्तर माहिती दिली. 'सरस्वती' हे नांव सरस्वती नदीवरून ठेवण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले. श्रोत्यांचा या कार्यक्रमास उत्सफूर्त सहभाग लाभला.

**दि. १७ नोव्हेंबर २०१७ : 'इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी काल : आज–उद्या': डॉ. अच्युत गोडबोले** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञानगंगा' या कार्यक्रमात 'इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी : काल–आज–उद्या' या विषयावर डॉ. अच्युत गोडबोले यांनी उपस्थितांशी संवाद साधला. तत्पूर्वी मराठी विज्ञान परिषदेचे कार्यवाह श्री. अ. पां. देशपांडे यांनी डॉ. गोडबोले यांची माहिती सांगितली. या कार्यक्रमात डॉ. गोडबोले यांनी सांगितले की, आपण जेवढे टेक्नॉलॉजीशी जुळवून घेऊ, तेवढेच आपण 'सरव्हाईव्ह' करू शकू. जो कोणी टेक्नॉलॉजीशी जुळवून घेऊ शकणार नाही, तो इतरांपेक्षा मागे पडेल. आपण टेक्नॉलॉजी समजून घेतली पाहिजे. टेक्नॉलॉजी ही सर्व ठिकाणी उपयोगी आहे. आपण जेवढी प्रगती टेक्नॉलॉजीच्या क्षेत्रात करीत आहोत, त्याचे परिणाम आपल्याला दिसत आहेत; जसे नवीन नवीन शोध लागत आहेत. उदा. उडणारी कार, उडणारे कॅमेरे, पाण्यावर चालणारी बस ही झाली वाहनांमधली प्रगती. ऑनलाईन सेवा, इंटरनेट यामुळे आपण एका मिनिटात कोणतेही पत्र कोठेही पाठवू शकतो. ऑनलाईन मिटींग करू शकतो. भविष्यात याचा उपयोग घरी बसून ऑफिसची कामे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात होईल व हळूहळू ऑफिसेसची गरजच उरणार नाही. अतिशय रोचक पद्धतीने डॉ. अच्युत गोडबोले यांनी इंटरनेट आणि टेक्नॉलॉजीची प्रगती याबद्दल माहिती सांगितली. या कार्यक्रमास श्रोत्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

**दि. १९ डिसेंबर,२०१७ : 'भारतातील सोशल मार्केटींगचे प्रश्न सोडवण्यासाठी सात युक्त्या': डॉ. प्रा. समीर देशपांडे** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञानगंगा' या कार्यक्रमात 'भारतातील सोशल मार्केटींगचे प्रश्न सोडवण्यासाठी सात युक्त्या' या विषयावर डॉ. प्रा. समीर देशपांडे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. डॉ. प्रा. देशपांडे यांनी सांगितले की, मार्केटींग करताना सोशल मेसेज कशाप्रकारे देता येईल. जसे 'Smoking is Injurious to Health', 'condom use among men of reproductive age', 'alternative rides to reduce driving after drinking among young adult men', alcohol abstinence among pregnant women, hygiene among healthcare workers etc… अशा वेगवेगळ्या प्रकारे आपण सोशल मेसेज देऊ शकतो. या सर्वांबद्दल डॉ. प्रा. समीर देशपांडे यांनी सविस्तर माहिती सांगितली. या कार्यक्रमास श्रोत्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

**दि. १२ जानेवारी, २०१८ : 'नॅनोटेक्नॉलॉजी' : प्रा. मंदार देशमुख** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञानगंगा' या कार्यक्रमात 'नॅनोटेक्नोलॉजी' या विषयावर प्रा. मंदार देशमुख यांनी उपस्थितांशी संवाद साधला. प्रा. देशमुख यांनी, नॅनोटेक्नॉलॉजीमध्ये ग्राफीन या नॅनोमॉल्युक्युल्स् पासून बनलेल्या धातूचा ते कशा प्रकारे उपयोग करतात ते सांगितले. उदा. कोणतीही मोबाईलची चिप किंवा कंम्पुटरमधली हार्डड्राईव्ह ज्या पदार्थापासून बनवितात, त्यामध्ये ग्राफीन हा धातू वापरला जातो. या धातूमधील मॉलिक्युल्स् एकमेकांना घट्टपणे पकडून ठेवतात, त्यामुळे, त्याला तोडणे अशक्य होते. नवीन टेक्नोइव्हॉल्युशनमध्ये हा धातू गाडीवर रंगकाम करण्यासाठी वापरण्यात येऊ शकतो आणि तसे जर झाले, तर तो रंग कधीच निघणार नाही. अशा प्रकारे ग्राफीन या धातूचे विविध उपयोग व त्याच्या गुणधर्मांची माहिती प्रा. देशमुख यांनी सविस्तरपणे सांगितली. या कार्यक्रमाचा लाभ अनेक श्रोत्यांनी घेतला.

# अपंग हक्क विकास मंच

## कार्यवृत्त

महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींच्या विविध समस्या, संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती झाली आहे. मंचाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे आहेत. मंचाचे संयोजक विजय कान्हेकर व दत्ता बाळसराफ तर समन्वयक सुहास तेंडुलकर, अभिजीत राऊत, विजय कसबे आणि या मंचाचे संघटक म्हणून सौ. सुकेशनी मर्चंडे-शेवडे हे काम पाहतात.

**१) बारामती, जिल्हा पुणे : दिनांक ३१ ऑक्टोबर व १ नोव्हेंबर, २०१७ - श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधिर मुलांना मोफत आधुनिक डिजिटल श्रवणयंत्र वाटप शिबिर :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-अपंग हक्क विकास मंच, स्टारकी फाउंडेशन अमेरिका, आरव्हीएस एज्युकेशनल अँण्ड चॅरिटेबल फाउंडेशन मुंबई, नरोत्तम सक्सेरीया फाउंडेशन मुंबई, ठाकरसी ग्रुप मुंबई, विद्या प्रतिष्ठान बारामती आणि महात्मा गांधी सेवा संघ संचालित जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३१ ऑक्टोबर व १ नोव्हेंबर, २०१७ रोजी ग. दि. माडगुळकर सभागृह, विद्या प्रतिष्ठान, एमआयडीसी, बारामती, जिल्हा पुणे येथ सकाळी १०:०० ते सायं. ६:०० या वेळेत श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधिर मुलांना मोफत डिजिटल श्रवणयंत्र वाटप करण्यात आले. या शिबिरात एकूण १२०० लाभार्थीनी याचा लाभ घेतला.

या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अमेरिकेहून स्टारकी संस्थेचे अध्यक्ष व त्यांच्या पत्नी आणि इतर ३५ कार्यकर्त्यांची टीम या शिबिरात स्वत: सहभागी झाली होती. मा. खा. श्रीमती सुप्रियाताई सुळे यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम घेण्यात आला तर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान अपंग हक्क विकास मंच मुंबईचे संयोजक मा. श्री. विजय कान्हेकर, मा. श्री. दत्ता बाळसराफ, मा. श्री. निलेश राऊत, अपंग हक्क विकास मंच मुंबईचे समन्वयक मा. श्री. सुहास तेंडुलकर, अभिजीत राऊत, डॉ. कल्याणी मांडके आदी मान्यवर उपस्थित होते.

**पुणे : दि. २० नोव्हेंबर,२०१७ कृत्रिम साहित्य व सहाय्यभुत साधने वाटप शिबिर :** दिव्यांगांसाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयांमध्ये मोफत कृत्रिम साहित्य व साधनांचे वाटप शिबिराचे आयोजन केलेले आहे. दिव्यांगांची पूर्वतपासणी करून त्यांना आवश्यक त्या साधनांसाठी किंवा अवयवासाठी त्याचे मोजमाप घेऊन मोफत साहित्य उपलब्ध करुन दिले जाते. उदा. जयपूर फुट, कॅलिपर, कुबडी, एल्बो क्रचेस, वॉकिंग स्टिक, वॉकर, सर्जिकल शूज, ट्रायसिकल, व्हीलचेअर, स्प्लिंट्स, कमोड चेअर, सी.पी. चेअर, एम.आर. कीट, ब्रेल कीट, अंध काठी, अंध गॉगल, श्रवणयंत्र, बेल्ट्स, आदी साहित्य मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिरात वाटप करण्यात येते. सन २००९ पासून ते आजपर्यंत शासकीय योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील एकूण ४७,६३८ दिव्यांग व्यक्तिंना कृत्रिम अवयव व साहित्य साधनांचा थेट लाभ देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

या उपक्रमासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, पवार चॅरिटेबल ट्रस्ट मार्फत अद्ययावत अशी मोबाईल व्हॅन उपलब्ध करून देण्यात आलेली आहे, ज्यामध्ये कृत्रिम अवयव निर्माण केंद्र तयार करण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या अतिदुर्गम भागातील अखेरच्या अपंगांपर्यंत पोहचून विविध प्रकारचे कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधने जागेवर तयार करून तात्काळ रोपण केली जातात. यामुळे दिव्यांग व्यक्तिंची कृत्रिम अवयवाबरोबरच त्यांच्या जुन्या साधनांची देखभाल दुरुस्तीचा प्रश्न मार्गी लागलेला आहे. या नावीन्यपूर्ण व्हॅनमध्ये संपूर्ण अद्ययावत अशा मशीनरीसह श्रवण-हास चाचणीसाठी ऑडिओमेट्री युनिट बसवले असून, मतिमंद मुलांचा बुध्यांक टेक्निशियन्स, ऑडिओलॉजिस्ट, स्पिच थेरपिस्ट, सायकोलॉजिस्ट व त्यांचे सहाय्यक डेटा एन्ट्री ऑपरेटर, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, ड्रायव्हर व सहाय्यक अशी एकूण दहा ते बारा प्रशिक्षित लोंकांची टीम या व्हॅन सोबत कार्यरत असते. मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर पूर्वतपासणी व वाटप शिबिर या दोन टप्प्यांमध्ये आयोजित करण्यात येते. मागील वर्षापासून शासकीय योजना व यासाठी मिळणारा फंड बंद झाल्यामुळे निधी अभावी हे रचनात्मक कार्य थांबले होते. यामुळे महाराष्ट्रातील एकूण ३६ जिल्हयातील १७,४३२ गरजू लाभार्थी प्रतीक्षा यादीत होते.

ठाकरसी फाउंडेशन व नरोत्तम सकसेरीया फाउंडेशन यांनी यंदाच्या वर्षी मदतीचा फंड उपलब्ध करुन योगदान दिले आहे. यामुळे यंदाच्या वर्षी २० नोव्हेंबर, २०१७ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच, जिल्हा परिषद, पुणे महात्मा गांधी सेवा संघ आणि अलिमको यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्हयातील सर्व प्रवर्गातील एकूण १४,२४६ दिव्यांगांना कृत्रिम अवयव व साधने वाटप करण्यात आले.

**पुणे जिल्हयातील लाभार्थ्यांच्या साहित्य वितरणाबाबतचा तालुका निहाय सविस्तर तक्ता पुढीलप्रमाणे :-**

| अ. क्र. | साहित्याचे नाव | तालुकानिहाय साहित्य वितरण यादी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दौंड | इंदापुर | बारामती | पौंड | खडकवासला | भोर | सासवड | एकूण |
| १ | कॅलिपर | ४६ | ३८ | ४२ | ७३ | ९८ | ११५ | ४७ | ४५९ |
| २ | तीनचाकी सायकल | ३१ | ८५ | ४० | ३३ | ३० | ११० | ७८ | ४०७ |
| ३ | व्हिलचेअर | ४९ | २२ | ४९ | २१ | ४३ | ४० | - | २२४ |
| ४ | क्रचेस | ७६ | २७ | ५४ | २८ | ७१ | ११५ | १५ | ३८६ |
| ५ | कानाचे मशीन | ४० | ७८ | १३२ | ८० | ३८६ | १३८ | ५२ | ९०६ |
| ६ | सीपी चेअर | २ | २ | २ | ४ | ९ | ३ | ३ | २५ |
| ७ | जयपुर हात | १ | १३ | ७ | ९ | १ | २ | २ | ३५ |
| ८ | सेल फोन | ५ | ५ | ५ | २ | १८ | १० | ७ | ५२ |
| ९ | झिंक एअर बॅटरी | २४० | ४६८ | ७९२ | ४८० | २३१६ | ८२८ | ३१२ | ५४३६ |
| १० | पाय एके बीके | ५ | १० | १५ | ४ | ११ | २४ | १४ | ८३ |
| ११ | नी | ४ | १० | १५ | ११ | - | २४ | १४ | ७८ |
| १२ | वाकींग स्टीक | ४७ | १५ | ६७ | १९ | ६६ | ४६ | ४८ | ३०८ |
| १३ | मोटोराईज ट्रायसिकल | - | - | १ | ७ | - | ११ | ४ | २३ |

**सर्व मिळूण साहित्य एकूण वाटप १४,२४६ दिव्यांगांनी या कृत्रिम साहित्य साधनांचा लाभ घेतला.**

# शिक्षण विकास मंच

## कार्यवृत्त

महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण योगदान देण्याचे काम २००८ पासून शिक्षण विकास मंचाने केले आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे शिक्षण विषयक कार्यक्रम शिक्षण विकास मंचामार्फत आयोजित केले जातात. शिक्षण विकास मंचाच्या निमंत्रक मा. खा. सुप्रिया सुळे या आहेत. डॉ. वसंत काळपांडे मुख्य संयोजक आणि बसंती रॉय या विशेष सल्लागार म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. दत्ता बाळसराफ हे संयोजक आहेत. नजमा काझी, शुभदा चौकर, सुरेश पाटील हे सदस्य आहेत. तर समन्वयक म्हणून माधव सूर्यवंशी, मीनल सावंत काम पाहतात. शिवाय विविध कार्यक्रमानुरूप महाराष्ट्रातील शिक्षण तज्ज्ञ, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक यांचे वेळोवळी सहकार्य मिळत असते.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आयोजित 'सेमी इंग्रजी : काल, आज, उद्या' या विषयावरील राज्यस्तरीय शिक्षण परिषद मुंबई येथे दिनांक २५ नोव्हेंबर २०१७ रोजी पार पडली. या परिषदेस राज्यभरातून शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, संस्थाचालक, प्रशासकीय अधिकारी, अभ्यासक, पत्रकार, विद्यार्थी, पालक आदींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. या परिषदेच्या उद्घाटनापूर्वी सेमी इंग्रजी माध्यमाच्या विविध शाळेतील मुलांचा 'टॉक शो' झाला. या 'टॉक शो' चे संचालन प्राचार्य सुदाम कुंभार यांनी केले. या 'टॉक शो' मधून मुलांनी सेमी इंग्रजी माध्यमाची सद्यस्थिती; फायदे, त्रुटी आदींची चर्चा केली.

परिषदेचे उद्घाटन शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक मा.खा. सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते झाले. परिषदेच्या सुरुवातीला शिक्षण विकास मंचाच्या मार्गदर्शक श्रीमती बसंती रॉय यांनी शिक्षण विकास मंचाच्या कार्याची माहिती प्रास्ताविकातून दिली. सोबतच आजची परिषद कोणत्या कारणासाठी आयोजित करण्यात आली आहे या संदर्भातील भूमिका विषद केली. त्यानंतर शिक्षण विकास मंचच्या WhatsApp समूहावर झालेल्या चर्चेचे मराठीतील पहिले पुस्तक " WhatsApp चर्चा–शिक्षण विकासाच्या" याचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. आज समाजमाध्यमांमध्ये WhatsApp चे महत्त्वाचे स्थान आहे. या WhatsApp वर चांगली, विधायक चर्चा होऊ शकते याचा आदर्श म्हणजे हे पुसत्क आहे. या पुस्तकात गेल्या वर्षभरात शैक्षणिक विषयावर जी चर्चा झाली, त्यांचे संकलन करण्यात आले आहे. पुस्तकासंदर्भात मुख्य संपादक माधव सूर्यवंशी यांनी यासंदर्भातील भूमिका सांगितली. दरवर्षी वार्षिक शिक्षण परिषदेत शिक्षण विकास मंचच्या संस्थापक मुख्य संयोजक डॉ. कुमुद बन्सल यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिले जाणारे 'कुमुद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार' यावेळी प्रदान करण्यात आले. या वर्षाचा उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार ज्योत्स्ना प्रकाशनाच्या 'विधायक शिस्त' या पुस्तकास देण्यात आला. यावेळी पुस्तकाच्या लेखिका हेमा होनवाड आणि शिरीषा साठे यांचाही सत्कार मा.खा. सुप्रियाताई सुळे आणि प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा.शरद काळे यांच्या हस्ते करण्यात आला.

उद्घाटन समारंभाच्या वेळी मा. खा. सुप्रियाताई सुळे यांनी आपली 'सेमी इंग्रजी' बाबतची भूमिका मांडली. 'ग्रामीण भागात मराठी शाळांना सेमी इंग्रजीचा खूप मोठा आधार आहे. यामुळे मराठी शाळा तिथे टिकून आहेत; मात्र सेमी इंग्रजी अध्यापनाची अवस्था खूप वाईट आहे. त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. शिवाय महाराष्ट्र बोर्डाचा अभ्यासक्रम अन्य बोर्डाच्या तुलनेत (विशेषत : CBSE, ICSE) कमी दर्जाचा आहे यामुळे त्याचे ऑडीट होणे आवश्यक आहे. त्याचा दर्जा केंद्रीय बोर्डासारखा का करू नये? याबाबत या परिषदेत विचार मंथन व्हावे. या परिषदेतून एक चांगली गुणवत्तापूर्ण शिक्षणाची दिशा महाराष्ट्राला आपण द्यावी. तसेच अशा परिषदा विभागवार व्हाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त करून त्यांनी परिषदेसाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोप प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा. शरद काळे यांनी केला.

या परिषदेचे बीजभाषण ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ आणि शिक्षण विकास मंचचे संयोजक डॉ. वसंत काळपांडे यांनी केले. बीजभाषणात सेमी इंग्रजीची कालची–आजची आणि उद्याची स्थिती काय असेल याबाबतचे विवेचन करून या विषयावरील चर्चेला सुरुवात केली. यानंतरच्या सत्रात वंदना अतखेडे, ए.बी. भारद्वाज, गीता बालगंगाधरन, संदीप पवार रयत शिक्षण संस्थेचे धनावडे, महामुनी यांनी सादरीकरण केले.

भोजनोत्तर सत्रात पॅनल चर्चा झाली. शुभदा चौकर, पटेल , सुलोचना आसवले, सुदाम कुंभार यांनी सेमी इंग्रजीच्या अंमलबजावणीतील

अडचणी आणि उपाययोजना यावर चर्चा केली. या चर्चेचे संचालन नझमा काझी आणि विकास परब यांनी केले.

खऱ्या अर्थाने चर्चा रंगली ती 'सेमी इंग्रजी असावे की नसावे?' या विषयावर. या विषयावरील खुल्या चर्चेत राज्यभरातून परिषदेला उपस्थित राहिलेल्या प्रतिनिधींनी सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही बाजूंनी अभ्यासपूर्ण अशी चर्चा केली. परिषदेचा समारोप करीत असताना संयोजक डॉ. काळपांडे यांनी दिवसभर झालेल्या चर्चेचा आढाव घेतला; आणि पुढील दिशा स्पष्ट केली. आगामी काळात काय करता येईल याचा ॲक्शन प्लॅन त्यांनी दिला. परिषदेला उपस्थित राहिलेल्या सर्व मान्यवर प्रतिनिधीचे आभार शिक्षण विकास मंचचे समन्वयक श्री. सूर्यवंशी यांनी मानले.

## WhatsApp **चर्चेवरील मराठीतील पहिले पुस्तक :**
## WhatsApp **चर्चा- शिक्षण विकासाच्या**

अवघे जग बदलून टाकण्याची प्रचंड क्षमता माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात आहे. इंटरनेट, लॅपटॉप, आय-फोन, वायफाय, यूट्यूब, फेसबुक, ट्विटर, विकिपिडीया, सोशल कम्युनिटी साईटस्, गेम्स अप्लिकेशन, मॅसेंजर आणि त्याच्या जोडीला व्हॉटसॲप हे आजच्या पिढीचे परवलीचे शब्द. शिक्षक म्हणून मला या वेगाशी जुळवून घेता आले पाहिजे, हा विचार करून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा शिक्षण विकास मंच २००८ पासून शैक्षणिक क्षेत्रात सकारात्मक बदल व्हावेत म्हणून कार्यरत आहे. या मंचाने विद्यार्थी हिताचे अनेक उपक्रम यशस्वीपणे राबविले आहेत.

शिक्षणतज्ज्ञ, अभ्यासक, पत्रकार, शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य, प्राध्यापक, पालक विविध उपक्रमामुळे आमच्याशी जोडले गेले आहेत. त्यांच्याशी नियमित संपर्क आणि सुसंवाद व्हावा म्हणून २ ऑक्टोबर २०१५, गांधी जयंतीचे निमित्त साधून आम्ही शिक्षण विकास मंचच्या व्हॉटस्ॲप समूहाची सुरूवात केली. या समूहावर केवळ शैक्षणिक विषयावरील ज्ञानवर्धक चर्चा होणार असे बंधन आम्ही घातले. सुरुवातीला सवयीप्रमाणे सुप्रभात, शुभरात्री, सुविचार, फॉरवर्डेड पोस्ट काही प्रमाणात आल्या, मात्र, नंतरच्या काळात याला पूर्णपणे अटकाव केला गेला. सद्यकालीन शैक्षणिक विषयाचा वेध घेणारी अभ्यासपूर्ण समतोल अशी चर्चा हे आमच्या समूहाचे वैशिष्ट्य! संबंधित विषयाच्या संदर्भातील सकारात्मक-नकारात्मक बाबींची चर्चा स्पष्टपणे येथे होत असते. कधी-कधी एखाद्या महत्त्वाच्या विषयावरील चर्चा सलगपणे तीन-चार दिवस चालते. या समूहात जसे शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ आहेत, तसेच शासनाचे उच्चपदस्थ अधिकारी, उपक्रमशील शिक्षक आणि विविध विचारसरणी मानणारे सदस्य आहेत. यामुळे समूहावरील संवाद सर्वांगपरिपूर्ण असतो. या चर्चेचा फायदा शिक्षण क्षेत्रातील धोरणे ठरविताना, अडचणीची सोडवणूक करताना होत असतो. नवीन विषय, संदर्भ यामुळे सखोल अभ्यास करण्याची प्रेरणा मिळते. धोरणकर्त्यांना, अध्यापकांना, पत्रकारांना या समूहातील चर्चेची गरज जाणवते हे वारंवार सिद्ध झाले आहे. गेल्या वर्षभरात झालेल्या चर्चेचे संकलन 'WhatsApp चर्चा-शिक्षण विकासाच्या' या पुस्तिकेत झाले आहे. अभ्यासपूर्ण विश्लेषण करणारी ही चर्चा संकलित व्हावी. आणि WhatsApp सारख्या समाजमाध्यमाचा उपयोग सकारात्मक करता येतो हा संदेश देण्यासाठी ही पुस्तिका तयार करण्यात आली आहे.

पुस्तिकेत एकूण २६ प्रकरणे समाविष्ट करण्यात आली आहेत. लोकसहभागापासून ते सेल्फी निर्णयापर्यंतच्या सद्यकालीन संदर्भातील सर्व विषय यात समाविष्ट करण्यात आले आहेत. मराठी, इंग्रजी, गणित विषयाचे अध्यापन, श्रेणीविषय, वर्गरचना, उपक्रमशील शाळा आणि त्यांतील महत्त्वाचे उपक्रम, डिजिटल शाळा, RTE आणि CCE ची अंमलबजावणी, आजचा विद्यार्थी, मूलं घडताना घ्यावयाची काळजी, व्यक्तिविशेष आदी प्रकरणावर यात चर्चा करण्यात आली आहे. याचे विश्लेषण आणि समूहावरील सदस्यांची प्रतिक्रिया यात देण्यात आल्या आहेत. पुस्तकाच्या शेवटच्या भागात परिशिष्ट देण्यात आले आहे. शिक्षण विकास मंचाच्या समूहात असणाऱ्या सदस्यांची यादी त्यात देण्यात आली आहे. एकंदरीतच पुस्तक शिक्षण अभ्यासकांना, शिक्षकांना, पालकांना उपयुक्त ठरेल असेच आहे. जिज्ञासूंनी हे पुस्तक वाचून आपला अभिप्राय कळवावा.

# वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान

## कार्यवृत्त

जागतिक तापमानवाढीमुळे होणाऱ्या हवामानातील बदलांचा सामना करण्याची क्षमता निर्माण करणे ही या शतकातील अत्यंत आवश्यक गोष्ट बनली आहे. विशेषत: शेती-माती-हवा-पाऊस-पाणी-जैवविविधता-ऊर्जा यासंदर्भात बदलत्या हवामानाशी जुळवून घेणाऱ्या किंवा त्याविरुद्ध टिकून राहणाऱ्या उपाययोजना पुढे आणणे आणि त्यांची अंमलबजावणी करण्याचे आव्हान आपल्यासमोर उभे आहे. वसुंधरा अभियानामार्फत हे आव्हान पेलणारी भावी पिढी घडविण्याचा प्रयत्न शालेय पातळीवर केला जात आहे. याच उपक्रमांतील पुढील पाऊल म्हणजे मुलांचे हवामान अध्ययन केंद्र होय. हवामान बदलाचा परिणाम महाराष्ट्राचे पर्जन्यमान, शेती, माती, ऊर्जा, कचरा निर्मूलन आणि जैवविविधता यासंदर्भात ठळकपणे लक्षात येत आहे. गाव असो, की शहर, सर्वांनाच कमी-अधिक प्रमाणात हवामान बदलाचा फटका बसत आहे. हे लक्षात घेऊन मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यातील विविध शाळांमधील मुलांबरोबर स्थानिक पातळीवर साध्या-सोप्या पद्धतीने पाऊस मोजणे, तापमान मोजणे, मातीची व पाण्याची गुणवत्ता ओळखणे, वनस्पती व प्राण्यांच्या वाढीचा अभ्यास करणे, ऊर्जेचे पर्यायी स्रोत स्वीकारणे असे उपक्रम घेण्यात आले आहेत.

नोव्हेंबर महिन्यात सृष्टीज्ञान संस्थेकडे काम करण्यासाठी आलेल्या स्वीडन देशातील स्वयंसेविका टोवा आणि झेल्डा यांचे सर्व शाळांमध्ये हवामान बदल, कार्बन फूटप्रिंट या विषयावर सादरीकरण झाले. विद्यार्थ्यांनी त्यांना स्वीडन देशातील हवामान, हवामान विषयक समस्या याबाबत अनेक प्रश्न विचारले. त्याचप्रमाणे त्यांनी विचारलेल्या प्रश्नांनाही उत्तरे दिली. पवार पब्लिक स्कूलच्या भांडूप, डोंबिवली, कांदिवली, चांदिवली या सर्व शाखांमध्ये हे कार्यक्रम झाले. तसेच या महिन्यापासून रानपाखरे आश्रमशाळा, वरप आणि कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, तलासरी या शाळांनाही हवामान मापन उपकरणांचा संच देण्यात आला व तो कसा वपारावा याचे प्रात्यक्षिकही दाखवण्यात आले.

डिसेंबर महिन्यात शाळांच्या परिसरातील माती गोळा करून आणली गेली आणि मातीचे परीक्षण कसे करायचे याचे प्रात्यक्षिक दाखवले गेले. विविध प्रकारच्या चाळण्यांमधून माती चाळून दाखवली गेली. मातीची गुणवत्ता, तिची होणारी धूप, मातीचे प्रदूषण याबाबत विद्यार्थ्यांशी चर्चा करण्यात आली. जानेवारी महिन्यात हवामानाचे विविध घटक तापमान, आर्द्रता, हवेचा दाब, ढगांचे विविध प्रकार याबाबत प्लॅस्टिकच्या बॉटल्स आणि फुगे वापरून विविध प्रयोग करुन दाखविण्यात आले. हे प्रयोग बघताना विद्यार्थ्यांना खूप मजा आली तसेच हवामानातील सर्व घटकांचा परस्परांशी काय आणि कसा संबंध आहे हेही लक्षात आले. त्याचबरोबर पवार पब्लिक स्कूल, चांदिवली यांची ऐरोली येथील सागरी आणि किनारी जैवविविधता केंद्राला क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली होती.

# कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम

## कार्यवृत्त

समाजातील गोरगरिब, दीनदुबळे व मागास वर्गाच्या लोकांना त्यांच्या आर्थिक अपात्रतेमुळे किंवा मागासलेपणामुळे अन्याय सहन करण्याची पाळी येऊ नये यासाठी उपाय योजावेत अशा प्रकारचे मार्गदर्शन आपल्या संविधानामध्ये करण्यात आले आहे. या तरतूदीला अनुसरुन भारतीय संसदेने १९८७ मध्ये विधी सेवा प्राधिकरण अधिनियम पारित केला आहे. त्या अधिनियमानुसार संपूर्ण देशामध्ये गरीब व तळागाळातील लोकांना मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला पुरविला जातो.

सन १९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने 'यशवंराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम' या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व सामाजिक कार्यकर्ते काम करतात. कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमचे सदस्य सचिव म्हणून श्री. म. बा. पवार हे कामकाज पहात होते. त्याठिकाणी मा. विनायकराव नारायण कांबळे (विधी सल्लागार सदस्य-सचिव) यांनी कामकाज पाहण्यास सुरुवात केली आहे, २०१६ पासून श्रीमती शोभा लोंढे या कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमचे सदस्य असून त्या या कामकाजाला मदतनीस आहेत.

- **फोरम मार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारचे काम चालते.**

१. समाजातील गोरगरिब तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत तोंडी सल्ला देणे.

२. प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नांसंबंधी सखोल अभ्यास करुन गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.

३. काही वेळा पत्रव्यवहाराव्दारे गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.

४. पक्षकारांच्या तंटयामध्ये सामोपचाराने आपसात तडजोड घडवून आणणे.

५. विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन कायद्याचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.

६. विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यानुसार बनविण्यात आलेल्या नियमांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन नियमांचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.

७. सर्वसामान्य लोकांना वेळोवेळी कायद्यांची विशेष माहिती करुन देण्यासाठी तज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.

८. सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी वरचेवर विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करणे.

९. विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे तसेच अशा विद्यार्थ्यांसाठी 'वकिलांची व्यावसायिक नीतिमत्ता' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करणे.

१०. संबंधित न्यायालयाच्या सहकार्याने व त्यांच्या संयुक्त विद्यमाने त्या न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये तडजोड घडवून आणण्यासाठी लोकन्यायालय किंवा लोक अदालतचे आयोजन करणे.

११. न्यायालयामध्ये मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर होण्यासाठी प्रयत्न करणे.

- **फोरमच्या बैठका :**

कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजनेच्या अंमलबजावणीबाबत विचार करुन धोरणात्मक निर्णय झालेल्या व कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी, पुढील कार्यक्रमाची आखणी करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुसऱ्या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात.

या बैठकांना फोरमचे जास्तीत जास्त सदस्य उपस्थित राहतात. त्यानुसार गेल्या १ ऑक्टोबर २०१७ ते ३१ जानेवारी २०१८ या चार महिन्यामध्ये फोरमच्या ४ मासिक बैठका झाल्या. या ४ बैठकांमध्ये एकूण अंदाजे ६९ विषयांसंबंधी चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या बैठकांना एकूण ६४ सदस्य उपस्थित होते. त्याप्रमाणे प्रत्येक

बैठकीला सरासरी १५ सदस्य उपस्थित होते. बैठकीमध्ये ॲड. भूपेश सामंत, ॲड. डॉ. निलेश पावसकर, ॲड प्रकाश देशमुख या मा. सदस्यांनी अध्यक्ष म्हणून काम पाहिले.

- **फोरमच्या उपसमितीच्या बैठका :**
  वेळोवेळी विविध विषयांचा सखोल अभ्यास करण्यासाठी फोरमच्या उपसमित्या गणित केल्या जातात. या समित्यांमध्ये सक्रिय सदस्यांचा समावेश केला जातो. अशा उपसमित्यांनी दिलेल्या अहवालानुसार फोरमचे निर्णय घेण्यात येतात.

- **विभागांची बैठक :**
  ८ ऑक्टोबर २०१७ मध्ये ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा भरविण्यासंबंधी विचार करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सर्व विभागाच्या प्रतिनिधींची बैठक मा. सरचिटणीस श्री. शरद काळे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक १९ जुलै २०१७ रोजी बोर्ड रुममध्ये संपन्न झाली. बैठकीला १४ प्रतिनिधी उपस्थित होते. अंदाजे ३९ बाबींसंबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले.

- **ज्येष्ठ नागरिक संघाच्या प्रतिनिधींची बैठक :**
  रविवार दिनांक ८ ऑक्टोबर २०१७ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई केंद्राच्या मुख्य सभागृहामध्ये ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा आयोजित करण्यात आला. यावर्षी कुलाबा ते माहिम व सायन या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या अंदाजे २५ ज्येष्ठ नागरिक संघांनी मेळाव्यामध्ये सहभाग घेतला. एकूण ३०० ज्येष्ठ नागरिक मेळाव्याला उपस्थित होते. आता पर्यत एकूण ५७ ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये ३० पुरुष व २७ महिला आहेत. त्यामधून पूर्वीच्या ४८ सत्कारमूर्तींनाही बोलवण्यात आले होते. त्यापैकी २० सत्कारमूर्ती उपस्थित होते. सरचिटणीस श्री. काळेसाहेब समारंभाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते, प्रमुख पाहुणे मा. सौ. रेखा दिवेकर या उपस्थित होत्या. फेस्कॉमचे श्री. विजय औंधे व श्री. प्रकाश माने हे समारंभाला उपस्थित होते.

कार्यक्रमात –

(१) श्रीमती उषा शंकरराव जाधव, चुनाभट्टी, मुंबई

(२) डॉ. रेखा भातखंडे, माहिम, मुंबई

(३) श्री. वसंत मोरेश्वर टिल्लू, सायन, मुंबई

(४) श्री. अनंत कृष्णा पाटील, चुनाभट्टी, मुंबई आणि 'कर्तबगार ज्येष्ठ नागरिक संघ' म्हणून संवाद ज्येष्ठ नागरिक संघ माहिम, मुंबई. यांना पुरस्कार देण्यात आले.

सोमवार, दिनांक २ ऑक्टोबर २०१७ रोजी कायदे विषयक सहाय्य व सल्ला फोरम व महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यत 'सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा २०१७' या विषयाबाबत नियम व अटी बनविण्याबाबत बैठक झाली. ही बैठक बोर्डरुम ५ वा मजला, यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे घेण्यात आली.

**बैठकीला खालील सदस्य उपस्थित होते.**

| क्र. | नाव |
|---|---|
| १ | ॲड.डॉ. निलेश पावस्कर |
| २ | श्री. अविनाश पाटील |
| ३ | ॲड. मनिषा महाजन |
| ४ | ॲड. शोभा लोंढे |
| ५ | श्रीमती नंदिनी जाधव |
| ६ | ॲड. रमेश महाजन |
| ७ | ॲड. भूपेश सामंत |
| ८ | श्री. शहाजी भोसले |
| ९ | ॲड. तृप्ती पाटील |
| १० | श्री. अनिल चाळके |
| ११ | सौ. स्नेहलता अ. पाटील |
| १२ | श्रीमती रंजना गंवादे |
| १३ | कुमारी आब्रिता ढवळे |
| १४ | श्रीमती मुक्ता दाभोलकर |
| १५ | ॲड. संजय वि. बनसोडे |
| १६ | ॲड. संजय दुबे |
| १७ | श्रीमती सुशिला मुंडे |
| १८ | श्री. प्रशांत पोतदार |
| १९ | ॲड. गींताजली शिंदे |
| २० | श्री. नितीनकुमार राऊत |
| २१ | श्री. माधव बागवे |
| २२ | ॲड. महेश पवार |
| २३ | श्री. रमण लोखंडे |
| २४ | श्री. नंदकिशोर तळाशिलकर |

- **कायदेविषयक सल्ला केंद्र :**
  गोरगरीब व गरजू लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ६ च्या नंतर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या

दुस-या मजल्यावरील ग्रंथालयामध्ये कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र चालविले जाते. गेल्या सहा महिन्यामध्ये या केंद्रात एकूण ११ बैठका झाल्या. या बैठकांमध्ये एकूण २० लोकांना (महिला व पुरुष) तोंडी सल्ला देण्यत आला. सल्ल्याचे विषय अंदाजे विवाह, घटस्फोट, हुंडा, पोटगी, वारसा हक्क, भागिदारी, कामगार कायदा, माहितीचा अधिकार, सेवा नियम, सहकारी कायदा, पंजीकरण, मुद्रांक, फौजदारी, कौटुंबिक अत्याचार, ग्राहक संरक्षण, भाडे नियंत्रण, गृहनिर्माण इत्यादी विषयासंबंधी होते. आपली प्रकरणे न्यायालयामध्ये चालविण्यासाठी मोफत वकीलाची सेवा मागणा–या लोकांना शासनाचे संबंधित विधी सेवा प्राधिकरणाकडे पाठविण्यात आले. या केंद्राचे काम सर्वश्री श्री. म.बा. पवार, श्री.भूपेश सामंत व श्रीमती प्रितिंदर सिंग इत्यादी वकिलांनी पाहिले.

- **मोफत समुपदेशन व तडजोड केंद्र :**
  दर मंगळवारी सायंकाळी ५ ते सायं. ७ या वेळांत समुपदेशन व समेट केंद्राचे आयोजन केले जाते. दोन वादग्रस्त पक्षकारांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न या केंद्रामध्ये केला जातो. या कामाला गती देण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत.

- **आपल्या कायद्याची माहिती करुन घ्या.** (Know your Law) :
  या व्याख्यानमालेअंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यातून एकदा कायदे पंडितांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. सध्या इमारतीचे पुनर्विकास व माहितीचा अधिकार आणि सायबर कायदा या कायद्यावर व्याख्याने आयोजित करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

- **'वकीलांची व्यवसायिक नीतीमत्ता' या विषयावर चर्चासत्र :**
  विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबविले जातात आणि त्यापैकी वकीलांच्या व्यावसायिक नीतिमत्ता (Professsional Ethics of Lawyers) या विषयाबाबत नवीन होतकरु वकीलांना जाणीव करुन देण्यासाठी चर्चासत्राचे आयोजन केले जाते. विधी शाखेतील विद्यार्थ्यांना याचा चांगला उपयोग होतो. सध्या अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

- **विधी साक्षरता कार्यशाळा :**
  लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी सबंधित असलेल्या कायद्याची माहिती करुन देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळ्या घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदाहणार्थ – पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, सहकारी गृह निर्माण संस्थेचे सदस्य, सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त, सार्वजनिक संस्थेचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गेल्या सहा महिन्यांमध्ये अशा प्रकारच्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले

  रविवार दिनांक १२ नोंव्हेबर २०१७ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम आणि अर्नाळा युवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने, कै. रामचंद्र नाना भोईर सभागृह, अर्नाळा ग्रामपंचायत, अर्नाळा, तालुका वसई, जिल्हा पालघर, येथे सामाजिक कार्यकर्ते, युवक, युवती महिला व पुरुषासाठी एकदिवसीय विधी साक्षरता कार्यशाळा घेण्यात आली. भाषणाचे माध्यम मराठी व हिंदी होते.

  रविवार दिनांक २८ जानेवारी २०१८ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम आणि रोटरी क्लब ऑफ डोंबवली (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने, रोटरी भवन, एम.आय.डी.सी. क्षेत्र, पेंढारकर महाविद्यालयासमोर, डोंबवली (पूर्व), येथे महिलांसाठी एक दिवशीय विधी साक्षरता कार्यशाळा घेण्यात आली. भाषणाचे माध्यम मराठी व हिंदी होते.

- **विधी साक्षरता कार्यशाळेत शपथ कार्यक्रम व निबंधांना बक्षिसे :**
  सर्व विधी साक्षरता कार्यशाळांमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे सांधिक वाचन करण्यात येते. तसेच संविधानातील मूलभूत कर्तव्य पालनासंबंधी शपथा घेण्यात येतात. त्याचप्रमाणे अविवाहित मुले व मुली यांच्याकडून हुंडाबंदीसंबंधी शपथा घेतल्या जातात.

  विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी फोरमची एक खास योजनाही आहे. त्या योजनेनुसार झालेल्या कार्यशाळेबाबत अथवा कार्यशाळेत शिकविण्यात आलेल्या एका किंवा अनेक विषयां बाबत विद्यार्थ्यांना निबंध लिहिता येतात व त्या निबंधाच्या गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या स्वरुपात बक्षिसे दिली जातात. बक्षिसे संबंधित विद्यालये किंवा महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पाठविली जातात. विद्यालयाच्या किंवा महाविद्यालयाच्या समारंभामध्ये संबंधित विद्यार्थ्यांना बक्षिसे दिली जातात.

- **विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये शिकविलेले कायदे :**
  विधी कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती करुन देण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश होतो. (१) भारतीय संविधान, (२) विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७, (३) हुंडाबंदी अधिनियम १९६१, (४) भारतीय दंड

संहिता १८६०, (५) ग्राहक सरंक्षण कायदा १९८६, (६) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३, (७) हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ व इच्छापत्र कायदा, (८) गुंतवणूकीसंबंधीचे नियम, (९) कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५ (१०) माहितीचा अधिकार कायदा २००५, (११) हिंदू विवाह कायदा १९५५, (१२) मुस्लीम कायदा, (१३) पोटगी संबंधीचे कायदे, (१४) महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३, (१५) हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६, (१६) हिंदू दत्तक व पोटगी अधिनियम १९५६, (१७) संपत्ती हस्तातरण अधिनियम १८८२, (१८) विशेष विवाह कायदा १९५४, (१९) बाल विवाह बंदी अधिनियम २००७, (२०) महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम १९९८, (२१) न्यायालयाची बहुस्तरीय व्यवस्था(तालुका न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतची माहिती), (२२) स्त्रीयांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिबंध) अधिनियम १९८६, (२३) विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५, The Persons with Disabilities ( Equal apportunities, Protection of rights and full partilcipation) Act १९९५ (२४) स्वमग्न असलेल्या, मस्तिष्कघात झालेल्या, मंतिमंद व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९, ( The National Trust of welfare of person with autism, cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act १९९९) (२५) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ ( The Immortal Traffic (Prevention) Act १९५६ (२६) राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१, (२७) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, (२८) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७, (२९) महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९, (३०) महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परिक्षांमध्ये होणा–या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२, (३१) मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध), (३२) मुस्लीम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम १९८६, (३३) महाराष्ट्र झोपडपी (सुधारणा, निमूर्लन आणि पुनर्रविकास) अधिनियम १९७१, (३४) भारतीय वारसा हक्क कायदा १९२५, (३५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०,

(३६) मुंबई मुद्रांक कायदा १९५८, (३७) गृहनिर्माण संस्थांचे विनियम, (३८) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९, (३९) मुस्लिम व्यक्ती विषयक विधी (शरियत) प्रयुक्ती १९३७ (४०) नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, (४१) भारतीय मुद्रांक कायदा १८९९, (४२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, (४३) प्रसूती विषयक लाभ अधिनियम १९६१, (४४) सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०, (४५) अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, (४६) मोटार वाहन अधिनियम १९८८, (४७) जन्म व मूत्यू नोंदणी अधिनियम १९६९, (४८) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, (४९) महाराष्ट्र भांडे नियंत्रण अधिनियम १९९९, (५०) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, (५१) माता पिता व ज्येष्ठ नागरिक यांची पोटगी व कल्याण अधिनियम २००७, (५२) मुंबई पोलीस अधिनियम १९५०, (५३) जादूटोणा विरोधी कायदा २०१३, (५४) हिंदू मायनॉरिटी अॅन्ड गार्डीयन शिप अॅक्ट, १९५६, (५५) गार्डीयनशिप अॅन्ड वॉर्डस् अॅक्ट, (५६) कामाच्या ठिकाणी महिलांना लैंगिक छळ (प्रतिबंध, बंदी, तक्रार व निवारण) अधिनियम २०१३ (५७) ( The Sexual Harassment of women at work Place (Prevention, Prohobition and Redressal) Act 14 of 2013.

**खालील वक्त्यांनी विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले.**

| | |
|---|---|
| (१) | मा. विनायकराव कांबळे–विधी सल्लागार व सदस्य/सचिव |
| (२) | अॅड. प्रमोद ढोकळे, |
| (३) | डॉ.अॅड.निलेश पावसकर, |
| (४) | अॅड. हेमंत केंजारळकर |
| (५) | अॅड. अजय केतकर, |
| (६) | अॅड. भूपेश सामंत |
| (७) | अॅड. डॉ. जे.बी.पाटील |
| (८) | प्रा.नारायण राजाध्यक्ष |
| (९) | अॅड.प्रकाश देशमुख |
| (१०) | श्री. दिलीप तळेकर |
| (११) | श्री. म.बा. पवार |

# सृजन

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर 'सृजन' विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास आणि विविध कलांची तोंडओळख करुन त्यांचे विद्यार्थी जीवन समृद्ध व्हावे या करिता 'सृजन' हा उपक्रम चालविण्यात येतो. सर्जनशीलतेचा आविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्तकलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

सृजनची संकल्पना आणि संयोजन मा. सौ. सुप्रियाताई सुळे यांची असून सुप्रसिद्ध चित्रकार श्री. डग्लस जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग सन्माननीय सल्लागार म्हणून काम पाहतात. श्री. विद्याधर खंडे या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम करतात.

| अ.क्र. | दिनांक | विषय | संसाधन व्यक्ती |
|---|---|---|---|
| १ | १ ऑक्टोबर १७ | वाचन | प्राचार्य श्री सतीश चिंदरकर, संस्थापक अनुयोग विद्यालय मुंबई |
| २ | ५ नोंव्हेंबर १७ | विज्ञान खेळणी | श्री. अभय यावलकर, संचालक–विज्ञान शिक्षण आणि उर्जा संशोधन संस्था. |
| ३ | ३ डिसेंबर २०१७ | जादुचे प्रयोग | जादुगार पी. बी. हांडे |

**'स्त्री मध्येसुद्धा कर्तृत्व असतं. पण, आपल्या समाजात महिलांच्या कर्तृत्वाला संधी दिली जात नाही. जगात जिथे पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून पन्नास टक्के स्त्रिया काम करतात, तिथली गरिबी गेली आहे. स्त्री जिथे घराच्या चौकटीत ठेवली गेली, तिला बाहेर पडू दिलं गेलं नाही, तिथे सगळ्या सामाजिक, आर्थिक समस्या उद्‌भवल्या आहेत. मग ते पाकिस्तान असो, श्रीलंका असो, नेपाळ असो की बांगलादेश असो. या सगळ्या ठिकाणी थोड्याफार फरकाने हेच चित्र बघायला मिळतं.'**

**– मा. शरद पवार**

# महाराष्ट्र महिला व्यासपीठ

## कार्यवृत्त

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने महिलांची शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, विविध कार्यशाळा आणि इतर कार्यक्रम यांच्या माध्यमातून कृतिशील प्रयत्न केले जातात. संयोजिका रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका ममता रमेशचंद्र कानडे महिला व्यासपीठाचे काम पाहतात. त्यांना संजना पवार यांचे सहकार्य असते.

महिलांना उपयुक्त प्रशिक्षण देणे हा महिला व्यासपीठाचा सतत प्रयत्न असतो. जेणेकरून त्या व्यासपीठाच्यावतीने प्रावीण्य मिळवून आपल्या स्वतःचे अथार्जन करू शकतात.

अनेकविध कार्यक्रम व प्रशिक्षणाबरोबर एक उपयुक्त असे प्रशिक्षण घेतले जाते, ते म्हणजे 'सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण'.

मुंबईमध्ये २० ते ४० हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. या सर्व संस्थांचे काम चांगले होण्यासाठी शासनाचे कायदे किंवा उपविधी लोकांना माहीत असणे आवश्यक आहे. हे लक्षात घेऊन महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे जून २०१० सालापासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई मध्ये 'सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण' दिले जाते. या कार्यशाळेला मा. प्रभाकर चुरी, मा. देवयानी गोरे, ॲड. प्रमोद कुमार व सहकारी क्षेत्रातील इतर मान्यवरांचे मार्गदर्शन मिळते. या कार्यशाळेचे फायदे म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्थेत पूर्ण वेळ/अर्धवेळ नोकरी मिळू शकते. हे प्रशिक्षणार्थी सल्लागार म्हणूनही चांगले काम करू शकतात व आपल्या स्वतःच्या राहत्या सोसायटीत मॅनेजिंग कमिटीत चांगले काम करू शकतात. त्यांना सामजिक ज्ञान/भान याची जाणीव होते. आतापर्यंत २० ते अगदी ७० वर्षे वयाच्या ५०० च्या वर प्रशिक्षणार्थींनी हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. त्यांना परीक्षा घेऊन प्रमाणपत्र देण्यात येते. सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात २० वा वर्ग घेण्यात आला होता. दिनांक ८ नोव्हेंबर २०१७ रोजी या प्रशिक्षणाच्या २० व्या वर्गाचा  प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम संपन्न झाला. २० यशस्वी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देण्यात आले.

दिनांक २ डिसेंबर २०१७ रोजी 'सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण' या प्रशिक्षणाच्या संबधित जी.एस.टी., कचरा व्यवस्थापन व उपविधीतील बदल या तीन विषयासंदर्भात एकदिवसीय चर्चासत्र घेण्यात आले. मा. अजित जोशी (सहायक प्राध्यापक पार्ले टिळक मॅनेजमेंट स्कूल) यांनी जी.एस.टी. या विषयावर खूप महत्त्वपूर्ण माहिती दिली, मुंबई महानगरपालिकेच्या निवृत्त अधिकारी मा. सीमा रेडकर यांनी घन कचरा व्यवस्थापनसंदर्भात मोलाची माहिती सांगितली. मा. प्रभाकर चुरी यांनी 'उपविधीतील बदल' याविषयी चर्चा केली. या चर्चासत्राला सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षणातील मागील वर्गाच्या प्रशिक्षणार्थी तसेच इतर लोकांचीही उपस्थिती होती.

आमची उद्दिष्टे सरळ, सोपी व समाजाचे भले व्हावे या दृष्टिकोनातूनच आहेत.  आम्ही सतत लोकांना काय उपयुक्त देऊ शकतो हाच विचार करत असतो. खूप मोठ्या प्रमाणात नाही; पण ज्या समाजात आपण वावरतो व ज्याच्याकडून आम्हालाही खूप काही शिकायला मिळते, त्या समाजाचे देणे परत करणे, हा आमचा खारीचा नाही; पण मुंगीचा वाटा नक्कीच आहे. आजही आमच्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीकडून आम्हाला आमच्या कामाची मिळालेली दाद व भविष्यासाठीच्या शुभेच्छा हेच आमचे उद्दिष्ट सफल करते. हाच विचार घेऊन आम्ही भविष्यातही खूप काही स्त्रियांसाठी व समाजासाठी करत राहणार आहोत.

# यशवंतराव चव्हाण ग्रंथालय, मुंबई

## कार्यवृत्त

**ग्रंथालयाविषयी माहिती :** ग्रंथालयात विविध नियतकालिके, समाजशास्त्र, शेती, इतिहास, कायदा, संस्कृती इत्यादी विषयांवरील पुस्तके, आत्मचरित्रे, धर्मकोश, विश्वकोश, गॅझीटीयर, अॅटलास, इअरबुक डिक्शनरी, निरनिराळ्या कायद्याचे ग्रंथ उपलब्ध आहेत. वेळोवेळी ग्रंथालयाला अनुसरून नवीन पुस्तके खरेदी करण्यात येतात. ग्रंथालयीन नियमानुसार ग्रंथालयाची मांडणी केली आहे. ग्रंथालयाचा वाचकांकरिता जास्तीत जास्त वापर व्हावा यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. तसेच पुस्तके शोधण्याकरिता मशीन कॅटलॉगच्या सहाय्याने वाचकांना मदत होते. डिडिसी–२३ (डेव्ही डेसिमल क्लासिफिकेशन) नुसार ग्रंथांचे वर्गीकरण केले आहे. मुख्य वर्गांक आणि त्याचे उपवर्ग यानुसार ग्रंथांची मांडणी केलेली आहे. सर्व ग्रंथ याच पद्धतीप्रमाणे कपाटात ठेवण्यात आले असून त्यामुळे संगणकीय सहाय्याने साहित्य शोध जलद गतीने व अचूक घेता येतो.

**ग्रंथालयीन सभासद :** यशवंतराव चव्हाण ग्रंथालय हे संदर्भ ग्रंथालय असून ग्रंथ ग्रंथालयात वाचण्याची किंवा घरी घेऊन जाण्याची सुविधा आहे. याकरिता वार्षिक वर्गणी रु. ५००/– व अनामत रक्कम रु. ५००/– आहे. सभासदांना एकावेळी एक पुस्तक/ग्रंथ देण्यात येईल. ते पंधरा दिवसात परत करणे आवश्यक आहे. तसेच संदर्भग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करता येईल. संदर्भ ग्रंथ घरी नेता येणार नाही. पुस्तकाची किंमत भरलेल्या अनामत रक्कमेपेक्षा जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकाच्या किंमती एवढी अनामत रक्कम भरून पुस्तक घरी नेता येईल. महाविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी/संशोधक यांच्याकरिता सवलतीची वार्षिक वर्गणी रु. ५०/– व अनामत रक्कम रु. १००/– आकारण्यात येते. या सभासदांना ग्रंथ, नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी/संदर्भासाठी देण्यात येतात. घरी ग्रंथालयाबाहेर नेण्याकरिता देण्यात येणार नाही. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र यांच्या नियमाप्रमाणे ग्रंथालयाचे व्यवस्थापन संगणकीकरण करण्यात आले आहे.

बदलत्या काळानुसार ग्रंथ संग्रहालय हायटेक होणार आहे. आजची ग्रंथालये आधुनिक ज्ञानाधिष्ठित कार्य करीत आहेत. नावीन्यपूर्ण सुधारित ज्ञान वाढविणे हे ग्रंथालयातील ज्ञान व्यवस्थापनाचे उद्दिष्ट आहे. यासाठी नवीन संकल्पनांचा अवलंब करून अधिकाधिक गुणात्मक सेवा उपभोक्त्यांना उपलब्ध करून देणे ग्रंथालयाचे काम आहे. ग्रंथालयातील संग्रहात आता छापील ग्रंथांबरोबर विविध प्रकारचे ग्रंथेतर साहित्य येऊ लागले आहे. डिजिटल ज्ञान केंद्राच्या माध्यमातून सहज सुलभतेने अशा साहित्याची हाताळणी करता येते. ऑनलाईन डेटा तात्काळ डाऊनलोड करता येतो. या प्रकारच्या सुविधा विद्यार्थी, संशोधक, यांच्याकरिता उपलब्ध करण्यात येत आहे.

**ग्रंथालयाचे संगणकीकरण :**

- संगणकीकृत ग्रंथालय व्यवस्थापनाचा वापर ग्रंथालयातील पारंपरिक
- माहिती तंत्रज्ञान गरज
- ग्रंथालयातील ग्रंथाच्या वाढत्या संख्येच्या
- कार्ये व तंत्रज्ञानाधारित नवीन सेवा यांचा मेळ घालणे कामावर नियंत्रण ठेवणे इत्यादी.

**ग्रंथालयात संगणकाचा वापर करताना खालील गोष्टींचा अंतर्भाव होतो :**

- ग्रंथोपार्जन – Acquisition
- वर्गीकरण – Classification
- तालिकीकरण – Catalogue
- देवघेव – Circulation
- निर्देश – Index
- प्रलेखन – Document
- ग्रंथ पडताळणी – Stock taking
- प्रचलित जागरूकता सेवा – CAS
- निवडक माहितीचे प्रसारण – SDI
- माहितीची हाताळणी
- पुनरावलोकन शोध पद्धती इत्यादी– Retrospective Search System

**ग्रंथालयाचे संगणकीकरण करताना त्यापासून मिळणारे फायदे खालीलप्रमाणे आहेत. (**Advantages**)**

- ग्रंथालयातील काम व सेवा यामध्ये उत्पादक वाढ होते.

- ग्रंथालयाच्या सेवा ग्रंथालयाच्या क्षेत्राबाहेर व्यापक करता येतात.
- ग्रंथालयाबाहेरील संगणकीय जाळ्यामुळे ग्रंथालयातील साधन वाटणीमध्ये भाग घेता येतो.
- ग्रंथालयातील साहित्याचा योग्य व जास्तीत जास्त वापर होतो.
- ग्रंथालयाच्या संगणकीकरणासाठी काही प्रणाली विकसित केलेल्या आहेत. उदा– सीडीएस, आय. एस. आय. एस., लायब्ररीयन, स्लीम, लिबसीस, संजय कोहा इत्यादी.
- आधुनिक काळात ग्रंथालये ही माहिती केंद्रे बनल्यामुळे ग्रंथलयांचे संगणकीकरण (यांत्रिकीकरण) आवश्यक झाले आहे. म्हणून संगणक ही काळाची गरज आहे. माहितीच्या वेगामुळे संप्रेषणाचाही वेग वाढलेला आहे.
- संगणकामुळे माहितीच्या वाढत्या वेगाशी जुळवून घेणे शक्य होते.
- संगणकीय तंत्रज्ञानामुळे उपलब्ध माहितीचे यंत्र वाचनीय स्वरूप शक्य होते.
- इतर ग्रंथालयांबरोबर साधन वाटणी होऊ शकते.
- अनेक उद्योजकांकडून यंत्र वाचनीय स्वरूपातील नोंदीचा उपयोग वेगवेगळ्या हेतूसाठी कित्येक वेळा केला जातो.
- वापरण्यास सोपे आहे.
- कामातील गती व गुणवत्ता वाढते.
- माहितीवर प्रक्रिया करणे व उपयोजकांचा आणि ग्रंथालय कर्मचाऱ्यांचा माहिती पुनर्प्राप्तीसाठी लागणारा वेळ वाचविणे.
- ग्रंथालयातील कर्मचारी वर्गाच्या कामातील तोचतोपणा टाळता येतो. इत्यादी.

**ग्रंथालयातील यांत्रिकीकरणाची क्षेत्रे : (Areas of Library Automation) :**

१) पार्श्वभूमी क्षेत्र (House Keeping), कार्यक्षेत्र ग्रंथोपार्जन (Aquisition), वर्गीकरण (Classification), तालिकीकरण (Catalogue), ग्रंथ देवघेव (Circulation), ग्रंथ पडताळणी (Stock taking), कालिक नियंत्रण (Downloding) Serial Control या गोष्टी येतात.

२) ग्रंथालयीन सेवा (Library Service Activities) : यामध्ये निवडक माहितीचे प्रसारण आणि गतानुलक्षी शोध पद्धती यासाठी उपयोगी माहिती हाताळणी.

वरील प्रक्रियेनुसार सर्व कामे यशवंतराव चव्हाण ग्रंथालयात केली जातात.

अ) **E-resources** (यांत्रिकस्रोत)– इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या विकासामुळे डिजिटल किंवा ई–स्वरूपात माहिती प्रकाशित करणे शक्य झाले आहे. छापील साहित्य प्रकाशनाप्रमाणे ई–स्वरूपातील साहित्य प्रकाशनाचा वेग वाढतो आहे. या पार्श्वभूमीवर ग्रंथालयामध्ये ई–स्वरूपात विविध साहित्यही हळूहळू वाढते आहे. ई–स्वरूपातील साहित्याच्या ग्रंथालय संग्रहातील समावेशामुळे ग्रंथालय साहित्य संग्रहाचे स्वरूप बदलत आहे. जवळ जवळ सर्व विषयात आज ई–स्वरूपातील साहित्य प्रकाशित होत आहे. उदा.

अ) ई–जर्नल पूर्ण स्वरूपात (E-Journal Full Texts)
ब) बुक्स
क) संदर्भ डेटाबेस (Subject Ref. Database Abstract) सूचीबद्ध
ख) संदर्भ डेटाबेस (पूर्ण स्वरूपात)
ग) सांख्यिकी माहितीचे डेटाबेस (Census Data)
घ) भौगोलिक माहिती संदर्भ डेटाबेस (Georeference Database)

१) ERIC - ERIC (Education Resources Information Centre) हा एक ऑनलाईन संदर्भ डेटाबेस आहे. ERIC हे United States Department of Education च्या Institute of Education Sciences या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली व त्यांनी पुरविलेल्या निधीच्या मदतीने सदर डेटाबेस अस्तित्वात आले. सदर डेटाबेसमध्ये पूर्ण स्वरूपात विविध विषयांवर पुस्तके, लेख, जर्नल उपलब्ध आहेत.

२) Directory of Open Access Journals, २००३ या प्रोजेक्टची निर्मिती झाली. आतापर्यंत ९ हजार पूर्ण स्वरूपातील जर्नल विज्ञान, सामाजिकशास्त्र, माहिती तंत्रज्ञान इ. विषयांवर पूर्ण स्वरूपात जर्नल उपलब्ध आहेत.

३) Gutenberg – या प्रोजेक्टची निर्मिती १९७१ साली झाली. यामध्ये विविध विषयांवर ई–बुक्स उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे ऑडीओ बुक्स, सीडी–डीव्हीडी प्रोजेक्ट इत्यादी प्रकारचे साहित्य विद्यार्थी/सभासद यांना उपलब्ध करून दिले आहे.

४) Bookboon या कंपनीकडून त्यांच्या वेबसाईटच्या माध्यमातून ५० मिलियनपेक्षा जास्त पुस्तके उपलब्ध आहेत. यामध्ये इंजिनिअरींग, आय्. टी. (I.T.), बिजनेस या विषयांची निगडित पुस्तके उपभोक्त्यांकरिता उपलब्ध करून दिली आहेत.

५) Digital Commons Network– या वेबसाईटवर जगातील सर्व

विद्यापीठे आणि विद्यालये यांनी प्रकाशित केलेले जर्नल, प्रबंध, पुस्तके, शोधनिबंध इत्यादी प्रकारचे, स्रोत उपलब्ध करून दिले आहेत.

६) Shodganga – Shodhganga@INILIBNET हे एक असे सेंटर आहे, ज्या ठिकाणी संशोधक स्वतःचे प्रबंध प्रकाशित करून ते ऑनलाईन सर्वांसाठी उपलब्ध करून देऊ शकतात. UGC च्या आदेशावरून प्रत्येक विद्यापीठातील संशोधकांनी स्वतःचे प्रबंध डिजिटल स्वरूपात जमा करणे अनिवार्य केले आहे. त्यामुळे देशातील ७० पेक्षा जास्त विद्यापीठ या सेंटरशी जोडली गेली आहेत. त्यामुळे उपभोक्ता आपल्या सोयीनुसार प्रबंध बघू शकतो.

७) MPSC ज्ञानदीप : हे एक सर्वसमावेशक शैक्षणिक संकेत स्थळ आहे. यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी ऑनलाईन ई–बुक्स सुविधा सुरू केली आहे. यामध्ये महाराष्ट्र नागरिक सेवा नियम, आकारीक दैनिक नोंदी तंत्रसाधने, चाचणी प्रश्नपत्रिका, वार्षिक नियोजन, महाराष्ट्र अधिनियम संकलित प्रश्नपत्रिका, सराव प्रश्नसंच, महत्त्वाची संकेत स्थळे, शासन निर्णय संग्रह त्याचबरोबर लोकराज्य मासिके (MPSC) योजना मासिके, (Nots), ऑडिओ नोट्स, चालू घडामोडी अशी अनेक महत्त्वाची माहिती या संकेत स्थळावरून सभासदाकरिता उपलब्ध करून देण्यात येते.

यशवंतराव चव्हाण ग्रंथालय हे विद्यार्थी संशोधन आणि विषयांशी संबंधित सभासद यांना पाहिजे असलेली माहिती ग्रंथालय नेटवर्क आणि ई–स्रोताच्या माध्यमातून गरजेनुसार उपलब्ध करून देत.

**ब) नियतकालिके, (साप्ताहिक मासिक, त्रैमासिक, वार्षिक) बांधणी**: विद्यार्थी सभासद उपभोक्ता यांना विषयाशी संबंधित संदर्भाकरिता नियतकालिके हे महत्त्वाचे स्रोत मानले जातात. हा दृष्टिकोन समोर ठेवून उपयोगात येणारी नियतकालिके, त्यांची व्यवस्थित बांधणी करून ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यवस्थापनानुसार प्रक्रिया करण्यात येते. आणि उपभोक्त्याच्या मागणीनुसार त्यांना उपलब्ध करून देण्यात येतात.

**क) Newspaper Cliping :** वर्तमानपत्रामधून चालू घडामोडींची माहिती व्हावी याकरिता वाचक त्याचा उपयोग करतात. ग्रंथालयात Newspaper Cliping ही सुविधा उपलब्ध केली आहे. त्यामुळे वाचकांचा वेळ वाचतो. वर्तमानपत्रात आलेली काही विशिष्ट कात्रणे, लेख कापून त्यांचा विषयानुसार फाईल्स बनवल्या आहेत.

१. पुरस्कार–पद्मभूषण, पद्मविभूषण, राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार
२. दिवंगत अशा महत्त्वाच्या व्यक्ती
३. १८५७ चा इतिहास
४. नैसर्गिक आपत्ती–त्सुनामी, मुंबई पाऊस, भूकंप
५. यशवंतराव चव्हाण राजकीय, सामाजिक लेख
६. चलनबंदी आणि नवीन चलन निर्मिती
७. यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्काराचे मानकरी

**ड) इतर महत्त्वाच्या फाईल्स ग्रंथालयात आहेत :**
ग्रंथालय व माहिती जाळे हे ग्रंथ सूचीय, सांख्यिकीय व माहिती संचाची प्रतिप्राप्ती करून देणे, साहित्याच्या याद्या तयार करणे, संकलित करणे, प्रादेशिक ग्रंथ सूची तयार करणे, राष्ट्रीय ग्रंथ सूचीद्वारा ग्रंथ सूचीचे नियंत्रण ठेवणे, माहिती परिवर्तित करणे (Downloading).

**आंतरग्रंथालयीन मागण्या, प्रलेखाची देवघेव इ. गोष्टींचा उपयोग ग्रंथालय जाळ्यामार्फत करण्यात येतो.**

**राष्ट्रीय स्तरावरील जाळे** : संगणकीय जाळ्याचे उदाहरण : राष्ट्रीय स्तरावर– अर्नेट (ERNET), निकनेट (NICNET), इन्डोनेट (INDONET), कॅलिबनेट (CALIBNET), डेलनेट (DELNET), जानेट (JANET), ब्लेस (BLAISE), इनफ्लिबनेट (INFLIBNET), आंतरराष्ट्रीय स्तरावर ओसीएलसी – (OCLC) On Line Computer library centre. इंटरनेट Internet– राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय माहिती पद्धती National and International System.

भारतामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान या विशिष्ट ज्ञानशाखेसाठी 'नॅशनल इन्फर्मेशन सिस्टीम फॉर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी' ही प्रणाली महत्त्वाचे कार्य करते. (निस्साट) युनेस्कोने 'युनिसिस्ट' ही योजना तयार केली आहे.

**भारतातील राष्ट्रीय माहिती प्रणाली :**
१) निसाट (NISSAT), २) नॅसडॉक (NASSDOC), ३) इन्सडॉक (INSDOC), ४) डेसिडॉक (DESIDOC)

**आंतरराष्ट्रीय माहिती प्रणाली :**
१) युनिसिस्ट (UNISIST), २) इनिस (INIS), ३) ॲग्रीस (AGRIS), ४) मेडलर्स (MEDLARS), ५) इन्स्पेक (INSPEC).

# माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीकडून ऑक्टोबर २०१७ ते जानेवारी २०१८ दरम्यान पुढील विविध प्रशिक्षण वर्ग आणि कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

**सी–डॅक कोर्सेस :**

ऑगस्ट २०१७ ला सुरू झालेल्या बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी दि. ७ ऑक्टोबर २०१७ ला सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. या बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी समारोप समारंभ दि. १९ जानेवारी, २०१८ ला आयोजित केला होता.

PG DAC ऑगस्ट २०१७ च्या विद्यार्थ्यांसाठी प्लेसमेंट प्रोग्राम ३ फेब्रुवारी २०१८ ला सुरू झाला.

PG DAC फेब्रुवारी २०१८ बॅचची C-CAT (C-DAC Common Admission Test) दि. १७ डिसेंबर २०१७ ला घेण्यात आली. प्रबोधिनीमध्ये १४० विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

PG DAC कोर्समध्ये ॲडमिशन मिळविण्याकरिता C-CAT परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असते. ही परीक्षा उत्तमरीत्या उत्तीर्ण होता यावी म्हणून Pre DAC कोर्स चालविण्यात येतो. या कोर्समधील काही विद्यार्थ्यांचा क्रमांक उल्लेखनीय आहे.

मल्टिमिडीया क्रिएशन कोर्सला शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसोबत कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळतोय.

**MKCL कोर्सेस :**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित MS-CIT आणि KLiC अभ्यासक्रम चालविण्याची परवानगी प्रबोधिनीला वर्ष २०१८ साठी मिळाली. MKCLच्या MS-CIT कोर्सला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळतो व भविष्यात विद्यार्थ्यांना त्याचा उपयोगही होतो.

S.S.C.च्या विद्यार्थ्यांना MKCL ने ALL THE BEST चे KIT देऊन परीक्षेत यश मिळविण्याकरिता शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना फॉर्म्युला बुकचा फार उपयोग झाला. प्रतिष्ठानने सेंट जोसेफ स्कूलच्या S.S.C. च्या विद्यार्थ्यांच्या समारोप समारंभात भाग घेतला.

**आगामी कार्यक्रम :**

PG DAC कोर्सची बॅच १९ फेब्रुवारी २०१८ला सुरू होणार आहे. मुंबई जिल्ह्यातील सर्व C-DAC सेंटर ची Industry Meet दि. १ फेब्रुवारी २०१८ ला आयोजित केली आहे. S.S.C. व HSC च्या विद्यार्थ्यांसाठी FREE CAREER SEMINAR एप्रिल महिन्यात आयोजित करण्यात येणार आहे. उन्हाळी सुट्टीसाठी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी खास वर्ग सुरू करण्यात येणार आहेत.

गरजू आणि अपंग विद्यार्थ्यांना माफक दरामध्ये शिक्षण उपलब्ध करून देण्याची संधी AIT देते. अनेक कोर्सेस मध्ये अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांना पडताळणी नंतर माफक दरात प्रवेश देण्यात येतो. AIT (YCP) तर्फे लष्कर आणि पोलीसखात्यातील व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय यांसाठी फी मध्ये सवलत दिली जाते. इच्छुक आणि शैक्षणिक पात्रता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हप्त्याने फी भरण्याची सुविधा देण्यात येते.

वेगवेगळ्या कार्यक्रमाद्वारे तसेच इतर संस्थांच्या सहाय्याने अधिकाधिक संगणकीय प्रशिक्षणवर्ग चालविणे, हेच AIT चे उद्दीष्ट आहे.

# विभागीय केंद्र, कऱ्हाड

## कार्यवृत्त

## देशनेते स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांची ३३ वी पुण्यतिथी

स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या ३३ व्या पुण्यतिथीनिमित्त 'विरंगुळा' या त्यांच्या निवासस्थानी त्यांच्या भव्य प्रतिमेस मा. श्री. अशोकराव यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला. सौ. वेणूताई चव्हाण स्मारक ट्रस्टमधील देशनेते स्व. यशवंतराव चव्हाण व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्यास आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब (अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई,) यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. या प्रसंगी आमदार व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र कराडचे अध्यक्ष व सौ. वेणूताई चव्हाण स्मारक चॅ. ट्रस्ट कराडचे कार्यध्यक्ष मा. बाळासाहेब पाटील, मा. कल्लाप्पाण्णा आवाडे, मा. सुनिल पवार, मा. राजेश पाटील, नंदकुमार बटाणे, श्री. पी. एल कुलकर्णी, आदी मान्यवर त्याचप्रमाणे सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे संचालक, खासदार उदयनराजे भोसले, मा. राजेंद्र यादव यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते. सौ. वेणूताई चव्हाण स्मारक ट्रस्टची वार्षिक सभा यावेळी पार पडली. आदरणीय पवार साहेबांनी मार्गदर्शन केले.

२५ नोव्हेंबरला दुपारी चार वाजता सजविलेल्या बग्गीमध्ये साहेबांची प्रतिमा ठेवून विजय चौक ते यशवंतराव चव्हाण स्मृतिसदन, ते सौ. वेणूताई चव्हाण जिल्हा उपरुग्णालय कराड ते शिक्षण मंडळाच्या टिळक हायस्कूल मधील 'कृष्णाकाठ' या स्मृतिसदनापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. स्मृतिसदनातील स्व. यशवंतराव चव्हाण व स्व. लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालण्यात आले. शिक्षण मंडळ कराडचे अध्यक्ष मा. बाळासाहेब कुलकर्णी व मा. देशपांडे साहेब, टिळक हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. अहिरे मा. संभाजीराव पाटील, मा. आ. रामभाऊ कणसे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. स्व. यशवंतरावजी यांचे माध्यमिक शिक्षण याच हायस्कूलमध्ये झाले. राजकीय संघर्षाला सुरुवातही याच शाळेतून झाली. श्री. शिवाजी शिक्षण संस्थेच्या यशवंतराव चव्हाण कॉजेज ऑफ सायन्स व सौ. वेणूताई चव्हाण कला, वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य त्याचप्रमाणे सर्व प्राध्यापक बंधूभगिनी या मिरवणुकीत सामील होते. या भव्य मिरवणुकीची सुरुवातच प्राचार्यांच्या हस्ते श्रीफल वाढवून करण्यात आली. टिळक हायस्कूल, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे थोर हितचिंतक स्व. पी. डी. पाटील यांच्या निवासस्थानातील त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर रामविलास लाहोटी कन्या शाळा; चावडी चौक मार्गे मिरवणूक प्रीतिसंगम बागेतील यशवंतरावांच्या समाधी स्थळी जाऊन सर्वांनी समाधीवर फुले वाहिली. समाधी परिसरात असलेल्या पर्णकुटीसमोर मांडव घालण्यात आला होता. बैठकीची व्यवस्थाही करण्यात आली होती. प्रतिष्ठानचे (विभागीय केंद्र कराड) सचिव मोहनराव डकरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. मान्यवर प्राध्यापक श्री. महाडिक व श्री. जाधव यांचे आणि लहान १५ वर्षाच्या मुलीचे उत्स्फूर्त भाषण झाले. समाधीस्थळी या कार्यक्रमासाठी कराडातील अनेक मान्यवर व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान (कराड विभाग) व सौ. वेणूताई चव्हाण प. च. ट्रस्टचे सर्व कर्मचारी आवर्जून उपस्थित होते. सचिव श्री. मोहनराव डकरे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# विभागीय केंद्र, पुणे

## कार्यवृत्त

**रंगारंग दिवाळी पहाट :**

दरवर्षीप्रमाणे प्रतिष्ठानतर्फे गुरुवार दिनांक १९ ऑक्टोबर रोजी पुण्यातील सारसबागेत रंगारंग दिवाळी पहाट हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात श्री.तुकाराम दैठणकर आणि सहकारी यांच्या सनईच्या सुरेल वादनाने मंगलमय गुलाबी थंडीच्या वातावरणात झाली.

कु. आर्य काकडे व कु. आर्य अनसलकर यांच्या कडक ताशा वादनाला श्रोत्यांनी जोरदार दाद देऊन आपली पसंती दर्शविली.

हिंदी मराठी गीतांच्या संगीत कार्यक्रमांत सर्वश्री संजीव मेहेंदळे, सौ. चित्रा जोशी-आपटे, मिलींद गुणे, केदार तळणीकर, सचिन वाघमारे, मंदार देव, ऋतुराज कोरे, मंजुश्री ओक, रोहित बांकर इत्यादींचे गायन वादनाने जान आली. कार्यक्रमाचे संगीत नियोजन श्री. सचिन दामले यांचे होते. यांनी आपल्या निवेदनांतून कार्यक्रमाची लज्जत वाढवली.

साहित्यक्षेत्रातील अद्वितीय कामगिरीबद्दल श्री. रामदास फुटाणे यांचा आणि कला क्षेत्रांतील गुणवंत अभिनेत्री तेजस्विनी यांचा अनुक्रमे साहित्य व कला क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल श्रीमंत बाबासाहेब पुरंदरे आणि पुण्याच्या पहिल्या नागरिक महापौर मुक्ता टिळक यांचे हस्ते सत्कार करण्यांत आला.

पुणे केंद्राचे अध्यक्ष मा. अजित निंबाळकर यांचे मार्गदर्शन व सहभाग आणि सचिव श्री. अंकुश काकडे व शांतीलाल सुरतवाला यांचे अजोड नियोजन व कार्यकौशल्य यामुळे कार्यक्रम १०१% यशस्वी झाला.

**'माझी वाटचाल' पुस्तक प्रकाशन :**

बुधवार दिनांक १० जानेवारी २०१८ रोजी नव्या वर्षाच्या सुरुवातीला कै. यशवंतराव चव्हाण यांचे खास मर्जीतील अधिकारी मा. राम प्रधान यांच्या 'माझी वाटचाल' या पुस्तक प्रकाशनाने झाली. त्यासाठी गांजवे चौक नवी पेठेतील पत्रकार भवनाचे सभागृह श्रोतृवर्गाने भरून गेले होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक श्री. काकडे यांनी केले तर मान्यवरांचा सत्कार मा. निंबाळकर यांनी करून प्रतिष्ठानची माहिती दिली. माझी वाटचाल या पुस्तकावर श्री. गिरीश कुबेर (संपादक लोकसत्ता) व श्री. सुधीर देवरे (निवृत्त सचिव परराष्ट्र मंत्रालय) यांनी आपले विद्वत्ताप्रचुर असे विचार मांडले. मा. प्रधान यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आभारप्रदर्शन श्रीमती रूपाली चाकणकर यांनी केले.

### कृषी व सहकार व्यासपीठ पुणे :

**झोपडपट्टी विकास प्राधिकरणातील गृहनिर्माण संस्था माहिती अधिकार कायदा :**

कृषी व सहकार व्यासपीठातर्फे औरंगाबाद उच्च न्यायालय यांचे जळगाव जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशन विरूद्ध महाराष्ट्र शासन यांचे निकालांत माहिती अधिकार कायद्याखालील सहकारी संस्थांची माहिती शासकीय अधिकाऱ्यांनी सहकारी संस्थांकडून घ्यावी व ती नागरिकांना उपलब्ध करून द्यावी असा निकाल झाला होता. त्याबाबत सहकार आयुक्तांनी जरूर ती माहिती परस्पर उपलब्ध करून देणेबाबत आदेश सहकारी संस्थांना द्यावेत. त्यामुळे पारदर्शकतेच्या सहकारी मूल्यांची अंमलबजावणी होईल. शासकीय कामही कमी होईल असा प्रस्ताव कृषी व सहकार व्यासपीठातर्फे सादर केला होता. त्याबाबत सहकार आयुक्त कार्यालयाने पत्र क्र. सर्वसाधारण १५ स.आ उच्च न्यायालय निर्णय/संकीर्ण/१५१५ दिनांक १४/१०/२०१७ ने शासनाचे आदेश मागविले होते. आता झोपडपट्टी विकास प्राधिकरणांतील सहकारी गृहनिर्माण संस्थांबाबत तसे आदेश निर्गमित झाल्याचे समजते. इतर संस्थांबाबत पाठपुरावा सुरू आहे.

**बिगर कृषी सहकारी पतसंस्था (कायदा व दुरुस्ती) :**

दिनांक १७/१०/२०१७ रोजी वरील विषयावर कृषी व सहकार व्यासपीठामध्ये चर्चा आयोजित केली होती. त्याबाबत माजी विशेष कार्यकारी (सहकार) यांचेशी ही चर्चा करून त्याच दिवशी मा.प्रधान सचिव (सहकार) सहकार व वस्त्रोद्योग विभाग यांना सदर प्रकरणी सदर प्रकरणाचे कायद्यांतील स्थान, पगारदारांच्या सहकारी संस्था, व्यवसाय, अन्य व्यवसायांस नाममात्र सभासदत्व, कर्जमाफी, रेग्युलेटरी बोर्ड, सेक्रेटरी स्टॅबिलायझेशन फंड, कलम १०५ शी संघर्ष, ऑडीट इत्यादी कायद्यांतील तरतुदींबाबत शासनास सूचना करण्यांत आल्या.

**कर्जमाफी :**

शासनाचे माजी सहसचिव/अपर आयुक्त (सहकार) जे निवृत्तीनंतरही कर्जमाफीचे कामकाज पहाण्यासाठी खास पदावर शासनाकडून नेमण्यांत आले आहेत, त्यांचे व्याख्यान कृषी व सहकार व्यासपीठातर्फे दिनांक २५/११/२०१७ रोजी आयोजित करण्यात आले होते. त्यांनी योजनेत वेळोवेळी झालेले बदल व त्याची पार्श्वभूमी याची सविस्तर माहिती दिली व गरजू आणि आपद्ग्रस्तांनाच कर्जमाफी देण्याबाबतचा शासनाचा दृष्टिकोन सविस्तरपणे विशद केला.

**पुण्याचे पाणी :**

पुणेकरांच्या दृष्टीने २४x७ दिवस पाणी उपलब्धीबाबत तसेच पाण्याची गळती इत्यादीबाबत वृत्तपत्रांत बरीच चर्चा झाल्याच्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय व नोबेल पारितोषिकाचे समान ऑस्लो पाणी पारितोषिक विजेते डॉ. माधवराव चितळे यांनी 'जल संस्कृती' या विषयावरील व्याख्यान दिले. त्यांच्या भाषणाचा वृत्तांत 'जलसंवाद' मासिकाच्या नोव्हेंबर २०१७ अंकात प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्यामध्ये त्यांनी भारतीय पाणी संस्कृतीतील घटक इत्यादींचा ऊहापोह केल्यावर उदाहरणादाखल पुण्याच्या पाणी प्रश्नाचा सखोल परामर्ष घेतला. वरील पार्श्वभूमी लक्षांत घेता पुण्याचा पाणी प्रश्न सोडविताना डॉ. चितळे यांचे सदर विषयावरील विचार लक्षांत घेण्यांत यावेत. हा उद्देश लक्षांत घेऊन मा. काकडे यांच्या सहीने 'भारतीय जलव्यवस्थापनांतील तरलता' हा लेखमय वृत्तांत पुण्याचे नामदार, खासदार, आमदार, महापौर व आयुक्तांना योग्य त्या कारवाईसाठी दिनांक २८/११/२०१७ रोजी पाठविण्यात आला.

**नोटाबंदी :**

दिनांक ३ डिसेंबर २०१७ रोजी एक चर्चासत्र आयोजिले होते. केंद्रशासनाच्या नोटा बंदीला वर्ष पूर्ण झाल्यामुळे सदर विषयावर बऱ्याच उलटसुलट बातम्या वर्तमानपत्रांत छापून येत होत्या. शासनाचा सुरुवातीचा उद्देश जो की यामुळे काही लाख कोटी अंदाजे ४ ते ५ लाख कोटी काळापैसा अर्थशून्य/कस्पटासमान होईल अशी अपेक्षा होती. त्यामुळे काळ्या अर्थव्यवस्थेला मोठा आळा बसेल. शासनाचा मोठा फायदा होईल इत्यादी शासनाच्या अपेक्षा फलद्रूप झाल्या नाहीत. अर्थव्यवस्था मात्र पैशाचा ओघ आटल्याने मंदावली. लोकांनाही त्रास सहन करावा लागला. चर्चेमध्ये सहकारी कार्यकर्ते मा. शिवाजीराव ढमढेरे यांनी मात्र गरीब स्तरावरील ग्रामीण भागातील मोठ्या वर्ग समूहाला रू.५००/, रूपये १०००/ च्या नोटा पूर्वी हाताळण्याचा प्रसंग फारसा येत नसल्याने आणि त्यांचे व्यवहार रुपये १००/ व त्याखालील नोटांच्या चलनांतच प्रामुख्याने होत असल्याने जेवढा गाजावाजा पेपरांत झाला, तेवढा काही त्रास सोसावा लागला नसल्याचे आपले प्रांजळ निरीक्षण नोंदवले.

**शिक्षक निबंध स्पर्धा :**

'डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे जीवन व कार्य' या विषयावर महाराष्ट्रातून माध्यमिक शाळा शिक्षक व कर्मचारी यांच्याकडून निबंध मागविण्यात आले होते. सर्व विभागीय केंद्रांना त्यासाठी जरूर ती प्रसिद्धीच्याबाबत विनंती करण्यात आली होती. त्यास अनुसरून रत्नागिरी, पुणे, ठाणे, बीड या केंद्राच्या कार्यक्षेत्रांतील २५ निबंध प्राप्त झाले. सदरच्या निबंधांपैकी प्रथम चाचणीत ६ निबंध गाळण्यात आले. उरलेले १९ निबंध साहित्यिक व माजी प्राचार्य डॉ. न. म. जोशी यांचेकडून तपासून, सर्व संबंधितांना २४/११/२०१७ रोजी भिडे परिवार, मंगेशी तर्फे ग्रंथभेट व प्रतिष्ठानतर्फे पारितोषिके अनुक्रमे प्रथम रू.१०००/, द्वितीय रू. ८००/ तृतीय रू. ५००/ व अन्यांना रू. २००/ प्रमाणे तसेच प्रशस्तीपत्रेही वाटण्यांत आली.

**वक्तृत्व स्पर्धा :**

माध्यमिक शाळांतील इयत्ता ८वी व ९वी च्या विद्यार्थ्यांची 'डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम' या विषयांवरील वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. त्यात ७३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. परीक्षक म्हणून डॉ. गरूड, श्रीमती शाळीग्राम, श्री. भिडे, प्रा. डांगे यांनी काम केले. अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ अशी रू. ५०० /,रू. ४००/, रू. ३००/ व रू. २००/ प्रमाणे बक्षिसे वाटण्यांत आली.

# विभागीय केंद्र, नागपूर

## कार्यवृत्त

- **रसिकराज आंतर संस्थात्मक काव्यवाचन स्पर्धा-२०१७ :** विभागीय केंद्र नागपूर व रसिकराज साहित्य संस्था नागपूरच्या वतीने रसिकराज आंतर संस्थात्मक काव्यवाचन स्पर्धा-२०१७ शनिवार दि. ७ ऑक्टोबर, २०१७ दुपारी १.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आली. हा कार्यक्रम प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रख्यात कवी मा. मेजर हेमंत जकाते उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून प्रा. सौ. सुलभा जकाते उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व परीक्षक म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबईचे सदस्य मा. डॉ. ईश्वर नंदापुरे, प्रख्यात लेखिका मा. डॉ. संध्या पवार, सुप्रसिद्ध कवी मा. प्रा. मजिद बेग मुगल उपस्थित होत्या. याप्रसंगी 'रसिकराज' अध्यक्ष मा. डॉ. बळवंत भोयर उपस्थित होते.
- **यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार :** शनिवार दि. २५ नोव्हेंबर, २०१७ हा आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांचा ३३ वा स्मृतिदिवस! राज्याच्या जडणघडणीत त्यांच्या विचारांचे व कर्तृत्वाचे योगदान मोठे आहे. त्यांनी उराशी बाळगलेल्या स्वप्नातील महाराष्ट्र आज किती पुढे गेला या संदर्भात महत्त्वपूर्ण माहिती देण्यासाठी महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेखक व सव्यसाची पत्रकार लोकसत्ताचे संपादक मा. गिरीश कुबेर सकाळी १०.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह शंकरनगर चौक नागपूर येथे आवर्जून उपस्थित होते. महाराष्ट्राचे माजी मुख्य सचिव व अरूणाचलचे माजी राज्यपाल मा. श्री. राम प्रधान अध्यक्षस्थानी होते.

  तसेच स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त मागील दोन वर्षांपासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तीला रोख रुपये पंधरा हजार, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे स्वरूप असलेला 'यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार' देऊन गौरविण्यात येत असते. यंदा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, सुप्रसिद्ध लेखिका व प्रकाशन क्षेत्रात ज्यांनी आपला स्वतंत्र ठसा महाराष्ट्रात उमटविला आहे अशा मा.अरुणा सबाने यांना २०१७ चा यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

- **माझी वाटचाल :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने महाराष्ट्राचे माजी मुख्य सचिव व अरूणाचलचे माजी राज्यपाल राम प्रधान यांनी लिहिलेले आत्मचरित्र 'माझी वाटचाल' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा रविवार दि.२६ नोव्हेंबर, २०१७ रोजी सायं. वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह राष्ट्रभाषा संकुल शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला.
  हा प्रकाशन सोहळा भारत सरकारचे भूतल परिवहन, जहाज व जलस्त्रोत व गंगा शुद्धीकरण विभाग मंत्री मा. नितीनजी गडकरी यांच्या शुभहस्ते व माजी गृह मंत्री मा. सुशीलकुमारजी शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत मा.डॉ. वि.स. जोग प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

- **पुस्तक प्रकाशन समारंभ :**
  विभागीय केंद्र, नागपूर व विदर्भ साहित्य संघ, शाखा सिंदी रेल्वे, जि. वर्धा यांच्या संयुक्तवतीने कल्पना नरांजे यांच्या 'घरवापसी' या कादंबरीच्या, 'तिकीट' या कथासंग्रहाच्या तसेच डॉ. मनोहर नरांजे यांच्या 'लोकयात्रा' या कवितासंग्रहाच्या प्रकाशन सोहळाचे आयोजन रविवार दि. ३ डिसेंबर, २०१७ रोजी नागपूर येथे करण्यात आले.

  याप्रसंगी अ. भा. मराठी साहित्य मंडळाचे अध्यक्ष मा.डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी हे अध्यक्षस्थानी होते. पुस्तकांचे प्रकाशन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय, केंद्र नागपूरचे अध्यक्ष मा.डॉ. गिरीश गांधी यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. याप्रसंगी मा.डॉ. हरिश्चंद्र बोरकर (साकोली), मा. डॉ. रवीन्द्र कोल्हे (वैरागड), मा.डॉ. स्मिता कोल्हे (वैरागड) यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी ज्येष्ठ कादंबरीकार मा.डॉ. रवीन्द्र शोभने व ज्येष्ठ समीक्षक, नागपूर मा. प्रज्ञा आपटे यांनी पुस्तकावर भाष्य केले.

- **प्रकट मुलाखत :** विविध आजारांवर उपचार करणारे डॉक्टर आपण बघतो, अनुभवतो. काही डॉक्टरांची जबरदस्त फी पाहून गडबडतोही. पण, फक्त भिकाऱ्यांचे डॉक्टर आपल्याला माहीत नसतील. भिकाऱ्यांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून त्यांना जादूचे चष्मे देणारा, प्रसंगी त्यांच्या ताटात जेवणारा, पडत्या काळात त्यांनी दिलेल्या पैशातून स्कूटरमध्ये पेट्रोल भरून त्यांना सेवा देणारा हा अवलिया आहे डॉ. अभिजित सोनवणे ! वापरा दृष्टी, बदलेल सृष्टी... ही उक्ती खरी करून दाखविणारा! त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने शनिवार दि. ९ डिसेंबर, २०१७ रोजी नागपूर येथे त्यांच्या प्रकट मुलाखतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला.
  डॉ. अभिजीत यांचा सत्कार मा.डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांच्या शुभहस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष मा.डॉ. गिरीश गांधी होते. याप्रसंगी प्राचार्या रेखा घिया-दंडिगे यांनी डॉ. सोनवणे यांची प्रकट मुलाखत घेतली.

- **सुवाच्य हस्ताक्षर स्पर्धा २०१७ :**
  विभागीय केंद्र, नागपूर, रामन विज्ञान केंद्र नागपूर, नागपूर महानगरपालिका (शिक्षण विभाग), रायसोनी ग्रुप व अक्षरभूषण मधुकरराव भाकरे स्मृती प्रतिष्ठान नागपूरच्या संयुक्त विद्यमाने अक्षरभूषण मधुकरराव भाकरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सोमवार दि.२५ डिसेंबर, २०१७ रोजी शिक्षक सहकारी बँक सभागृह, गांधीनगर नागपूर येथे सकाळी ९.३० वाजता आंतरशालेय सुवाच्य हस्ताक्षर स्पर्धेचे, पारितोषिक वितरण व सेवानिवृत्त शिक्षक सन्मान' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

  कार्यक्रमाचे बक्षीस वितरण अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक आणि कवी मा.डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या शुभहस्ते व नागपूरच्या महापौर मा.सौ. नंदाताई जिचकार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. तसेच शिक्षक आमदार मा.श्री.ना. गो. गाणार, शिक्षण सभापती मा.श्री. दिलीप दिवे व प्रदेश सरचिटणीस मनसे महाराष्ट्र मा.श्री. हेमंत गडकरी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

- **श्रीमती केराबाई सरगर यांचा सत्कार व प्रकट मुलाखत :** रेडिओ म्हटला की विविध भाषा बोलणारा, रसिकांचे मनोरंजन करणारा, त्यांना विविध प्रश्न विचारणारा आरजे (रेडिओजॉकी) आठवतोच. माणदेशी रेडिओ महिला आपल्या बोलीभाषेत चालवितात. या रेडिओवरच्या सर्वात फेमस आरजे म्हणजे ६९ वर्षे वयाच्या केराबाई सरगर ! शाळेशी कधीही संबंध न आलेल्या केराबाई कानाला हेडफोन लावून माणदेशवासियांची करमणूक करीत आहेत. त्यांच्या धाडसी हजरजवाबी स्वभावामुळे त्यांचा सर्वांना अभिमान आहे. त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने शुक्रवार दि. १९ जानेवारी, २०१८ रोजी नागपूर येथे त्यांच्या प्रकट मुलाखत व सत्काराचे आयोजन करण्यात आले.
  याप्रसंगी श्रीमती केराबाई सरगर यांचा सत्कार शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते व अभ्यासक मा. श्री. विजय जावंधिया यांच्या शुभहस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भातील शेतकऱ्यांच्या भाजीपाल्याला विदेशी बाजारपेठ मिळवून देणाऱ्या व बी.वाय.ॲग्रो अँड इन्फ्रा लिमिटेड वर्धा या संस्थेच्या संचालिका श्रीमती सराह हसन शफिक होत्या.

  राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासनाचे विभागप्रमुख मा.डॉ. प्रदीप विटाळकर यांनी श्रीमती केराबाई सरगर यांची प्रकट मुलाखत घेतली.

- **३७ वे राज्यस्तरीय वार्षिक कृतिसत्राचे उद्घाटन :** विभागीय केंद्र नागपूर, महात्मा फुले शिक्षण संस्था विद्यानगरी नागपूर, नागपूर जिल्हा मराठी माध्यमिक शिक्षक संघ नागपूर व महाराष्ट्र मराठी माध्यमिक शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ३७ व्या राज्यस्तरीय वार्षिक कृतिसत्राचे आयोजन दि.२० व २१ जानेवारी, २०१८ रोजी महात्मा फुले शिक्षण संस्था विद्यानगरी रेशीमबाग नागपूर येथे संपन्न झाले.
  या कृतिसत्राचा उद्घाटन सोहळा शनिवार दि. २० जानेवारी, २०१८ रोजी दु.२.०० वाजता संपन्न झाला. भाषेतून संस्कृती येते आणि मातृभाषा ही व्यक्तिमत्त्व घडविणारी भाषा आहे. मात्र पाश्चिमात्य संस्कृतीच्या आकर्षणामुळे मातृभाषेचा उपयोग कमी होत आहे, अशी खंत शिक्षक आमदार मा.श्री. ना. गो. गाणार यांनी व्यक्त केली. ३७ व्या राज्यस्तरीय वार्षिक कृतिसत्राच्या उद्घाटन प्रसंगी विशेष अतिथी म्हणून ते बोलत होते. कृतिसत्राचे उद्घाटन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर महात्मा फुले शिक्षण संस्थचे अध्यक्ष मा. प्रा. अरूण पवार, कृतिसत्राच्या अध्यक्षा मा. सौ. उज्वला विजयकुमार लांडगे, शिक्षण उपसंचालक मा.श्री. अनिल पारधी, डॉ. मंजूषा सावरकर आदी होते. इंग्रजी भाषेला सन्मानाचे प्रतीक समजणाऱ्यांची संख्या वाढत आहे.

म्हणूनच मराठी बोलता येत असूनही मराठी बोलणे कमी दर्जाचे वाटते आणि दैनंदिन जीवनातही इंग्रजी भाषेला अधिक महत्त्व दिले जाते. मराठी भाषेची दुरवस्था का झाली याचा विचार करा, असे ना. गो. गाणार म्हणाले. मराठी व्याकरण आजही आठवी–नववीच्या विद्यार्थ्यांनाच नव्हे; तर सर्वांनाच कठीण जाते कारण तंत्रज्ञानाचा वापर केला जात नाही. तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना त्याचा लाभ झाला तर हे फलदायी ठरेल, असे अनिल पारधी म्हणाले. युट्यूबसारख्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मराठी भाषाविषयक अनेक व्हिडीओ आहेत. त्याचा वापर मी देखील केला आहे. तुम्हीही पाहा आणि विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळवून द्या. शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. कोणत्याही परिस्थितीवर मात करण्याची क्षमता केवळ शिक्षकांमध्येच असते असे प्रतिपादन गिरीश गांधी यांनी केले. समाजदूषित होताना समाज परिवर्तनाची जबाबदारी स्वीकारा. प्रत्येकानेच जबाबदारीने वागले पाहिजे. पण, शिक्षकांवर ही जबाबदारी अधिक असल्याचे त्यांनी सांगितले.

**‘लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचं एक स्थान आहे. आजचा विरोधी पक्ष कधी काळी राज्यकर्ता पक्ष बनू शकतो. ही शेवटी लोकांच्या इच्छेची बाब आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक पक्षाची भूमिका समाजाच्या हिताची, समाजामध्ये ऐक्य निर्माण करणारी असेल, भारताच्या–सार्वभौमत्वाच्या रक्षणाची असेल तर त्या पक्षाचं जनमानसात विशिष्ट स्थान असतं. माझ्या सरकारची नीती निश्चितपणाने ही राहील की, लोकांच्या हिताचा प्रश्न, मग तो माझ्या पक्षातल्या सहकारी मित्रांनी सुचविलेला असो, किंवा दुसऱ्या बाजूला असणाऱ्या मित्रांनी सुचविलेला असो, त्यांच्यामध्ये यत्किंचितसुद्धा भेद न करता तो सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल.’**

**– मा. शरद पवार**



विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने चित्रकला स्पर्धा घेण्यात आली होती.



विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने संशोधन पर्यटन कार्यशाळा घेण्यात आली होती.



'माझी वाटचाल' या पुस्तकाचे प्रकाशन करताना श्री. गिरीश कुबेर, संपादक, लोकसत्ता व श्री. सुधीर देवरे निवृत्त परराष्ट्र सचिव सोबत श्री. राम प्रधान, अजित निंबाळकर, अंकुश काकडे व शांतीलाल सुरतवाला



'दिवाळी पहाट' कार्यक्रम सारसबाग येथे संपन्न झाला यावेळी मनोगत व्यक्त करताना पूण्याच्या महा पौर सौ. मुक्ताताई टिळक, शेजारी बाबासाहेब पुरंदरे, श्री. रामदास फुटाणे व अभिनेत्री तेजस्विनी



पाचव्या औरंगाबाद आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलचे प्रोझोन मॉल, आयनॉक्स थिएटरमध्ये उद्घाटन करताना दिग्दर्शक-अभिनेते महेश मांजरेकर, मृणाल कुलकर्णी, उपेंद्र लिमये, औरंगाबाद विभागीय केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, नंदकिशोर कागलीवाल. यावेळी उपस्थित अभिनेत्री स्मिता तांबे, नाटककार प्रा. अजित दळवी, विकास देसाई, सैबल चटर्जी, अतनू मुखर्जी, ॲमी कॅथलिन, महापौर नंदकुमार घोडेले, सुजाता कांगो, दिग्दर्शक अशोक राणे, शिव कदम, जयप्रद देसाई, मोहम्मद अर्शद आदी मान्यवर



मसापच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात शुक्रवार दि. २३ नोव्हेंबर रोजी आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या ३३व्या पुण्यतिथीच्या पूवसंध्येस त्यांच्या जीवनविषयक कार्याचा वेध घेणाऱ्या रेखाचित्रदालनाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनानंतर चित्र पाहताना प्रतिष्ठानच्या औरंगाबाद विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. अकुशराव कदम, मसापचे अध्यक्ष मा. कौतीकराव ठाले पाटील, मसापचे विश्वस्त मधुकरराव मुळे, निलेश राऊत आदी.






शिक्षण विकास मंच आयोजित 'सेमी-इंग्रजी' आज आणि उद्या या विषयावरील राज्यस्तरीय शिक्षण परिषद




वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसोबत घेण्यात आलेले कार्यक्रम




स्व. यशवंतराव चव्हाण यांची ३३वी पुण्यतिथी, विभागीय केंद्र, कऱ्हाडच्या वतीने साजरी करण्यात आली.





अपंग हक्क विकास मंच आयोजित मोफत डिजिटल श्रवणयंत्र (अमेरीकन मेड) वाटप शिबिर, बारामती यावेळी मा. डॉ. कल्याणी मांडके, मा. दत्ता बाळसराफ, मा. विजय कानेकर आदी मान्यवर उपस्थित होते.




सहकारी गृहनिर्माण संस्था आयोजित बदललेले कायदे, नियम व जीएसटी विषयक मार्गदर्शन चर्चासत्र




ज्येष्ठ साहित्यिक अरूण साधू यांची प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. शरदचंद्रजी पवार यांच्या अध्यक्षतेखाली 'स्मृतिसभा' आयोजित करण्यात आली. यावेळी मा. दिनकर गांगल, मा. कुमार केतकर, मा. गिरीश कुबेर, व इतर मान्यवर उपस्थित होते.






यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई आणि 'प्रयोग मालाड' आयोजित 'फ्लेमिंगो आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव २०१७' समारोप प्रसंगी मा. एन. चंद्रा, मा. किरण शांताराम, मा. अशोक राणे व इतर



सृजन या उपक्रमाअंतर्गत जादूगार पी. व्ही. हांडे यांनी विद्यार्थ्यांसमोर सादर केलेले जादूचे प्रयोग.



अभय यावलकर यांनी विज्ञान खेळणी या विषयावर विद्यार्थ्यांसोबत प्रात्यक्षिके केली.



आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांचा ३३ वा स्मृतिदिन देवराष्ट्रे या त्यांच्या जन्मगावी साजरा करण्या आला.




स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी निमित्त सोलापूर येथील वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय मध्ये प्रा.शिवाजीराव साळुंके यांचे यशवंतराव चव्हाण आणि महाराष्ट्र या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.



कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम च्या वतीने सामाजिक कार्यकर्ते, युवक, युवती आणि महिला यांच्यासाठी 'एकदिवसीय कायदेविषयक माहिती शिबिर' आयोजित करण्यात आले होते.



टॉपर्स ऑफ PG DAC 2017 बॅच



मा. राम प्रधान यांच्या पुस्तक प्रकाशनप्रसंगी मनोगत व्यक्त करताना श्री. राम प्रधान, व्यासपीठावर डावीकडून प्राचार्य रेखा दंडिगे, डॉ. गिरीश गांधी, श्री. सुशिलकुमार शिंदे, ना. नितीनजी गडकरी, डॉ. वि. स. जोग



डॉ. अभिजीत सोनवने यांचा सत्कार व प्रकट मुलाखत प्रसंगी मनोगत व्यक्त करताना डॉ. गिरीश गांधी, व्यासपीठावर डावीकडून प्राचार्य रेखा दंडिगे-घिया, डॉ. प्रदीप विटाळकर, प्रेमकुमार लुनावत, डॉ. चंद्रशेखर मेश्राम, डॉ. अभिजीत सोनवने, डॉ. सौ. मनीषा सोनवने व दीपक निलावार



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ठाणे जिल्हा केंद्र 'विचार कुंकू २०१८', खासदार सौ. सुप्रियाताई सुळे यांच्या सोबत पुरस्कार विजेते व ठाणे जिल्हा केंद्राचे पदाधिकारी



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ठाणे जिल्हा केंद्र 'विचार कुंकू २०१८', उपस्थित जनसमुदाय




विज्ञानगंगा या कार्यक्रमात 'इन्फार्मेशन टेक्नॉलॉजी' : काल-आज-उद्या याविषयावर उपस्थितांसोबत संवाद साधताना डॉ. अच्युत गोडबोले, सोबत प्रतिष्ठानचे सरचिटणिस मा. शरद काळे.



विभागीय केंद्र सोलापूर आणि प्रयोग मालाड यांच्या सहकार्याने लघुपट निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना मा.अशोक राणे , राजशेखर शिवदारे , धर्माण्णा सादूल, दिनेश शिंदे व इतर



शेतीकट्टा विषय : कांदा व उत्पादन तंत्रज्ञान,
मार्गदर्शन : डॉ. पतींग साबळे, सहा. प्राध्यापक, उद्यानविद्या विभाग, कृषि महाविद्यालय, सोनई



शेतीकट्टा विषय : डाळींब उत्पादन तंत्रज्ञान,
मार्गदर्शन : श्री. ए. व्ही. अत्तार (वरीष्ठ संशोधक सहाय्यक, उद्यानविद्या विभाग, म.फु.कृ.वि., राहुरी)



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विकास अध्ययन केंद्र, कोरो आणि कम्युनिटी डे०हलोपमेंट ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित 'एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरणाची आवश्यकता' या विषयावर आयोजित राज्यस्तरीय चर्चासत्र



तृतीयपंथीय समुदायांच्या प्रमुख पदाधिकारी यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी मा.खा.सुप्रिया सुळे यांची भेट घेऊन विविध विषयावर चर्चा केली.

NATH GROUP

MAHATMA GANDHI MISSION

Presents

# AIFF

## 5th AURANGABAD INTERNATIONAL FILM FESTIVAL

18th - 21st January, 2018

Inox, Prozon Mall, Aurangabad



उद्घाटन सोहळा



सेमीनार




मास्टर क्लास




पुरस्कार वितरण




मान्यवरांचा सत्कार



रसिकांची प्रतिसाद



रसिकांची प्रतिसाद



- शशी कपूर यांच्या चित्रपटांचे पोस्टर प्रदर्शन
- महेश मांजरेकर, मृणाल कुलकर्णी , उपेंद्र लिमये, स्मिता तांबे यांच्या हस्ते चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन
- चार हजार रसिकांच्या उपस्थितीत विविध भाषेतील ३० चित्रपट प्रदर्शित
- 'मास्टर क्लास'मध्ये प्रख्यात दिग्दर्शक हंसल मेहता, तर परिसंवादात सुमित्रा भावे, सुनील सुकथनकर, संदीप सावंत चंद्रकांत कुलकर्णी, मनोज सावंत यांचा प्रेक्षकांशी संवाद
- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील साठहून अधिक कलावंत, मान्यवरांची उपस्थिती
- पद्मविभूषण अदूर गोपालकृष्णन यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण

पुरस्कार विजेते :

सर्वोत्कृष्ट सिनेमा : क्षितिज
उत्कृष्ट ध्वनी संयोजन : पुप्पा
बेस्ट एडिटींग : रुख
उत्कृष्ट संगीत दिग्दर्शक : साउंड ऑफ सायलेन्स
बेस्ट सिनेमॅटोग्राफर : रुख
बेस्ट स्क्रीन प्ले : क्षितिज
बेस्ट ॲक्ट्रेस : छाया कदम (रेड्डू)
बेस्ट ॲक्टर्स : राहुल बॅनर्जी (पुप्पा)
उत्कृष्ट दिग्दर्शक : इंद्रसिस आचार्य
स्पेशल मेन्शन ज्युरी ॲवॉर्ड : वैष्णवी तांगडे

आयोजक

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
## विभागीय केंद्र औरंगाबाद



YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN
MKCL
नवीन
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
या सुट्टीत घडवा तुमचे करियर,
होऊया कंप्यूटरचे स्मार्ट यूझर!
नव्या युगात आम्ही विद्यार्थी प्रवेश घेऊ फक्त
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान
मध्येच
Windows 7
Office 2013
९५ लाखांहून अधिक लोकांना कंप्यूटरचे 'स्मार्ट यूझर्स' बनविणारा कोर्स
Other Courses
MS-Office
Web Designing
Advance Excel
DTP
Tally Expert
5th Floor, Y.B.Chavan Centre, Gen J.Bhosale Marg, Opp Mantralaya,
Nariman Point, Mumbai - 400 021.
Tel No : 022 - 22817975 / 22043617/19 / 9769256343

# विभागीय केंद्र, नाशिक

## कार्यवृत्त

- **'चित्रपट चावडी':'आय एम गोइंग होम' :**

  विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक नानी मोरेट्टी यांचा 'आय एम गोइंग होम' हा चित्रपट दाखविण्यात आला. गिल्बर्ट वॅलन्स हा पॅरीसच्या रंगभूमीवरील सुप्रसिद्ध नट. उतरणीच्या वयात त्याला निवृत्तीचे वेध लागले आहेत. अचानक कोसळलेल्या संकटांमुळे गिल्बर्टला फक्त नातवाचा आधार उरतो. त्याची करुण कहाणी दाखविण्यात आलेली आहे.

  पोर्तुगीज चित्रपट दिग्दर्शक मॅन्युअल डी. ऑलीवेरा हे जागतिक चित्रपट सृष्टीतील एक आश्चर्यच म्हटले पाहिजे. १०६ वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य लाभलेले ऑलीवेरा ८० वर्षे चित्रपट सृष्टीत कार्यरत राहिले.

- **आरोग्य विषयक व्याख्यान :**

  रोजच्या जीवनातील तणाव, व्यस्त जीवनशैली, व्यायामाचा अभाव, बैठे काम, पाणी कमी पिणे यातून अनेक व्याधी सुरू होतात. त्यातलाच मुळव्याध हा एक आजार आहे. त्यावर उपाय म्हणजे आहारात तंतुमय पदार्थांचा समावेश करणे. उत्तम, असे प्रतिपादन डॉ. भालचंद्र कुलकर्णी यांनी केले. विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने डॉ. भालचंद्र कुलकर्णी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्याप्रसंगी त्यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, 'पालेभाज्या, सलाड, कोशिंबीर, गाजर, मुळा, कोबी यांचा तसेच फळे, सफरचंद, चिकू, अननस, डाळींब, केळी यांचा रोजच्या जेवणात समावेश असावा. त्यामुळे फिशर, फिश्चुला यासारख्या आजारापासून संरक्षण होऊ शकते व आपण निरोगी राहू शकतो. याचबरोबर तणाव कमी करण्यासाठी आनंदी मनासाठी व्यायाम करावा त्यातून आनंदी जीवनशैलीचा मार्ग सुकर होतो.' वजन कमी करणारी औषधे, कोलेस्टेरॉल कमी करणाऱ्या औषधांपासून सावधगिरी बाळगण्याचेही त्यांनी सांगितले. स्वागत व प्रास्ताविक करतांना बँकेचे संस्थापक अध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी सांगितले व धावपळीच्या जीवनशैलीत आपले आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे अनेक नव–नवीन आजार निर्माण होत आहेत. त्यावर प्रबोधनात्मक जाणिवेतून अशा व्याख्यानांचे बँकेतर्फे आयोजन करण्यात येते. यावेळी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. हरी कुलकर्णी, सह मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सारीका देशपांडे तसेच विश्वास को–ऑप. बँकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

- **'चित्रपट चावडी' : 'अ निकी बोबो':**

  विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत पोर्तुगीज चित्रपट दिग्दर्शक मन्युअल डी. ऑलीवेरा यांचा 'अ निकी बोबो' हा चित्रपट दाखविण्यात आला.

  ऑलीव्हेरांचा हा अगदी सुरुवातीचा पोर्तुगीज चित्रपट पुढे येऊ घातलेल्या इटालीयन नव वास्तववादाची नांदीच होती. चित्रपटातील सर्व पात्रे खरंतर लहान मुलेच आहेत. पण त्यांचे बालखेळ मात्र मोठ्यांचे प्रतिबिंबच आहेत. लहान मुलांचा निरागसपणा व खेळकरपणा मात्र शेवटी प्रेक्षकांची मने जिंकतो. पोर्तुगीज चित्रपट दिग्दर्शक मन्युअल डी. ऑलीवेरा हे जागतिक चित्रपट सृष्टीतील एक आश्चर्यच म्हटले पाहिजे. १०६ वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य लाभलेले ऑलीवेरा ८० वर्षे चित्रपट सृष्टीत कार्यरत राहिले. मूक चित्रपट ते २१ वे शतक असा खूप मोठा कालखंड त्यांनी पाहिला. त्यांना आंतरराष्ट्रीय मान्यता तशी उशिराच मिळाली. पण पोर्तुगालमधील हुकूमशाही राजवटीमुळे सुरुवातीला चित्रपटासाठी लागणारे पोषक वातावरण नव्हते. एकंदरीत सामाजिक आशयाचा चित्रपट तसेच लघुपट व माहितीपटांची अखंड निर्मिती केली. १९४२ मध्ये पोर्तुगाल येथे प्रदर्शित झालेला होता.

- **'व्हेज बिर्याणी पुलाव' महोत्सव :**

  व्हेज बिर्याणी पुलावचा वातावरणातील सुगंध आणि लज्जतदार आणि स्वादिष्टपणे मित्र, परिवार, कुटुंबीयांसमवेत घेत असलेला आस्वाद यांचे चित्र विश्वास लॉन्सवर अनुभवावयास मिळाले. शाकाहारी विविध प्रकारच्या मसाल्यांचा वापर करून चवीचा अनोखा आनंद 'व्हेज बिर्याणी पुलाव महोत्सवात' मिळत आहे. विविध प्रकारच्या पावभाजी

आणि मसाला राईसने महोत्सवात रंगत आणली. महोत्सवात मराठी खाद्यसंस्कृतीतील व्हेज बिर्याणी पुलावचे अनेक प्रकार सादर झाले. यामध्ये 'जैन स्पेशल बिर्याणी', 'मटका व्हेज बिर्याणी', 'व्हेज दम बिर्याणी', 'कोप्ता व्हेज बिर्याणी', 'व्हेज हैद्राबादी बिर्याणी', 'व्हेज शाही बिर्याणी', 'व्हेज चायनीज बिर्याणी', 'व्हेज काश्मिरी पुलाव', 'व्हेज ग्रिन पिस पुलाव', 'व्हेज टोमॅटो पुलाव', 'व्हेज शाही पुलाव', 'व्हेज चीज पुलाव' तसेच कोकोनट राईस, लेमन राईस, व्हेज फ्राईड राईस असे अनेक प्रकार त्यात होते. त्याचबरोबर चटकदार स्टार्टर्सचाही समावेशत त्यात होता. व्हेज गोल्ड कॉईन, सिसम टोस्ट, व्हेज क्रीस्पी पनीर इन हॉट गार्लीक, व्हेज बॉल इन शेजवान यांनी खवय्यांचा आनंद द्विगुणीत केला.

- **'चित्रपट चावडी' : 'इक्सेन्ट्रीसीटीज ऑफ ब्लॉंड हेअर्ड गर्ल' :** विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत पोर्तुगीज चित्रपट दिग्दर्शक मन्युअल डी. ऑलीवेरा यांचा 'इक्सेन्ट्रीसीटीज ऑफ ब्लॉंड हेअर्ड गर्ल' हा चित्रपट दाखविण्यात आला.

  'इक्सेन्ट्रीसीटीज ऑफ ब्लॉंड हेअर्ड गर्ल' हा चित्रपट एका तरुण जोडीचा प्रेमपट आहे.

- **'चित्रपट चावडी' : 'द मॅन विदाऊट पास्ट' :** विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत शनिवार १८ नोव्हेंबर २०१७ रोजी सायंकाळी ६.३० वाजता फिनलँडचे सुप्रसिद्ध दिग्दर्शक अकी कौरीस्माकी यांचा 'द मॅन विदाऊट पास्ट' हा चित्रपट दाखविण्यात आला. २००२ मध्ये फिनलँड येथे प्रदर्शित झालेल्या या सिनेमाचा कालावधी ९७ मिनिटांचा आहे. फिनलँडचे प्रसिद्ध दिग्दर्शक अकी कौरीस्माकी हे त्यांच्या सहज सुंदर, हलक्या फुलक्या, नर्मविनोदी परंतु तितक्याच चमत्कृतीपूर्ण चित्रपटांसाठी प्रसिद्ध आहेत. त्यांची प्रमुख पात्रे सर्व सामान्य फिनलँडर असतात. सर्व सामान्यांची सुख दुःखे, त्यांच्या जीवनातील चढउतार ते तटस्थपणे नेटकेपणाने टिपतात. हा चित्रपट एका वेल्डरची गोष्ट आहे. काही चोरटे पार्कमध्ये त्यांच्यावर हल्ला करतात. डोक्यावरील आघाताने मृत्यू व नंतर तात्पुरती विस्मृती आलेला चित्रपटाचा नायक जणू पुनर्जन्म घेऊन नवे आयुष्य शोधतो. त्यात गत आयुष्याच्या खुणा सापडतात का?

- **'जीवनशैली व हृदयरोग' या विषयावर डॉ. मनोज चोपडा यांचे व्याख्यान :** आजच्या धावपळीच्या जगात जीवनशैलीत वेगाने बदल होत असून ताण-तणावाचे वाढते प्रमाण, सकारात्मक जीवनशैलीचा अभाव, सोशल मिडीयाच्या अतिवापरामुळे आलेले नैराश्य, उदासीनता, व्यायामाचा अभाव, व्यसनांचे वाढते प्रमाण, विसंवाद यामुळे हृदयरोगाच्या रुग्णांमध्ये वाढ होत असून ते रोखण्यासाठी आनंदी जीवनासाठी निसर्गाशी मैत्री करून सात्विक आहार, मेडीटेशन, त्याचबरोबर आपल्या मर्यादा ओळखणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ख्यातनाम हृदयरोग तज्ज्ञ डॉ. मनोज चोपडा यांनी केले. महाराष्ट्राचे थोर शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ३३व्या पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला ख्यातनाम हृदयरोग तज्ज्ञ डॉ. मनोज चोपडा यांचे 'जीवनशैली व हृदयरोग' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ते पुढे म्हणाले, की आज ग्लोबल वॉर्मिंग, वाढते ध्वनी प्रदूषण, औद्योगिक प्रदूषण यांचा परिणाम जीवनशैलीवर होत आहे. आज तरुण वयातच हृदयरोग, रक्तदाब, मधुमेह यांचे प्रमाण वाढत आहे. ते रोखण्यासाठी तेल, तूप, साखर, मैदा, मीठ यांचे आहारातील प्रमाण कमी करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर योगा, स्वत:साठी वेळ देणे, आवडीचे छंद जोपासणे यामुळे ताणतणाव कमी करण्यासाठी मदतच होते. शरीर हे जैविक घड्याळ आहे. ते योग्य रितीने चालण्यासाठी जीवनशैलीत शिस्त आणणे महत्त्वाचे आहे. नियमित आरोग्य तपासणी, आहाराच्या वेळा निश्चित करणे, प्रतिकार शक्ती वाढवणे गरजेचे आहे. वेळेचे व्यवस्थापन करून आनंदी मनाने काम करण्याचे कौशल्य साधता आले पाहिजे. तीच खरी आनंदी जीवनाची गुरुकिल्ली आहे असेही डॉ. चोपडा पुढे म्हणाले.

- **चित्रपट चावडी : 'क्राईम ॲण्ड पनिशमेंट' :** विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत 'क्राईम ॲण्ड पनिशमेंट' हा चित्रपट दाखविण्यात आला.
  जगप्रसिद्ध कादंबरीकार फॅदेर दोस्तोवस्की यांच्या 'क्राईम ॲण्ड पनिशमेंट' या कादंबरीवर हा चित्रपट आधारित होता.

- **मोफत धार्मिक पुस्तकांचे वाटप :** समाज सुसंस्कृत होण्यासाठी व समाजमनाची विधायक जडणघडण होण्यासाठी आपल्या संस्कृतीचा, आध्यात्मिक परंपरेचा शोध घेण्यासाठी आध्यात्मिक पुस्तकांचे, संत चरित्रांचे वाचन करणे गरजेचे आहे. त्यातून सत्वशील समाज निर्माण होण्यास निश्चित मदत होईल असे प्रतिपादन विश्वास को-ऑप. बँकेचे संस्थापक अध्यक्ष विश्वास जयदेव ठाकूर यांनी केले. विश्वास ग्रुप, रविवार कारंजा गणेशोत्सव मंडळ, रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ

यांच्या संयुक्त विद्यमाने गणेश चतुर्थी निमित्त रविवार कारंजा येथे मोफत आध्यात्मिक पुस्तकांचे वाटप करण्यात आले. त्याप्रसंगी श्री. विश्वास ठाकूर बोलत होते. मा. ठाकूर म्हणाले की, वाचन संस्कृती वाढविण्याबरोबरच नव्या पिढीला विचारांची व संस्कारांची जोड देण्यासाठी पुस्तके मोलाची भूमिका बजावत असतात. याप्रसंगी 'ग्रंथ तुमच्या दारी' योजनेचे शिल्पकार विनायक रानडे, रविवार कारंजा गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पवार, कार्याध्यक्ष पोपटराव नागपूरे, सेक्रेटरी रविंद्र पाटील आदी उपस्थित होते. यावेळी मराठी, हिंदी धार्मिक परंपरेतील अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथाचे, संदर्भ ग्रंथांचे, मासिकांचे वाटप करण्यात आले.

- **पर्यावरणपूरक अंत्यसंस्कार या विषयावर व्याख्यान :**
देशभरात विविध कारणांनी सरासरी एक कोटी नागरिकांचे निधन होते. त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी सुमारे दोन कोटी वृक्ष तोडले जात असून पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. शेतीत पीक निघाल्यानंतर उरणारा कचरा न जाळता त्यापासून गोवऱ्या बनविण्याची 'मोक्षकाष्ठ' ही पद्धत या प्रश्नावर उपाय ठरू शकते. त्यामुळे अंत्यसंस्कारासाठी या पद्धतीला प्राधान्य द्यावे, असे आवाहन नागपूरचे नौदलातील निवृत्त अधिकारी विजय लिमये यांनी केले. विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान- विभागीय केंद्र नाशिक, रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ, सारस्वत बँक यांच्यातर्फे आयोजित 'पर्यावरणपूरक अंत्यसंस्कार' या विषयावर ते बोलत होते. श्री. लिमये यांनी मोक्षकाष्ठ कल्पना समजावून सांगितली. ते म्हणाले की, अंत्यसंस्कारासाठी वापरली जाणारी लाकडे मिळविण्यासाठी भारतीय वंशाच्या लाखो झाडांची कत्तल केली जाते. पर्यावरणाच्या हानीकडे मानवी दृष्टिकोनातून पाहावे. पीक निघाल्यावर उर्वरित कचरा जाळला जातो. या कचऱ्यापासून लाकडी विटा तयार करण्याची संकल्पना २०१५ मध्ये सुरू केली. नागपूर महापालिकेने अंत्यसंस्कारासाठी पद्धत स्वीकारली आहे. देशभर ही पद्धत स्वीकारल्यास दोन कोटी वृक्षांचे प्रत्येक वर्षी संवर्धन होऊ शकेल. व्याख्यानास पर्यावरणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- **'चित्रपट चावडी' : 'लि हावर' :**
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत 'लि हावर' हा चित्रपट दाखविण्यात आला. फिनलँडचे चित्रपट दिग्दर्शक अकी कौरीस्माको ह्यांच्या तीन चित्रपटांच्या मालिकेतील हा शेवटचा चित्रपट. 'लि हावर' ह्या चित्रपटाचे कथानक उत्तर फ्रान्समधील लि हावर बंदरात घडते. आफ्रिकेतील अनेक देशांतून लोक अनधिकृतपणे युरोपातील अनेक देशामध्ये आश्रय घेऊ पाहतात. इद्रीस हा गॅबन मधून आलेला कुमारवयीन मुलगा व मार्सेल हा बुटपॉलीश करून पोट भरणारा वृद्ध यातील ही आश्वासक, उबदार कथा, मार्सेल, इद्रीसला त्याच्या आईला भेटविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतो.

- **नॉनव्हेज महोत्सव :**
डिसेंबरमधील थंडीसोबत विश्वास लॉन्स येथे नॉनव्हेज महोत्सवात प्रत्येकाचा आनंद द्विगुणीत होत होता. खवय्यांनी सुट्टी खऱ्या अर्थाने कारणी लावली, असेच म्हणावे लागेल. तीन दिवसीय नॉनव्हेज महोत्सवात वीस हजाराहून अधिक खवय्यांनी प्रतिसाद दिला. स्वादिष्ट मसालेदार मटन, कोंबडी, मासे यांचे शंभरहून अधिक प्रकार खास खवय्यांसाठी पर्वणी ठरले होते. वेगळेपणा आणि वैविध्य याचा अनुभव विश्वास लॉन्सवर प्रत्येकाला आला. फिश टिक्का, फिश मसाला फ्राय, चिकन सॉसेस, चिकन पकोडा अशा अनेक पदार्थांनी महोत्सवात चांगलीच रंगत आणली होती. खाद्यपरंपरेत नॉनव्हेज पदार्थ तयार करण्याच्या विशिष्ट पद्धती किती विलक्षण आहेत, याचा अनुभवही येथे आला. नाशिक शहराच्या विकासात फुड कल्चर हे नव्याने होत आहे. त्याचेच हे दर्शन होते, असे म्हणावे लागेल. या महोत्सवाचे हॉस्पिटॅलिटी पार्टनर किरण विंचुरकर यांच्या भरोसा केटरर्स तर सी-फुड पार्टनर कोकण करी, कॅफे पार्टनर कॅफे क्रेम इंदिरानगर, वाईन पार्टनर यॉर्क वाईनरी हे होते. शुद्ध व सात्विक शाकाहारींसाठी खास व्यवस्था करण्यात आली होती, हे महोत्सवाचे वेगळेपण ठरले. ब्लॅक चिकन लोणचं, मटका चिकन, खपसा, मटका दम चिकन, चिकन पकोडा, लोबस्टर, ऑईललेस तंगडी, चिकन चीज रोट, मंदी चिकन राईस, चिकन दाबेली, चिकन सॉसेस, फिश खर्डा, फिश खिमा, फिश बिर्याणी, मटन बिर्याणी, सौदी डिशेस, मंगोलियन स्टाईल आदी पदार्थाची रेलचेल होती. महोत्सवानिमित्त विश्वास ग्रुपतर्फे उत्कृष्ट गायक, गायिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यालाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेचे संयोजन सुप्रसिद्ध गायक व संगीतकार संजय गीते यांनी केले होते.

- **नववर्षाच्या पूर्वसंध्येला 'चुरा लिया है तुमने जो दिल को..' मैफल :** घर आजा, घिर आये बदरा सावरीया, ये शाम मस्तानी, ये क्या हुआ, कैसे हुआ अशा एकाहून एक सरस गीतांनी आर.डी. बर्मन यांच्या स्वरांची मोहिनी अजूनही किती आहे याचा अनुभव विश्वास लॉन्स येथे जमलेल्या हजारो रसिकांना आला. नववर्षाच्या

पूर्वसंध्येला नव्या संकल्पांची नवी मैत्री, नवी ओळख आनंदाची जाणीव असलेल्या नवीन वर्षाची सुरुवात ही थोड्याशा आगळ्यावेगळ्या पद्धतीने व्हावी, याकरिताच नववर्षाच्या पूर्वसंध्येला काही चांगले संकल्प घेऊन नवीन वर्ष उत्सव आपण सर्वच एका वेगळ्या प्रकारे साजरा करावा या संकल्पनेतून विश्वास ग्रुप, विश्वास हॅपीनेस सेंटर तर्फे व विश्वास संकल्प आनंदाचा उपक्रमांतर्गत संगीतकार आर. डी. बर्मन यांनी संगीतबद्ध केलेल्या समधुर गीतांची मैफल 'चुरा लिया है तुमने जो दिल को...' या मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. जगण्यातील आर्तता, उत्कटता, हर्ष आणि आनंदाचा अनोखा मिलाफ आर.डी. यांच्या संगीतात होता याची प्रचिती प्रत्येक गाण्यात येत होती. ख्यातनाम लेखक अंबरीश मिश्र यांचे अभ्यासपूर्ण निवेदन आणि आठवणी आर.डी. बर्मन यांच्या संगीताचे मर्म उलगडून दाखवण्यासाठी पूरकच ठरले. हिंदी आणि बंगाली चित्रपटसृष्टीत त्यांनी केलेले प्रयोग गीतांचा आशय पोहोचवण्यासाठी किती प्रभावी होते याचा अनुभव प्रत्येक रसिकाने घेतला. इस मोड से जाते हैं, चुनरी संभाल गोरी, ओ मांझी रे, जाने क्या बात है, तेरे बिना जिया लागे ना, आज उनसे पहली मुलाकात होगी, ओ मेरे दिल कै चैन, क्या जानू सनम, तेरे बिना जिंदगी सें, आनेवाला पल, रिमझिम गिरे सावन, हमें तुमसे प्यार कितना, होगा तुसे प्यारा कौन, हम दोनो दो प्रेमी अशा एकाहून एक सरस गीतांनी मैफलीत चांगलीच रंगत आणली. गायिका रागिणी कामतीकर, मिलींद धटींगण व विवेक केळकर यांनी गीतांचे अप्रतिम सादरीकरण केले.

- **चित्रपट चावडी : 'द स्वीट हिअरआफ्टर':**

विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध कॅनेडियन दिग्दर्शक ॲटम एगोयान यांचा 'द स्वीट हिअरआफ्टर' हा चित्रपट दाखविण्यात आला. कॅनेडियन दिग्दर्शक ॲटम एगोयान यांना भारताच्या 'आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०१७' मध्ये जीवनगौरव हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला. इजिप्शीयन आर्मेनियन वंशाचे एगोयान कॅनेडातील तसेच जागतिक पटलावरचे महत्त्वाचे दिग्दर्शक मानले जातात. 'द स्वीट हिअरआफ्टर' ह्या त्यांच्या चित्रपटात कॅनडातील एका छोट्या गावात स्कूल बसच्या अपघातात अनेक मुले मृत्यूमुखी पडतात. एक वकील त्या गावातील लोकांसाठी, विशेषत: ज्यांची मुले त्या अपघातात वारली त्यांना मदत करण्यासाठी येतात; परंतु त्यामुळे त्या छोट्या गावातील सर्वांचेच जीवन ढवळून निघते. १९९७ मध्ये कॅनडा येथे प्रदर्शित झालेल्या या सिनेमाचा कालावधी ११२ मिनिटांचा आहे.

- **चित्रकला स्पर्धा :**

मनाच्या कप्प्यातील विविध आकार, फुले, पक्षी, झाडांची विविध रूपे, निसर्ग, स्वच्छतेचे महत्त्व, रंगाचा अभिनव वापर, आजच्या विविध टी.व्ही. मालिकांतील पात्रांना दिलेले चित्ररूप या अनोख्या दुनियेत शालेय विद्यार्थी घेऊन गेले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच त्यांच्यातील कल्पकता व सुप्त गुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

शालेय विद्यार्थ्यांसाठी 'विश्वास संकल्प आनंदाचा-२०१८' उपक्रमांतर्गत भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. चित्रकला स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना बक्षिसे व प्रशस्तिपत्रके देण्यात आली.

चित्रकला स्पर्धेसाठी ५५ शाळांनी सहभाग नोंदवला होता. त्यात वीस हजारांहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

- **चित्रपट चावडी : 'नेक्स्ट ऑफ किन':**

विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध कॅनेडियन दिग्दर्शक ॲटम एगोयान यांचा 'नेक्स्ट ऑफ किन' हा चित्रपट दाखविण्यात आला.

तेवीस वर्षाचा एक तरुण आपल्या आई-वडिलांकडे कुठलाही कामधंदा न करता राहत असतो. कुटुंबालाही त्याच्या ह्या वागण्याविषयी कायम चिंता वाटत असते. एकदा कुटुंबाचा मित्र तरुणाला दुसरीकडे पाठवण्याचा सल्ला देतो. त्यामुळे तरी तरुण काहीतरी नोकरी करून स्वत:च्या पायावर उभा राहील असे त्यांना वाटत असते. नंतर हा तरूण दुसऱ्या कुटुंबात राहायला जातो आणि त्या कुटुंबाविषयी त्याच्यात अनामिक, आस्था असलेलं नातं निर्माण होतं. अशा हृदयस्पर्शी नात्याचा ह्यात शोध आहे.

- **पर्यटनातून संशोधन कार्यशाळा :**

विद्यार्थ्यांनी आपल्यातील कल्पकता, कुतूहल कायम जागरूक ठेवणे गरजेचे असून आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात समाजासाठी उपयुक्त असे विधायक संशोधन करावे व देशविकासाला हातभार लावावा. तसेच आजच्या विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता मोठ्या प्रमाणावर आहे त्याचा शोध घेणे शाळांबरोबरच सर्वांची जबाबदारी आहे. त्यासाठी सायन्स टुर्ससारखे उपक्रम दिशादर्शक आहेत. असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नाशिकचे कार्याध्यक्ष विश्वास जयदेव ठाकूर यांनी केले. आर.एस. सायन्स टुर्स ही संस्था 'पर्यटनातून

संशोधन' या संकल्पनेवर विज्ञान पर्यटन हा उपक्रम राबवत आहे. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने या संस्थेच्या माध्यमातून शास्त्रज्ञांबरोबर संशोधनावर आधारित चर्चासत्राचे आयोजन रचना विद्यालय हायस्कूल, शरणपूररोड, नाशिक येथे करण्यात आले होते. त्याप्रसंगी विश्वास ठाकूर यांनी प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन केले. त्याप्रसंगी सहस्त्ररश्मी पुंड यांनी पेटंट्स कॉपीराईट्स आणि ट्रेडमार्क याविषयी मार्गदर्शन केले. एखाद्या संकल्पनेला पेटंट पर्यंत पोहोचवून देण्यात प्रयत्न करण्याचे आश्वासनही श्री. पुंड यांनी दिले. पिंपरी चिंचवड सायन्स पार्कचे एन.टी. कासार यांनी रोजच्या जीवनातील संशोधन प्रत्येक राज्यातील विज्ञान केंद्र आणि तेथील प्रोजेक्ट्स याबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेले विविध प्रयोग येथे मांडण्यात आले होते. त्याचे उपस्थितांनी कौतुक केले. यावेळी रचना विद्यालयाच्या मुख्याध्यापिका संगीता टाकळकर यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमास पक्षीमित्र दिगंबर गाडगीळ उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक आर.एस. सायन्स टुर्सचे रवींद्र शास्त्री यांनी केले व भविष्यातील उपक्रमांविषयी माहिती दिली.

**'ग्रामीण भागात समृद्धी आणायची असेल तर शेती व्यवसाय किफायतशीर झाला पाहिजे. शेतीला लागणारी खतं व इतर साधनं स्वस्तात मिळावी म्हणून आपलं सरकार काही प्रमाणात सबसिडी देतं ही गोष्ट खरी आहे. परंतु, शेतमालाला फायदेशीर किंमती ठरवून देण्याचा प्रश्न आपण अजून सोडवू शकलेलो नाही. शेतकऱ्याला त्याच्या मालाची योग्य व किफायतशीर किंमत मिळत नाही आणि दुसऱ्या बाजूने दलाल त्याची अडवणूक करतो. त्यामुळे, शेतकरीवर्ग कमालीचा त्रस्त, असंतुष्ट आहे. प्रमुख शेतमालाच्या किंमती ठरवण्याची आणि त्यासाठी आवश्यक असलेलं धोरण आखण्याची वेळ म्हणूनच आता येऊन ठेपली आहे.**

**त्यासाठी ग्रामीण भागात बारमाही उपयोगात येतील असे रस्ते वगैरे दळणवळणाची साधनं उपलब्ध करून दिली पाहिजेत. प्रत्येक जिल्ह्यात शेतमालाचं उत्पादन, त्यावर आधारीत प्रक्रिया-उद्योग आणि मालाच्या विक्रीचीही व्यवस्था करून दिली पाहिजे.'**

**- मा. शरद पवार**

# विभागीय केंद्र, कोकण

## कार्यवृत्त

**ज्येष्ठ नागरिक दिन कार्यक्रम :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कोकण विभागीय केंद्र व ज्येष्ठ नागरिक संघ देवरूख यांचे संयुक्त विद्यमाने १ ऑक्टोबर रोजी 'ज्येष्ठ नागरिक दिन' कार्यक्रम, नक्षत्र मंगल कार्यालय, देवरूख येथे सायंकाळी ४.०० वा. संपन्न झाला. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कोकण विभागीय केंद्र जिल्हा समिती रत्नागिरीचे अध्यक्ष मा. श्री. कृ. आ. पाटील, माजी जिल्हाध्यक्षा सौ. युगंधरा राजेशिर्के, ज्येष्ठ नागरिक संघ देवरूखचे अध्यक्ष श्री. प्रकाश घस्ते, उपाध्यक्ष श्री. शरद भोंगरे, देवरूखचे सबइन्स्पेक्टर श्री. पाटील, श्री. युयुत्सू आर्ते, श्री. प्रमोद हर्डीकर व बहुसंख्येने ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

देवरूख येथील ज्येष्ठ नागरिक संघ, ज्येष्ठांसाठी वर्षभर कार्यक्रम राबवित असतात. हा संघ तालुक्यामध्ये होणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होत असतो. संघाच्या यशस्वी वाटचालीबद्दल यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने संघाचे अध्यक्ष श्री. प्रकाश घस्ते व उपाध्यक्ष श्री. शरद भोंगरे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व संघाला शुभेच्छा देण्यात आल्या.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती जिल्हाध्यक्ष श्री. कृ. आ. पाटील यांनी यावेळी दिली.

- **वक्तृत्व स्पर्धा** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कोकण विभागीय केंद्र रत्नागिरीचे वतीने दि. १५ नोव्हेंबर २०१७ रोजी हातखंबा हायस्कूल रत्नागिरी येथे स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धा ७ वी, ९ वी व ११ वी या तीन गटात घेण्यात आल्या.
  ७ वी साठी 'सह्याद्रीचा सुपुत्र', ९ वी साठी 'साहित्यिक यशवंतराव चव्हाण' व ११ वी साठी 'द्रष्टे नेतृत्व यशवंतराव चव्हाण' हे विषय देण्यात आले होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री. ए. एस. नदाफ, श्री. बी. डी. गावीत, श्री. एस. एस. रानमाळे व श्री. सुभाष पाटील यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे आयोजन श्री. चंद्रमोहन देसाई यांनी केले.

- **शिक्षण कट्टा** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कोकण विभागीय केंद्र रत्नागिरी, सह्याद्री शिक्षण संस्था सावर्डे, व पंचायत समिती शिक्षण विभाग, ता. चिपळूण यांचे संयुक्त विद्यमाने दि. १५ नोव्हेंबर २०१७ रोजी शिक्षकांसाठी 'शिक्षण कट्टा' या कार्यक्रमाअंतर्गत आनंददायी कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये व्याख्याते श्री. वसंत हंकारे यांनी 'मूल समजून घेताना' या विषयावर शिक्षकांबरोबर संवाद साधला.

- **शेतीकट्टा** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कोकण विभागीय केंद्र रत्नागिरीचेवतीने यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी निमित्त दि. २४ नोव्हेंबर २०१७ रोजी गुहागर येथे 'शेतीकट्टा' हा कार्यक्रम घेण्यात आला.
  कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी विभागीय समिती सदस्या जानकीताई बेलोसे होत्या. कार्यक्रमाला दापोली कृषी विद्यापीठ व खरवते कृषी विद्यापीठातील कृषीतज्ञांनी परसबागेतील शेती व फळप्रक्रिया या विषयावर मार्गदर्शन केले. आंबा, नारळ, सुपारी यांचे शाश्वत उत्पादन कसे घ्यावे हे सांगितले.
  कार्यक्रमाला बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन गुहागर येथील जिल्हा समिती सदस्या मा. सुप्रिया साळवी यांनी केले.

- **स्व यशवंतराव चव्हाण स्मृतिदिन :**

**अ) रत्नागिरी जिल्हा :**

यशवंतराव चव्हाण यांचा ३३ वा स्मृतिदिन कार्यक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान–कोकण विभागीय केंद्राच्या वतीने चिपळूण येथील सावर्डे हायस्कूलच्या सेमिनार हॉलमध्ये घेण्यात आला. यावेळी कोकण विभागीय केंद्राचे वतीने 'यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार २०१७' रत्नागिरी येथील 'जाणीव फाऊंडेशन रत्नागिरी' या संस्थेला कोकण विभागीय अध्यक्ष मा. श्री. शेखर निकम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार संस्थेचे अध्यक्ष श्री. महेश गर्दे व सहकाऱ्यांनी स्वीकारला. शाळ, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, मानपत्र व रोख रू. १५ हजार असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

जाणीव फाऊंडेशनचे अध्यक्ष मा. श्री. महेश गर्दे यांनी यशवंतराव चव्हाण साहेबांचे नावाचा पुरस्कार देऊन आमच्या संस्थेचा गौरव केल्याबद्दल प्रतिष्ठानचे आभार मानले. समाजाप्रती असलेली आमची जबाबदारी आणखीनच वाढली असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. शेखर निकम, माजी अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, श्री धनंजय चितळे, श्री. प्रकाश देशपांडे, जिल्हाध्यक्ष मा. श्री. कृ. आ. पाटील, चिपळूण पंचायत समिती सभापती मा. सौ. पूजा निकम, श्रीम. प्राची शिंदे, श्री. सुभाष मोहिरे, शौकत माखजनकर, अशोक विचारे आदी मान्यवर उपस्थित होते.

'पारतंत्र्याच्या काळात आपल्या वयाच्या १४ व्या वर्षी वर्तमानपत्रे एकांगी असल्याचे रोखठोक मत मांडणाऱ्या युवकाने विलक्षण वाचन सामर्थ्यावर सर्वच क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले. एक वाचक, रसिक आणि व्यासंगी व्यक्तिमत्त्वाची छाप त्यांच्या प्रगल्भतेतून पडत असे. यशवंतराव चव्हाण आपल्या कार्यतत्परतेने महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. प्रचंड वाचन आणि दुर्दम्य इच्छा शक्तीच्या जोरावर देशाच्या राजकारणात त्यांचे स्थान अधोरेखित आहे. यशवंतराव १९६४ साली देशाचे संरक्षणमंत्री होते, त्या वेळी त्यांनी सैनिकांचा आत्मविश्वास वक्तृत्वाने वाढवला. कार्यकर्त्यांनी वाचनाचा छंद जोपासण्यासाठी आग्रह धरणारा यशवंतरावांसारखा नेता राजकारणात विरळाच' अशा शब्दात धनंजय चितळे यांनी यशवंतराव चव्हाण यांचा गौरव केला.

कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. शेखर निकम व लोटिस्माचे अध्यक्ष मा. श्री. प्रकाश देशपांडे यांनीही स्व. यशवंतराव चव्हाण यांच्याबद्दल गौरवोद्‌गार काढले.

**ब) सिंधुदुर्ग जिल्हा :**

स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त वेंगुर्ले कॅम्प येथील महिला काथ्या कारखाना येथे दि. २५ नोव्हेंबर २०१७ रोजी कार्यक्रम घेण्यात आला. कोकण विभागीय समितीचे माजी कोषाध्यक्ष मा. श्री. एम. के. गावडे यांनी स्व. चव्हाण साहेबांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. यावेळी सिंधुदूर्ग जिल्हा बँकेच्या संचालिका सौ. प्रज्ञा परब, मनिषा परब, पूनम आरोलकर, चंद्रकांत जाधव व अन्य मान्यवर उपस्थित होते.

यशवंतरावांनी राजकीय कारभार करताना गावपातळीपर्यंत कार्यकर्ते घडविले म्हणूनच महाराष्ट्रात पंचायत राजची संकल्पना यशस्वी ठरली असे प्रतिपादन मा. श्री. एम. के. गावडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. प्रज्ञा परब यांनी केले.

**माहे डिसेंबर २०१७ :**

- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान -कोकण विभागीय केंद्राचे वतीने स्व. यशयवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन गटातून वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ तसेच कृषी व सहकार व्यासपीठ पुणे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांचे वतीने शिक्षकांसाठी घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ दि. १६ डिसेंबर २०१७ रोजी नवनिर्माण महाविद्यालय एम. आय. डी. सी. रत्नागिरी येथे घेण्यात आला.

  यावेळी कोकण विभागीय समितीचे माजी अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, माजी उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर, जिल्हाध्यक्ष श्री. कृ. आ. पाटील, कोकण विभागीय समितीचे माजी सदस्य श्री. चंद्रमोहन देसाई, नवनिर्माण संस्थेचे अध्यक्ष अभिजित हेगशेटये, श्री. सुकुमार शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान-कोकण विभागीय केंद्र आणि जीवनविद्या मिशन शाखा चिपळूण यांचे संयुक्त विद्यमाने दि. २४ डिसेंबर २०१७ रोजी सह्याद्री शिक्षण संस्था संचालित गोविंदराव निकम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात 'युवकांनो सोने करा आयुष्याचे' या उपक्रमांतर्गत युवा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला प्रमुख वक्ते तत्त्ववेत्ता श्री. वामनराव पै यांचे नामधारक श्री. अद्वैत सामंत व श्री. प्रथमेश शिगवण उपस्थित होते.

  आजच्या तरुणांना योग्य व अचूक मार्गदर्शनाचा अभाव आहे. अनेक समस्यांनी तो वेढला गेला आहे. शारीरिक, मानसिक व शैक्षणिक बदलामुळे निर्माण होणारे अनेक प्रश्न त्याच्यासमोर आहेत. घरच्यांशी त्याचा संवाद कमी झाला आहे. त्याला संगत चुकीची मिळत आहे. आकर्षणाला बळी पडल्यामुळे भविष्याकडे दुर्लक्ष होते आहे. या भरकटत चाललेल्या तरुण पिढीला योग्य व अचूक मार्गदर्शनासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

  कार्यक्रमाला कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. शेखर निकम, श्री. अशोकराव विचारे, श्री. शांताराम खानविलकर, श्रीमती आकांक्षा पवार, प्राचार्य श्री. अन्वर मोडक, उपमुख्याध्यापक श्री. अधिक कांबळे, पर्यवेक्षक श्री. नंदकिशोर मालेकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक श्री. नंदकिशोर मालेकर यांनी केले व सूत्र संचालक श्री. प्रकाश वावरे यांनी केले.

- **पाककला व प्रशिक्षण कार्यक्रम**

  यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान -कोकण विभागीय केंद्र व लायनेस क्लब रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी दि. २३ जानेवारी २०१८ रोजी विविध मसाले बनविण्याचे प्रशिक्षण व पाककला स्पर्धा

घेण्यात आली.

पाककलेमध्ये गहू व बाजरी यापासून मधुमेहींसाठी लो कॅलरी पदार्थ बनविण्याची स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये प्रथम क्रमांक सायली संजय पालव – (डोसा फॅकी), द्वितीय क्र. – सुस्मिता सुर्वे (डायबेटिक लाडू) तृतीय क्र. – मिनल धुंदूर (गव्हाची खीर) उत्तेजनार्थ– सानिका संतोष सावंत (मोमोज) यांना विजयी घोषित करण्यात आले. परीक्षक म्हणून डॉ. शिवानी पानवलकर व सौ. अदिती देसाई उपस्थित होत्या.

श्रीमती सईदा बाग यांनी महिलांना विविध मसाले बनविण्याचे प्रशिक्षण दिले. यामध्ये त्यांनी बिर्याणी मसाला, पावभाजी मसाला, सांबार मसाला, चहा मसाला, दूध मसाला इ. मसाले कसे बनवावेत याचे प्रात्यक्षिक दिले.

यावेळी लायनेस क्लबच्या अध्यक्षा श्रीमती प्राची शिंदे, श्रीमती सईदा बाग, श्रीमती स्वाती सोनार, श्रीमती शकुंतला झोरे, श्रीमती प्रणिता देसाई व बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.

**चित्रपट चावडी :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान–कोकण विभागीय केंद्र व सह्याद्री शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' या उपक्रमांतर्गत दि. २९ जानेवारी २०१८ रोजी सावर्डे येथील सह्याद्री पॉलीटेक्नीक कॉलेजच्या इनडोअर हॉल मध्ये दु. २.०० वा 'नदी वाहते' हा चित्रपट दाखविण्यात आला. यावेळी या चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक व निर्माते श्री. संदिप सावंत यांच्यासह श्री. प्रशांत निकम, सौ. युगंधरा राजेशिर्के, प्रा. मंगेश भोसले, श्रीमती अनुजाराजे भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

आजच्या बदलत्या जीवनशैलीत मानव निगर्साचा समतोल दिवसागणिक बिघडवत आहे. आपल्या भौतिक सुखासाठी व अक्षम्य हव्यासापोटी नद्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. याला कारणीभूत मानव आहे. त्यामुळे भविष्यातील अनेक पिढ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होत आहे. हे आजच्या तरुणांनी लक्षात घेऊन पर्यावरण समतोल राखून नद्यांच्या संवर्धनासाठी सामाजिक बांधीलकीतून पुढे यावे; असे आवाहन चित्रपट निर्माते व दिग्दर्शक संदीप सावंत यांनी यावेळी केले.

**'आजही साडेतीन कोटी एकर जमीन महाराष्ट्रात अशी आहे की, जी गळक्या भांड्यासारखी आहे. मथुरेची गवळण पाणी भरून डोक्यावर हंडा घेऊन निघाली; आणि घरी येऊन पाहते तो आपल्या डोक्यावरच्या हंड्यामध्ये पाणी नाही. तसेच आपल्या शेतीचे झाले आहे. दरवर्षी मृग नक्षत्रापासून हस्त नक्षत्रापर्यंत भरलेल्या नक्षत्रांच्या बाजारामध्ये आपल्या डोक्यावर भांडे घेऊन जाते बिचारी आमची शेती; पण त्यात शेवटी काही शिल्लक राहत नाही. आमच्या महाराष्ट्राच्या शेतीचा हा मथुरेचा बाजार झालेला आहे.'**

**– मा. यशवंतराव चव्हाण**

# विभागीय केंद्र, औरंगाबाद

## कार्यवृत्त

**जागर जाणिवांचा : सुप्रिया सुळे यांच्या अभियानात उलगडले वास्तव :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे खा. सुप्रिया सुळे यांनी राज्यभरात 'युवा संवाद यात्रा' अंतर्गत 'जागर हा जाणिवांचा' हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमात विविध महाविद्यालयांतील युवकांशी स्त्रीभ्रूणहत्या, हुंडाबळी, युवतींवरील अत्याचार, युवांची व्यसनाधीनता आदी सामाजिक समस्यांवर संवाद साधण्यात येत आहे. बुधवारी, ११ ऑक्टोबर रोजी औरंगाबाद शहरातील देवगिरी महाविद्यालय व सरस्वती भुवन महाविद्यालयात हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी स. भु. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. दिनकर बोरीकर, 'मशिप्रमं'चे सरचिटणीस आमदार सतीश चव्हाण, विक्रम काळे, भाऊसाहेब पाटील चिकटगावकर, प्राचार्य डॉ. शिवाजीराव थोरे, प्राचार्य जे. एस. खैरनार, प्राचार्य दोडके आदी उपस्थित होते.

या दोन्ही कार्यक्रमात बोलताना खा. सुळे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना मनमोकळेपणाने उत्तरे दिली. मराठा, मुस्लिम, धनगर आरक्षण, हुंडाबळी, स्त्री अत्याचार, मासिक पाळी, जातीवाद, भेदभाव, राजकारण, अशा असंख्य विषयांना वाचा फोडली. यात उत्तरे देताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, 'पूर्वीपेक्षा आता जाती, धर्मांची जास्त चर्चा होत आहे हे चुकीचे आहे. आपण चुकीच्या मार्गाने चाललो आहोत. हा मार्ग बंद करण्यासाठी युवकांनीच पुढे आले पाहिजे. स्वतःपासून प्रत्येक सामाजिक बदलाची सुरुवात केल्यास कोणालाही अडचण येणार नाही. यासाठी प्रत्येकाने किमान स्वतःला बदलण्याची गरज असल्याचेही सुळे यांनी स्पष्ट केले. दोन्ही ठिकाणच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. देवगिरीचे महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. तर स. भु. महाविद्यालयाचे नाट्यगृहही विद्यार्थ्यांनी खचाखच भरले होते.

कार्यक्रम यशस्वितेसाठी स. भु. महाविद्यालयात प्रतिष्ठानचे नीलेश राऊत, सुबोध जाधव, मंगेश निरंतर, गणेश घुले, महेश अचिंतलवार, मयुर देशपांडे, रेणुका कड यांनी परिश्रम घेतले. स. भु. त शेवटी अभ्युदय फाऊंडेशनच्या दिवाळी पहाट कार्यक्रमाच्या पोस्टरचे विमोचन करण्यात आले.

**चित्रपट चावडीत 'हिडन फिगर्स' चित्रपटास उत्स्फूर्त प्रतिसाद :**

विभागीय केंद्र औरंगाबाद, एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या आयोजित चित्रपट चावडी या उपक्रमाअंतर्गत 'हिडन फिगर्स' हा चित्रपट शनिवार, दि. १८ नोव्हेंबर २०१७ रोजी सायं. ५.०० वा. आईनस्टाईन सभागृह, जेएनईसी महाविद्यालय, एमजीएम परिसर, औरंगाबाद येथे दाखविण्यात आला. या वेळी रसिकांनी चित्रपटास उत्स्फूर्त गर्दी केली होती.

चित्रपटाचे डायरेक्टर थेवडॉर मेल्फी असून नासा या अंतराळ संस्थेच्या सुरुवातीच्या काळात महत्त्वाची भूमिका साकारणाऱ्या तीन आफ्रिकन-अमेरिकन वंशाच्या गणित शास्त्रज्ञ महिलांची ही प्रेरणादायी कथा आहे. कॅथेरिन जॉन्सन आणि तिच्या दोन सहकारी डोरोथी व्हॅगन आणि मॅरी जॅक्सन यांनी केलेल्या गणिती आकडेमोडीमुळे अमेरिकेला अंतराळामध्ये पाऊल टाकणे शक्य झाले. त्यामुळेच जॉन ग्लीन या अमेरिकेच्या पहिल्या अंतराळवीराला पृथ्वी प्रदक्षिणा घालता आली.

हे काम करीत असताना कॅथेरिन जॉन्सन आणि तिच्या सहकारी डोरोथी व्हॅगन आणि मॅरी जॅक्सन यांना नासा या प्रतिष्ठित संस्थेतील वंश भेदाचे अनुभवही आले. वंशभेदाच्या मर्यादा ओलांडत त्यांनी नासामध्ये गाजवलेली कारकीर्द अमेरिकन-आफ्रिकेतील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरली. पण त्यांचे हे कर्तृत्व मोठा काळ उलटल्यानंतर म्हणजे २०१६ मध्ये मॉर्गाट ली शटर्ली यांच्या 'हिडन फिगर्स' या पुस्तकाने जगासमोर आणले. याच पुस्तकावर आधारित हा चित्रपट आहे.

चित्रपटानंतर रसिकांनी चित्रपटाविषयी आपली मते मांडली. दरम्यान सर्वांनी चित्रपट आवडल्याचे आवर्जून सांगत संयोजकांचे आभार मानले. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबादचे अध्यक्ष अंकुशराव कदम, कोषाध्यक्ष सचिन मुळे, सचिव नीलेश राऊत, कार्यकारिणी सदस्य डॉ. भालचंद्र कांगो, प्रा. अजित दळवी, डॉ. श्रीरंग देशपांडे, बिजली देशमुख, डॉ. मकदूम फारुकी, सुनील किर्दक, प्रा. दासू वैद्य, विजय कान्हेकर, डॉ. रेखा शेळके, सुहास तेंडुलकर, सुबोध जाधव, रेणुका कड आदी उपस्थित होते. तर कार्यक्रम यशस्वितेसाठी निखिल भालेराव, मंगेश निरंतर, मयुर देशपांडे आदींनी परिश्रम घेतले.

**यशवंतराव चव्हाण स्मृती रेखाचित्र दालनाचे उद्‌घाटन :**

''यशवंतराव चव्हाण यांनी राज्याच्या विकासाचा आराखडाच नव्हे; तर भाषा, संस्कृती आणि वाङ्मयाचे भान दिले'', असे मत मराठवाडा साहित्य परिषदेचे (मसाप) अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील यांनी

व्यक्त केले.

मसापच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात शुक्रवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी चव्हाण यांच्या ३३ व्या पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येस त्यांच्या जीवनविषयक कार्याचा वेध घेणाऱ्या रेखाचित्र दालनाचे उद्घाटन प्रतिष्ठानचे विभागीय अध्यक्ष अंकुशराव कदम यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद व मसापतर्फे हे चित्रप्रदर्शन भरवण्यात आले आहे. शिवनेरी गडावर तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू व यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व बालशिवाजी यांच्या प्रतिमेच्या अनावरणप्रसंगाची चित्रमालिका, महाराष्ट्राचा मंगल कलश आणला गेला, त्या प्रसंगाची चित्रमालिका, त्याच बरोबर संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथविधी व राज्यनिर्मितीचा आनंदसोहळा अशा एकूण २८ चित्रांमधून यशवंतरावांचा जीवनपट उलगडून दाखविण्यात आला आहे. हे चित्रप्रदर्शन कायमस्वरूपी असेल. प्रदर्शनाची सजावट करणारे पुष्कर कुंजर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

ठाले पाटील म्हणाले, ''यशवंतरावांनी या प्रदेशाची भूक ओळखून काहीतरी दिले पाहिजे, या भूमिकेतून शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. सत्तेच्या माध्यमातून त्यांनी समाज सुधारण्यासाठी काम केले. त्यामुळेच जयप्रकाश नारायण यांनी त्यावेळी देशातील सर्वोत्तम मुख्यमंत्री म्हणून त्यांच्या नावाचा गौरव केला होता. त्यांनी आपल्या काळात अनेक संस्थांच्या निर्मितीला हातभार लावला. त्यामुळेच आजही त्यांच्या कार्याचे विविध उपक्रमांच्या माध्यमातून स्मरण केले जाते.'' मसापचे विश्वस्त मधुकरराव मुळे यांनी यशवंतरावांच्या जीवनावर प्रकाश टाकला, दरम्यान, कदम यांनीही यशवंतरावां प्रति आपल्या भावना व्यक्त केल्या. नीलेश राऊत यांनी प्रास्ताविक केले. श्रीकांत देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्रा. दादा गोरे, के. एस. अतकरे, बिजली देशमुख, विजय कान्हेकर, सुहास तेंडुलकर, गणेश घुले, डॉ. संदीप शिसोदे, महेश अचिंतलवार, सुबोध जाधव उपस्थित होते.

**गुजरात निवडणुकीवर परिसंवादात विश्लेषकांचा सूर :**

विरोधी पक्ष गंभीर असेल, तरच लोकशाही खंबीर राहते. लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर गमावलेला आत्मविश्वास काँग्रेसने गुजरात निवडणुकीने पुन्हा कमावला. पराभव झाला तरी राहुल गांधी एक गंभीर नेतृत्व म्हणून पुढे आले, असा सूर राजकीय विश्लेषकांनी मंगळवार, ता. १९ डिसेंबर रोजी विशेष परिसंवादात लावला.

काँग्रेस–भाजपा प्रतिष्ठेचा विषय बनलेल्या गुजरात विधानसभा निवडणुकीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. त्या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद आणि एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्याल्यातर्फे 'लोकसंवाद' उपक्रमांतर्गत मंगळवारी (ता. १९) 'गुजरात निवडणूक अन्वयार्थ' या विषयावर विशेष परिसंवाद घेण्यात आला. सकाळी अकरा वाजता जेएनईसी महाविद्यालयाच्या आईनस्टाईन सभागृहात झालेल्या या परिसंवादात राजकीय पत्रकार संजय मिस्कीन, अभिजीत ब्रह्मनाथकर व राजकीय विश्लेषक श्रीकांत देशपांडे यांनी या निवडणूक निकालाचा अन्वयार्थ सांगितला.

मिस्कीन म्हणाले, शहर आणि ग्रामीण यात विभागलेल्या गुजरातमध्ये; सरकारबद्दल नाराजीची; नोटबंदी आणि जीएसटी ही प्रमुख कारणे होती. हार्दिक पटेल, जिग्नेश मेवानी, अल्पेश ठाकूर या वीस–बावीस वर्षांच्या तरुणांनी सत्तेला मोठे आव्हान दिले. गुजरात निवडणुकीपूर्वी पंतप्रधानांबाबत लोकांमध्ये शंभर टक्के सकारात्मकता होती; पण या निवडणुकीत पहिल्यांदा कुणीतरी मोदींना आव्हान दिले.

आचारसंहिता काळात राहुल गांधींनी दिलेल्या मुलाखतीवर भाजपने निवडणूक आयोगाकडे आक्षेप घेतला. त्यावर बंदी आली. परिणामी, सोशल मीडियातून ती मुलाखत प्रत्येकाने पाहिली. ही तक्रार म्हणजे भाजपची चूक ठरल्याचे निरीक्षण देशपांडे यांनी नोंदवले. धार्मिक ध्रुवीकरण करून यापुढे निवडणुका जिंकता येणार नाहीत, हा या निकालाचा महत्त्वाचा संदेश असल्याचेही ते म्हणाले.

गुजरातच्या सोमनाथ मंदिरापासून अयोध्येपर्यंत काढलेल्या यात्रेने भाजपला सत्तेचा राजमार्ग मिळाला होता. त्याचप्रमाणे आता राहुल गांधी यांनाही सोमनाथ मंदिरातच पुनरुद्धाराचा मार्ग सापडला. त्याला तीन तरुणांची साथ मिळाली आणि त्यांनी मोदींना टक्कर देत सक्षम आव्हान उभे केले, असे ब्रह्मनाथकर म्हणाले.

प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राचे सचिव नीलेश राऊत यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या परिसंवादाला सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे सहचिटणीस ज्ञानप्रकाश मोदाणी, एमजीएमच्या विशाखा गाडखेडकर, कृषिपर्यटन व्यावसायिक मनोज हाडवळे, सुहास तेंडुलकर, विजय कान्हेकर, सुबोध जाधव, गणेश घुले यांच्यासह विद्यार्थी, तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**'आ गले लग जा' चित्रपटाचे प्रदर्शन :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद, एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्यालय आयोजित चित्रपट

चावडी या उपक्रमाअंतर्गत शशी कपूर यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर त्यांना आदरांजली म्हणून त्यांचा १९७३ साली प्रदर्शित झालेला 'आ गले लग जा' हा चित्रपट शनिवार, दि. ३० डिसेंबर २०१७ रोजी सायं. ५.०० वा. आईनस्टाईन सभागृह, जेएनईसी महाविद्यालय एमजीएम परिसर, औरंगाबाद येथे दाखविण्यात आला. यावेळी चित्रपट रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सुरुवातीला शशी कपूर यांना तसेच औरंगाबाद येथील प्रसिद्ध गायिका आशालता करलगीकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी शशी कपूर व आशालता करलगीकर यांच्या आठवणींना उजाळा दिला. मूळच्या कर्नाटकातील असलेल्या व लग्नानंतर औरंगाबाद येथे स्थायिक झालेल्या आशाताईंचे मराठवाड्यातील नामवंत गायक पंडित नाथराव नेरळकर यांच्या सोबत गजल गायनाचे अनेक कार्यक्रम देशभरात लोकप्रिय झाले होते. आशाताईंनी अनेक तेलगु चित्रपटांमध्ये पार्श्वगायनही केले आहे. पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी यांच्यासमोरही त्यांना गाणे सादर करण्याची संधी मिळाली होती, माजी राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी मधुर आवाजामुळे त्यांना 'आंध्रलता' ही पदवी बहाल केली होती.

चित्रपटानंतर रसिकांनी संवाद साधत चित्रपटाविषयी आपली मते मांडली. दरम्यान सर्वांनी चित्रपट आवडल्याचे आवर्जून सांगत संयोजकांचे आभार मानले. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबादचे अध्यक्ष अंकुशराव कदम, कोषाध्यक्ष सचिन मुळे, सचिव नीलेश राऊत, कार्यकारिणी सदस्य डॉ. भालचंद्र कांगो, प्रा. अजित दळवी, डॉ. श्रीरंग देशपांडे, बिजली देशमुख, डॉ मकदूम फारुकी, सुनील किर्दक, प्रा. दासू वैद्य, विजय कान्हेकर, डॉ. रेखा शेळके, सुहास तेंडुलकर, सुबोध जाधव, रेणुका कड आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी निखिल भालेराव, मंगेश निरंतर, मयुर देशपांडे आदींनी परिश्रम घेतले.

**पहिल्यांदाच स्पर्धा गटांचा समावेश, देशभरातील साठहून अधिक मान्यवर उपस्थित, विविध भाषांतील ३० चित्रपटांचे प्रदर्शन, 'क्षितीज'ला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे मानांकन :**

नाथ ग्रुप व महात्मा गांधी मिशन प्रस्तुत व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई – विभागीय केंद्र औरंगाबाद आयोजित औरंगाबाद इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने दि. १८ ते २१ जानेवारी २०१८ दरम्यान हा महोत्सव आयनॉक्स थिएटर, प्रोझोन मॉल, औरंगाबाद येथे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील साठहून अधिक कलावंत, मान्यवरांच्या मांदियाळीत संपन्न झाला. या वर्षी प्रथमच महोत्सवात स्पर्धा गटांचा समावेश करण्यात आला होता. यावेळी विविध भाषेतील ३० चित्रपटांचे प्रदर्शन करण्यात आले.

**दिवंगत अभिनेते शशी कपूर यांच्या चित्रपटांचे पोस्टर प्रदर्शन :**

पाचव्या औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दिवंगत अभिनेते शशी कपूर यांच्या चित्रपटांचे पोस्टर प्रदर्शन प्रोझोन मॉलच्या आयनॉक्स चित्रपटगृहात भरवण्यात आले होते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र औरंगाबादचे अध्यक्ष अंकुशराव कदम व महोत्सवाचे संचालक अशोक राणे यांच्या हस्ते बुधवार, दिनांक १७ जानेवारीला फीत कापून प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी दिग्दर्शक विकास देसाई, सैबल चटर्जी, ज्युरी एमी कॅटलीन (अमेरिका), नीलेश राऊत, शिव कदम, जयप्रद देसाई, सुहास तेंडुलकर, डॉ. रेखा शेळके, आयनॉक्सचे दशरथ खजिनदार, सुबोध जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रदर्शनात शशी कपूर यांच्या गाजलेल्या ४३ चित्रपटांचे पोस्टर्स, पाहण्याची संधी सिनेरसिकांना देण्यात आली. शशी कपूर यांच्या यादगार शैलीची भुरळ असलेल्या ज्येष्ठ रसिकांसाठी ही खास पर्वणी ठरली.

**तुडुंब प्रतिसादात महेश मांजरेकर, मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन :**

पाचव्या औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवास गुरुवारी, दि. १८ जानेवारी रोजी रसिकांच्या तुडुंब प्रतिसादात सुरुवात झाली. अभिनेते महेश मांजरेकर, मृणाल कुलकर्णी यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत या महोत्सवाचे उद्घाटन झाले. चार दिवस चालणाऱ्या या महोत्सवाचे प्रोझोन मॉलच्या आयनॉक्स थिएटरमध्ये दिग्दर्शक अभिनेते महेश मांजरेकर, अभिनेत्री मृणाल कुलकर्णी, उपेंद्र लिमये, स्मिता तांबे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले.

यावेळी नंदकिशोर कागलीवाल, विभागीय केंद्राचे अध्यक्ष अकुंशराव कदम, नाटककार प्रा. अजित दळवी, विकास देसाई, सैबल चटर्जी, अतनू मुखर्जी, ॲमी कॅथलिन, महापौर नंदेकुमार घोडेले, सुजाता कांगो, दिग्दर्शक अशोक राणे, शिव कदम, जयप्रद देसाई, मोहम्मद अर्शद यांची प्रमुख उपस्थिती होती. श्रद्धा जोशी यांच्या सुरेख प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. महोत्सव संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल यांनी आपल्या प्रास्ताविकातून गेल्या चार महोत्सवांचा आढावा घेतला. त्याचप्रमाणे या फेस्टिव्हलला आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे नीलेश राऊत, सुबोध जाधव, संतोष जोशी, शिवशंकर फालके यांच्यासह समिती सदस्यांचे कौतुक केले.

'चित्रपट सर्वांना आवडतो, पण चित्रपट कसा बघायचा हे सांगणारे कुणी जाणकार असेल, तर अधिक आनंद घेता येतो,' असे अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी मनोगतात म्हटले. संयोजकांनी शहरातील महाविद्यालयात घेतलेल्या चित्रपट रसग्रहण कार्यशाळांचे त्यांनी विशेष कौतुक केले. 'चित्रपट पाहण्याची काही विशिष्ट पद्धत नसते, त्याचा फक्त आनंद घ्यायचा असतो', असे मत महेश मांजरेकर यांनी व्यक्त केले. 'आंतरराष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारप्राप्त चित्रपट लोकांपर्यंत जात नसेल तर त्याच्याएवढे दुसरे दुःख नसल्या ची खंत उपेंद्र लिमये यांनी यावेळी व्यक्त केली.

महोत्सवाचे संचलन अशोक राणे यांनी महोत्सवामागील उद्देश स्पष्ट केला. 'पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारतातील पहिल्या चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन करताना म्हटले, की इंटरनॅशनल फेस्टिव्हल ही जगाकडे पाहणारी खिडकी आहे. याच खिडकीतून जगाकडे पाहण्यासाठी हा महोत्सव प्रेरणा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन नीता पानसरे यांनी केले. उद्घाटन कार्यक्रमानंतर अतनु मुखर्जी दिग्दर्शित व अभिनेता मनोज वाजपेयी यांची प्रमुख भूमिका असलेला 'रूख' हा सिनेमा दाखविण्यात आला. यावेळी रसिकांनी मोठी गर्दी केली होती.

**प्रेक्षकांच्या गर्दीत विविध भाषेतील दहा चित्रपट प्रदर्शित :**

पाचव्या औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी प्रादेशिक चित्रपटांनी प्रेक्षकांवर गारूड केले. आशयघन विषयांना संवेदनशीलपणे मांडणाऱ्या भारतीय दिग्दर्शकांचा शुक्रवारी, दि. १९ जानेवारीला बोलबाला राहिला. विविध विषयांच्या चित्रपटांचा आस्वाद घेण्यासाठी तरूणाईने गर्दी केली होती. प्रोझोनच्या आयनॉक्स चित्रपटगृहाच्या दोन स्क्रीनवर सुरू असलेल्या महोत्सवात दुसऱ्या दिवशी दहा चित्रपट दाखविण्यात आले. प्रत्येक चित्रपटानंतर दिग्दर्शक, लेखक, कलावंत आणि चित्रपट अभ्यासकांनी प्रेक्षकांशी संवाद साधला. चित्रपटाचे रसग्रहण करण्याचे विविध पैलू उलगडणारे सत्र हे यंदाच्या चित्रपट महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले.

पाथीरावलम (मल्याळी), जुनून, अलीगढ, कालीघाट (हिंदी), अनन्या (आसामी), क्षितीज, कासव, नदी वाहते (मराठी), ब्रेथ (इराणी), अ फ्यू अवर्स ऑफ स्प्रिंग (फ्रेंच) हे चित्रपट दाखविण्यात आले. हे चित्रपट बनवणारे दिग्गज अभिनेते, दिग्दर्शकांसोबत रसिकांनी सिनेमा बघण्याचा आनंद लुटला. यात हंसल मेहता, चंद्रकांत कुलकर्णी, सुमित्रा भावे, उपेंद्र लिमये, संदीप सावंत, राजकुमार तांगडे, अतनू मुखर्जी, अरूप मन्ना, सुधांशू शर्मा, अशोक राणे, यांच्यासारखे लोक प्रत्यक्ष उपस्थित होते.

थिएटरच्या आसनक्षमतेपेक्षा किती तरी मोठ्या प्रमाणात प्रेक्षक दिवसभर येत गेले. खुर्चीवर जागा मिळाली नाही, तर विंगेत, पायऱ्यांवर, जिथे जागा मिळेल तिथे बसून लोक सिनेमाचा आनंद लुटत होते. सायंकाळी राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त 'कासव' चित्रपट पाहायला प्रचंड गर्दी झाली होती. जितके लोक आत, तितकेच लोक बाहेर होते. या उदंड प्रतिसादात महोत्सवाचा दुसरा दिवस संपला.

**आशयघन चित्रपट पाहण्याची सवय लावा : हंसल मेहता :**

चित्रपट महोत्सवाच्या निमित्ताने चित्रपट पाहण्याची कला आत्मसात करता यावी, यासाठी आयोजित 'मास्टर क्लास' मध्ये प्रख्यात दिग्दर्शक हंसल मेहता यांनी सलमानच्या सिनेमासारखाच आशयघन चित्रपटांवर खर्च करा, असा सल्ला उपस्थितांना दिला. यावेळी महोत्सवाचे सूत्रधार अशोक राणे, गीतकार दासू वैद्य, दिग्दर्शक शिव कदम, रुख चित्रपटाचे दिग्दर्शक अतनु मुखर्जी आणि जयप्रद देसाई उपस्थित होते. श्री. मेहता म्हणाले, ''सलमानसारख्या कलावंतांच्या मसाला चित्रपटांवर तुम्ही आवर्जून पैसा खर्च करता. निखळ मनोरंजन करणाऱ्या चित्रपटांपेक्षा समाजात घडणाऱ्या घटनांवर भाष्य करणारे चित्रपट बनवण्याकडे माझा कल असतो. समाजातील लोकांचे जीवन सुसह्य होण्यासाठी, लोकांना जागरूक करण्यासाठी मी या माध्यमाचा वापर करतो. असे चित्रपट पाहायची सवय लागायला हवी.'' 'अलीगढ' च्या निर्मितीची कथा उलगडताना त्यांनी सांगितले, की संवेदनशीलतेमुळे माझ्या अवतीभोवती घडणाऱ्या घटना टिपता येतात. अलीगढची स्क्रिप्ट मेलच्या जकबॉक्समध्ये सापडल्याचे ते म्हणाले. फँड्री, सैराटच्य यशाचे त्यांनी कौतुक केले.

**वास्तववादी चित्रपटांनी गाजला महोत्सवाचा तिसरा दिवसः**

वयोवृद्ध वडिलांचे आजारपण आणि परदेशातील बड्या कंपनीत नोकरीची संधी यादरम्यान होणारी भावनिक घुसळण आणि वास्तववादी विचार यावर भाष्य करणाऱ्या 'पुपा', तर स्मिता पाटीलच्या अदाकारीने सजलेला 'इन सर्च ऑफ फामिनाइन' या बंगाली चित्रपटांनी औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात लक्ष वेधले, तरल चित्रभाषा अन् अगदी स्पष्ट विचार मांडणाऱ्या चित्रपटांनी तरुणाईशी संवाद साधला.

महोत्सवाचा तिसरा दिवसही दर्जेदार चित्रपटांची मेजवानी देऊन गेला. यंदाच्या चित्रपट महोत्सवात भारतीय चित्रपटांचाही समावेश करण्यात आला असल्याने भारताच्या विविध भाषांतील चित्रपट पाहण्याची संधी प्रेक्षकांना लाभली. नैसर्गिक विविधतेसोबत जाती-धर्म, सामाजिक व्यवस्थेचे वैविध्य आणि प्रत्येकात असलेल्या विविध समस्या यानिमित्त प्रेक्षकांसमोर आल्या.

प्रत्येक समाजाच्या समस्या वेगळ्या आहेत. 'कालीघाट' चित्रपटात

विहिरीला पाणी लागेल या आशेपोटी कर्ज करून आणि जमीन गहाण ठेवून शेतकरी डाव लावतो. अतिशय खंगलेला शेतकरी शेवटपर्यंत आशेवर असतो. पण तीन ठिकाणी खोदून झाल्यावरही पाणी लागत नाही. शेवटी शेतकरी आत्महत्या करतो, त्याच ठिकाणी पाणी लागते, अशी शेतकऱ्यांचे विश्व उलगडत भावनिक करून टाकणारी मध्य प्रदेशातील कहाणी मांडण्यात आली.

'पुपा' चित्रपटातून अतिशय सुखवस्तू कुटुंबाच्या समस्या मांडण्यात आल्या आहेत. अमेरिकेतील कॉर्पोरेट कंपनीत नोकरीला असलेला तरुण आईच्या मृत्यूमुळे कोलकात्यात येतो अन् आईनंतर वडीलही आजारी पडतात. वडिलांना अशा अवस्थेत सोडून मुलगा जाऊच शकत नाही. त्याची भावनिक घालमेल दिग्दर्शकाने अतिशय सूक्ष्मपणे टिपली आहे. पण वडिलांजवळ थांबण्याच्या त्याच्या अट्टहासामुळे अमेरिकेतल्या नोकरीवर पाणी सोडण्याची वेळ येते. अशावेळी वास्तववादी विचार करून त्याने निघून जावे की, भावनांना प्राधान्य देत थांबावे हे हल्लीच्या आयटी आणि कॉर्पोरेट क्षेत्रात काम करणाऱ्या तरुणांचे भावविश्व उलगडणारे वास्तव दिग्दर्शकाने सुंदर पद्धतीने मांडले आहे. चित्रपटानंतर दिग्दर्शक बिलू राकेश यांनी चित्रपटाच्या जडणघडणीचा प्रवास मांडला. प्रेक्षकांनीही विविध प्रश्न विचारत शंकांचे निरसन करून घेतले. चित्रपटांच्या रसग्रहणाविषयी मार्गदर्शन करणारी ही छोटी सत्रे औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला सर्वार्थाने परिपूर्ण करणारी ठरली.

**रसिकांनी सजग होण्याची गरज: सुमित्रा भावे :**

''आपल्या अवतीभोवती असलेले प्रश्न हे जागतिक स्वरूपाचे आहेत का, त्यावर निघालेला सिनेमा जागतिकस्तरावर पोचू शकतो का, आपण त्यांच्यासाठी रसिक म्हणून काय करतो, हे पाहणेही गरजेचे आहे. मराठी सिनेमा जागतिकस्तरावर पोचविण्यासाठी रसिकांनी सजग होणे गरजेचे आहे.'' असे मत सुवर्ण कमलप्राप्त 'कासव' सिनेमाच्या दिग्दर्शिका सुमित्रा भावे यांनी व्यक्त केले.

पाचव्या औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी शनिवार, दि. २० जानेवारी रोजी 'मराठी चित्रपट आणि जागतिक व्यासपीठ' या विषयावर त्या बोलत होत्या. यात दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, सुनील सुकथनकर, मनोज कदम, 'नदी वाहते' चे दिग्दर्शक संदीप सावंत, अशोक राणे, शिव कदम, जयप्रद देसाई यांनी सहभाग घेतला.

सुकथनकर म्हणाले, ''भारतीय प्रेक्षक आपल्या चौकटीबाहेर जातच नाही. सध्या जागतिक सिनेमे बदलले आहेत. निवडीच्या प्रक्रियाही बदलल्या आहेत. जगात केवळ ऑस्कर हाच एकमेव फेस्टिव्हल नसतो; तर बर्लिन, कॉन्स यांसह भरपूर दर्जेदार फेस्टिव्हल आहेत. आपण फक्त अमेरिकेला उच्च दर्जाचे मानतो. भारतीय निवड समितीही चमत्कारिक रीत्या व्यावसायिक सिनेमे विविध महोत्सवासाठी पाठवत असते. आज जागतिक सिनेमा बनविणाऱ्यांची संख्या वाढत आहे. यामुळेच जगात काय सुरू आहे, हे कळायला लागले आहे,'' असे ते म्हणाले.

संदीप सावंत म्हणाले की, कालपासून चित्रपट महोत्सवात मोठी तरुणाई दिसून येत आहे. तुम्ही सगळे खूप उत्साही आहात. अनेकांना चित्रपट बनवायचा आहे; पण चित्रपट बनवणे ही एक खूप संथ प्रक्रिया आहे, हे लक्षात घ्या. तरुण मुले चार चित्रपटांसाठी सहायक म्हणून काम करतात आणि आता मला चित्रपट बनवता येईल, असे म्हणत चित्रपट बनवायला घेतात. इथेच गणित फसते. दोन चित्रपट बनवतातही पण नंतर चौकटीत अडकतात.

''ज्यांच्यासाठी सिनेमा बनवलाय त्यांच्यापर्यंत तो पोचणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रेक्षकांनीही पुढे यायला हवे'', असे आवाहन कदम यांनी केले. कुलकर्णी म्हणाले, ''निर्माण झालेले मराठी सिनेमे प्रेक्षकांपर्यंत पोहोचत नाहीत. मराठीतून सिनेमा बनूच नये, यासाठी काम सुरू आहे. त्यामुळे, मराठी सिनेमांना प्राइम टाइमचा शोच देण्यात येत नाही'', असा आरोप त्यांनी केला. कार्यक्रमाला अशोक राणे, नीलेश राऊत, सुबोध जाधव, यांच्यासह महोत्सव समितीचे पदाधिकारी आणि विविध दिग्दर्शक, अभिनेते उपस्थित होते.

**महोत्सवाची सांगता :**

''गेल्या दहा वर्षात मराठी सिनेमामध्ये मोठा बदल झाला आहे. राष्ट्रीय पुरस्कारासाठी अग्रस्थानी असलेल्या मल्याळम आणि तामिळी सिनेमाची जागा आता मराठी सिनेमा घेत आहे. यामुळे भारतीय सिनेमात मराठी सिनेमा पहिल्या स्थानावर आला आहे'', असे मत दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते तथा पद्मविभूषण अदूर गोपालकृष्णन यांनी व्यक्त केले.

प्रोझोन मॉलच्या आयनॉक्स थिएटरमध्ये पाचव्या औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा समारोप आणि पारितोषिक वितरण कार्यक्रम झाला. यात श्री. गोपालकृष्णन बोलत होते. यावेळी महोत्सावाचे संचालक अशोक राणे, अभिनेता उपेंद्र लिमये, परीक्षक विकास देसाई, ॲनी कॅटलीग, अजित दळवी, सुजाता कांगो, सचिन मुळे, नंदकिशोर कागलीवाल, सतीश कागलीवाल, दासू वैद्य, रेखा शेळके, आयनॉक्सचे सिद्धार्थ मनोहर, विजय कान्हेकर, दत्ता बाळसराफ, मोहम्मद अर्शद, शिव कदम, नीलेश राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री. गोपालकृष्णन म्हणाले, ''माझ्यावर व्ही. शांताराम यांच्या 'झनक झनक पायल बाजे' या गाण्याचा पगडा होता. साठच्या दशकात मी पुण्याच्या एफटीआयला प्रवेश घेतला. या ठिकाणी मराठी मुले

दुर्मीळ होती. मराठी भाषा, नाटक, संगीत यांची महाराष्ट्रात एक मोठी परंपरा आहे. गेल्या दहा वर्षांत मराठी सिनेमांना चांगला काळ आला आहे.'' जयप्रद देसाई यांनी सूत्रसंचालन केले.

महोत्सवासाठी नाथ ग्रुपचे नंदकिशोर कागलीवाल, एमजीएमचे सचिव तथा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे विभागीय अध्यक्ष अंकुशराव कदम कोषाध्यक्ष सचिन मुळे, समन्वयक नीलेश राऊत, महोत्सव संचालक अशोक राणे, डॉ. भालचंद्र कांगो, डॉ. श्रीरंग देशपांडे, शिवदर्शन कदम, जयप्रद देसाई, संतोष जोशी, शिव फाळके, बिजली देशमुख, डॉ. मकदूम फारूकी, डॉ. जयंत शेवतेकर, प्रा. दासू वैद्य, प्रा. मुस्तजीब खान, विजय कान्हेकर, सुनील किर्दक, सुहास तेंडूलकर, डॉ. रेखा शेळके, सुबोध जाधव, डॉ. संदीप शिसोदे, डॉ. आनंद निकाळजे, किशोर निकम, साकेत भांड, अनिलकुमार साळवे, प्रिया धारूरकर, मंगेश मर्ढेकर, गणेश घुले, मंगेश निरंतर, सचिन दाभाडे, निखील भालेराव, मयुर देशपांडे, श्रीकांत देशपांडे, दिपक पवार, महेश अचिंतलवार, रेणुका कड आदींनी पुढाकार घेतला.

**पाचव्या औरंगाबाद चित्रपट महोत्सवात दिलेले मानांकन :**

| | |
|---|---|
| सर्वोत्कृष्ट सिनेमा | क्षितिज |
| उत्कृष्ट ध्वनी संयोजन | पुप्पा |
| बेस्ट एडिटींग | रुख |
| उत्कृष्ट संगीत दिग्दर्शक | साउंड ऑफ सायलेन्स |
| बेस्ट सिनेमॅटोग्राफर | रुख |
| बेस्ट स्क्रीन प्ले | क्षितिज |
| बेस्ट ॲक्ट्रेस | छाया कदम (रेडू) |
| बेस्ट ॲक्टर | राहुल बॅनर्जी (पुप्पा) |
| उत्कृष्ट दिग्दर्शक | इंद्रसिस आचार्य |
| स्पेशल मनेशन्स ज्युरी ॲवॉर्ड | वैष्णवी तांगडे (क्षितिज) |

# विभागीय केंद्र, लातूर

## कार्यवृत्त

**ज्येष्ठ नागरिक आनंद सोहळा संपन्न :**

लातूर विभागीय केंद्राच्या वतीने नांदेड येथे ज्येष्ठ नागरिक आनंद सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष सदाशिवराव पाटभल होते तर प्रमुख पाहुणे विभागीय केंद्राचे नांदेड जिल्हा संघटक मा. प्रा. श्री. उत्तम सूर्यवंशी होते. सचिव श्री. हरिभाऊ जवळगे उपस्थित होते. याप्रसंगी ज्येष्ठांसमोरील प्रश्न व त्यांच्या गत काळातील आठवणींना उजाळा देण्यात आला. या प्रसंगी काही ज्येष्ठ बंधू भगिनींचा सत्कार करण्यात आला.

**नरक चतुर्दशी साजरी :**

लातूर विभागीय केंद्र आणि अंधश्रद्धा निर्मूलन समिती लातूरच्या संयुक्त विद्यमाने दीपावली निमित्त प्रभातफेरी काढून फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचा व प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्याचा संदेश अंनिसचे महाराष्ट्र राज्य प्रधान सचिव श्री. माधव बावगे यांनी दिला. याप्रसंगी विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जे. एम. वाघमारे, ॲड. मनोहरराव गोमारे, सचिव हरिभाऊ जवळगे व अंनिसचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

**गुरूनानक जयंती :**

विभागीय केंद्राच्या वतीने लालबहादूर शास्त्री सभागृह नांदेड येथे गुरूनानक जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. मद्देवाड होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. रावसाहेब जाधव, प्रा. श्री. अमोल काळे होते. या कार्यक्रमातून मानवता धर्माचा संदेश देण्यात आला.

**यशवंतराव चव्हाण स्मृतिदिन :**

विभागीय केंद्राच्या वतीने भालचंद्र ब्लड बँक सभागृह लातूर येथे स्व. यशवंतराव चव्हाण यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. जे. एम. वाघमारे, प्रमुख वक्ते व मार्गदर्शक अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्री. श्रीपाद सबनीस साहेब उपस्थित होते. त्यांनी 'यशवंतराव चव्हाण आणि आजचा महाराष्ट्र' या विषयावर व्याख्यान दिले. याप्रसंगी विभागीय केंद्राचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी तर सूत्रसंचालन श्री. विवेक सौताडेकर यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा. डॉ नागोराव कुंभार यांनी केले.

**शेतीकट्टा :**

कै. बाबुराव पाटील महाविद्यालय हिंगोली येथे शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ''आजच्या शेतकऱ्यासमोरील आव्हाने'' हा शेतीकट्टा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जयवंत भोयार, प्रमुख वक्ते डॉ. जे. एम. वाघमारे हे होते. या शेतीकट्ट्यास अनेक शेतकऱ्यांची उपस्थिती दिसून आली.

**जुन्या वर्षास निरोप व नवीन वर्षाचे स्वागत :** सरत्या वर्षास निरोप देताना युवक पिढीने निर्व्यसनी राहणे, खर्चाचे नियोजन करणे, जातीयता नष्ट करणे, सलोख्याचे व बंधुभावाचे वातावरणनिर्माण करणे गरजेचे आहे असे विचार विभागीय केंद्राच्या वतीने अध्यक्ष मा. डॉ. जे. एम. वाघमारे यांनी व्यक्त केले.

**आजच्या तरुणासमोरील आव्हाने :**

मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या ७७व्या वाढदिवसानिमित्त आखाडा बाळापूर ता. कळमनुरी जि. हिंगोली येथे वरील कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य उत्तम सूर्यवंशी तर प्रमुख वक्ते म्हणून विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. डॉ. जे. एम. वाघमारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव हरिभाऊ जवळगे यांनी केले. आजच्या तरुणासमोरील आव्हाने या विषयावर मार्गदर्शन करताना तरुण पिढीने निर्व्यसनी राहून आजच्या आधुनिक युगाला सामोरे जाताना जिद्दीने, मेहनतीने आव्हानावर मात केली पाहिजे, असे उद्गार प्रा. दत्ता सूर्यवंशी यांनी काढले. कार्यक्रमाचे शेवटी आभार ॲड. मनोहरराव गोमारे यांनी मानले.

**क्रांतिदिन :**

टाउन हॉल लातूर हुतात्मा स्मारक येथे विभागीय केंद्राच्या वतीने हुतात्मा पावलेल्या/बलिदान केलेल्या मानवास अभिवादन करून क्रांतिदिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी मागच्या महामानवाचा आजच्या तरुणाने आदर्श जोपासावा असे विचार व्यक्त करण्यात आले.

**राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती :** विभागीय केंद्राच्या

वतीने राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. डॉ. जे. एम. वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. शाम आगळे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी ॲड. मनोहरराव गोमारे, सचिव हरिभाऊ जवळगे, श्री. विवेक सौताडेकर हे उपस्थित होते.

**शिक्षण कट्टा – सद्यस्थितीत गरीबांच्या शिक्षणाचे काय? :**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय तुळजापूर येथे वरील विषयावर कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. माजी आमदार श्री. नरेंद्र बोरगावकर साहेब होते; तर प्रमुख पाहुणे मा. डॉ. जे. एम. वाघमारे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव हरिभाऊ जवळगे यांनी केले. सद्यस्थितीत महागाई वाढल्यामुळे गरीबांना शिक्षण घेणे दुरापास्त झाले आहे याकडे श्री. गोमारे यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख यांनी तर आभार श्री. काटे जे. एच. (सहशिक्षक नवजीवन विद्यालय मंगरूळ) यांनी मानले.

**सचिव हरिभाऊ जवळगे यांचा सत्कार व गुणगौरव :**

भारतीय प्रजासत्ताक दिनी सर्वधर्मीय परिषद व भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या वतीने विवेकानंद चौक लातूर येथे विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे यांचा सत्कार करण्यात आला. मानवता हाच माझा धर्म आहे, शालेय जीवनापासून सत्कार मिळत गेले परंतु माझ्या हृदयाला स्पर्श करणारा हा सत्कार वाटला, असे उद्गार सत्कारमूर्ती श्री. हरिभाऊ जवळगे यांनी काढले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. तेजाब शेख गुरूजी होते. प्रमुख पाहुणे रामभाऊ गुरव, अमोल भोसले, विवेक चिंचोले, गणपत तेलंग इ. उपस्थित होते.

विभागीय केंद्रच्या वतीने दि. ३० जानेवारी २०१८ रोजी राष्ट्रपती म. गांधी यांना त्यांच्या पुण्यतिथी अभिवादन करण्यात आले.

**‘कर्जबाजारीपणा, निराशा आणि त्यातून शेतकऱ्यांच्या आत्महत्या असं एक चक्र महाराष्ट्रात गेल्या काही दिवसात दिसतं आहे. अलिकडच्या काळातील आपल्यावरचा हा सर्वात मोठा कलंक आहे. शेतकरीवर्गाला आत्महत्त्येच्या मार्गाने जावं लागतं, याचा अर्थ हा व्यवसाय परवडणारा राहिलेला नाही. पण त्याच्यासमोर दुसरा पर्यायही नाही. आपल्या लोकसंख्येचा ५५ टक्के बोजा शेतीवर अवलंबून आहे. तो कमी करून अन्य क्षेत्रात वळवल्याशिवाय ज्यांची कुटुंब शेतीवर अवलंबून आहेत त्यांना दिलासा मिळणार नाही. अन्य व्यवसायातून दोन पैसे कमावण्याची संधी मिळाल्याशिवाय त्यांची शेती किफायतशीर होणार नाही. शेतकरी कुटुंबातील नव्या पिढीने यासाठीच शेतीवरचा भार कमी करून अन्य क्षेत्रात गेलं पाहिजे. अन्य पर्याय शोधल्याखेरीज गरीबीचे, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत.’**

**– मा. शरद पवार**

# विभागीय केंद्र, अहमदनगर

## कार्यवृत्त

### शेतीकट्टा

**दि. ०७ सप्टेंबर २०१७**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–विभागीय केंद्र अहमदनगर अंतर्गत ऊस व कांदा उत्पादन तंत्रज्ञान या शेती कट्ट्याचे आयोजन खेड, ता. कर्जत येथे करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री. नारायण निबे, विषय विशेषज्ञ, कृषि विद्या विभाग कृषि विज्ञान केंद्र, दहिगावणे व डॉ. पतींग साबळे, सहाय्यक प्राध्यापक, उद्यानविद्या विभाग, कृषि महा. सोनई हे उपस्थित होते. या प्रसंगी तंज्ञ मार्गदर्शकांनी ऊस व कांदा उत्पादनासाठी योग्य बियाणे निवड, हंगामाची निवड, खते व पाणी व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण, काढणीची वेळ तसेच कमी कालावधीत कमी खर्चात अधिक उत्पादन या विषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

या प्रसंगी श्री. भाऊसाहेब मोरे, श्री. विजय साळुंके, प्रा. योगेश जाधव, प्रा. डॉ. पतींग साबळे, प्रा. राजेंद्र लिपणे व खेड, ता. कर्जत परिसरातील प्रगतिशील ऊस बागायतदार शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

हा शेतीकटटा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य व श्री. मुकुल मोरे (एम एस्सी ॲग्री. कृषि अर्थशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, लातूर विद्यार्थी ), श्री. विजय साळुंके ( बी. एस्सी ॲग्री. कृषि महाविद्यालय, सोनई माजी विद्यार्थी ), व खेड ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

**१२ आक्टोंबर २०१७, कोपरगांव**

विभागीय केंद्र अहमदनगर अंतर्गत गहू व हरबरा उत्पादन तंत्रज्ञान या शेती कट्ट्याचे आयोजन मार्केट यार्ड, कोपरगांव येथे कोपरगांव व राहता तालुक्यासाठी संयुक्तरित्या करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून म. फु. कृ. वि, राहुरी येथील कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. कल्याण देवळाणकर उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. देवळाणकर यांनी गहू व हरबरा उत्पादनासाठी योग्य जातींचे बियाणे निवड, खते व पाणी व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण, काढणीची वेळ तसेच कमी कालावधीत कमी खर्चात अधिक उत्पादन या विषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

या प्रसंगी श्री. अंबादास आढाव, श्री. मनोज सोनवणे (तालुका कृषि अधिकारी, कोपरगांव), श्रीमती रंजनाताई आढाव ( सेंद्रीय शेती, शेतकरी), कृषि महाविद्यालय सोनईचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, प्रा. योगेश जाधव, प्रा. डॉ. पतींग साबळे, प्रा. राजेंद्र लिपणे व श्री. छत्रपती शिवाजी राजे गटाचे शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य व श्री. अंबादास आढाव प्रगतिशिल शेतकरी कोपरगांव यांचे विशेष सहकार्य लाभले.

**दि. १५.११.२०१७, निंबोडी ता. पाथर्डी**

विभागीय केंद्र अहमदनगर अंतर्गत डाळींब उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर शेती कट्ट्याचे आयोजन निबोडी, ता. पाथर्डी येथे करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री. ए. व्ही. अत्तार (वरिष्ठ संशोधक सहाय्यक, उद्यानविद्या विभाग म. फु. कृ. वि., राहुरी हे उपस्थित होते. या प्रसंगी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी डाळींब फळाचे महत्त्व, रोपांची निवड, पाणी व्यवस्थापन, रोग व कीड नियंत्रण, फळाची प्रतवारी, विक्री व बहार व्यवस्थापन या विषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

या प्रसंगी श्री. चंद्रभान पाटील म्हस्के, डॉ. हरी मोरे प्राचार्य कृषि महा. सोनई, श्री दत्तात्रय खाटीक केमिस्ट, मुळा सह. सा. का. सोनई, श्री. असराजी पाटील घुले व परिसरातील प्रगतिशील डाळींब बागायतदार शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र अहमदनगरचे सर्व सन्माननिय सदस्य व कु. मयुरी म्हस्के ( विद्यर्थिनी, कृषि महा. सोनई ), तसेच श्री. अशोक पाटील म्हस्के, श्री. सुभाष पाटील म्हस्के व ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राजेंद लिपणे कृषि महा. सोनई व प्रास्ताविक डॉ. हरी मोरे प्राचार्य कृषि महा. सोनई तर आभार प्रदर्शन डॉ. पतींग साबळे कृषि महा. सोनई यांनी केले.

**दि. २१.१२.२०१७, प्रवरा संगम ता. नेवासा :**

विभागीय केंद्र, अहमदनगर अंतर्गत ऊस उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर शेती कट्ट्याचे आयोजन प्रवरासंगम ता. नेवासा येथे करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ. कल्याण देवळाणकर, प्रभारी अधिकारी कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, म. फु. कृ. वि., राहुरी हे उपस्थित होते. या प्रसंगी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी उसामध्ये आंतर पीक लागवड, उसाचे वेगवेगळे वाण, वाणांचा उतारा, ऊसाचे उत्पादन, पाणी व्यवस्थापन, लागवड व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन, आंतर मशागत आणि तण व्यवस्थापन या विषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

या प्रसंगी श्री. राजेंद्र पाटील डावखर, श्री. जगन्नाथ पाटील कोरडे, श्री. राहुल कोळसे प्रतिनिधी एस ९ मेडीया नेवासा, श्री. संजय परभणे, डॉ. हरी मोरे प्राचार्य कृषि महा. सोनई, प्रा. योगेश जाधव, डॉ. पतींग साबळे, व परिसरातील प्रगतिशील ऊस बागायतदार शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–विभागीय केंद्र, अहमदनगर चे सर्व सन्माननीय सदस्य व श्री. महेंद्र पाटील काळे, व ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरी मोरे प्राचार्य कृषि महा. सोनई तर सूत्रसंचालन प्रा. राजेंद लिपणे कृषि महा. सोनई यांनी केले.

**दि. ०९.०१.२०१८, सुपेकरवाडी, ता. कर्जत**

विभागीय केंद्र अहमदनगर अंतर्गत कलिंगड व कांदा उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर शेती कट्ट्याचे आयोजन सुपेकरवाडी ता. कर्जत येथे करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ. पतींग साबळे, सहाय्यक प्राध्यापक, उद्यानविद्या विभाग, कृषि महाविद्यालय, सोनई व श्री. जितेंद्र महाजन सीड सप्लायर्स बायर कंपनी जळगांव हे उपस्थित होते. या प्रसंगी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी कांदा व कलिंगड पीक लागवड, पाणी व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन, आंतर मशागत आणि तण व्यवस्थापन, खत व्यवस्थापन, पिकाची साठवण व प्रतवारी या विषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

या प्रसंगी डॉ. हरी मोरे प्राचार्य कृषि महा. सोनई, प्रा. योगेश जाधव, श्री. उध्दव जाधव, किरण गाढे (८ वे सत्र विद्यार्थी, कृषि महा. सोनई) व परिसरातील प्रगतिशील कांदा व कलिंगड बागायतदार शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य, श्री. किरण गाढे (८ वे सत्र विद्यार्थी, कृषि महा. सोनई) व ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरी मोरे प्राचार्य कृषि महा. सोनई तर सूत्रसंचालन प्रा. राजेंद लिपणे कृषि महा. सोनई यांनी केले.

**दि. २१.०२.२०१८, मोरया चिंचोरे, ता. नेवासा :**

विभागीय केंद्र अहमदनगर अंतर्गत कृषि निविष्टांचे काटेकोर नियोजन या विषयावर शेती कट्ट्याचे आयोजन मोरया चिंचोरे, ता. नेवासा येथे करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ. हरी मोरे, प्राचार्य कृषि महाविद्यालय, सोनई व श्री. बाळासाहेब सोनवणे पंचायत समिती सदस्य, घोडेगांव ता. नेवासा हे उपस्थित होते. या प्रसंगी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी शेतीसाठी आवश्यक निविष्ठा कोणत्या, त्या कशा मिळवायच्या तसेच त्यांचा उपयोग शेतीमध्ये कशा पध्दतीने करुन घ्यायचा व या निविष्टांचे शेती व्यवसायात नियोजन कसे करावयाचे या विषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

या प्रसंगी प्रा. सोमनाथ दरंदले, डॉ. गणेश खळेकर, डॉ. पतींग साबळे, प्रा. संदीप तांबे तसेच श्री. बाबासाहेब दराडे, प्रा. प्रियदर्शनी जाधव व बागायतदार शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–विभगीय केंद्र अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य, श्री. बाबासाहेब दराडे, मोरया चिंचोरे व ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. संदीप तांबे, कृषि महा. सोनई यांनी केले.

# विभागीय केंद्र, सोलापूर

## कार्यवृत्त

६ ऑक्टोंबर २०१७ रोजी नवमहाराष्ट्र युवा अभियान व विभागीय केंद्र सोलापूर यांच्या संयुक्त विध्यमाने आणि प्रयोग मालाड यांच्या सहकार्याने लघुपट निर्मिती कार्यशाळेचे आयोजन डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात करण्यात आले होते. सदर कार्यशाळेस १०० युवांनी सहभाग नोंदवला होता, चित्रपट दिग्दर्शक अशोक राणे आणि महेंद्र तेरे देसाई यांनी चित्रपट निर्मितीच्या विविध अंगांचा प्रवास कसा असतो तसेच पटकथेला अनुसरून निर्मिती आणि त्यासाठी लागणारे तंत्र याचे विस्तृत मार्गदर्शन युवांना केले. यासाठी काही चित्रपट देखील दाखवण्यात आले सदर चित्रपट दाखवताना दिग्दर्शकाने अभिनय व तंत्राच्या दृष्टीने कोणता विचार केला असावा याची सखोल माहिती देखील देण्यात आले. सदरच्या कार्यशाळेत संवाद देखील झाला आणि सहभागी युवांनी ज्यांनी प्रामुख्याने लघुपट बनवले त्यांना नवीन लघुपट निर्मिती साठी उपयुक्त माहिती यानिमित्ताने मिळाली. सहभागी युवांना सहभाग प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले

लघुपट निर्मित कार्यशाळेचे उद्घाटन विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष राजशेखर शिवदारे सदस्य धर्माण्णा सादूल,दत्ता गायकवाड व सचिव दिनेश शिंदे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे शिवाजी शेंडगे,आनंद कोलारकर आणि त्यांच्या सहकार्याने हि कार्यशाळा संपन्न करण्यासाठी परिश्रम घेतले.

२५ नोव्हेंबर २०१७ रोजी स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जयंती निमित्त सातरस्ता येथील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास विभागीय केंद्राचे सदस्य युन्नुसभाई शेख, धर्माण्णा सादूल,राजशेखर शिवदारे,दिनेश शिंदे, आनंद कोलारकर यांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.

याच दिवशी वालचंद कला व शास्त्र महाविध्यालय येथे प्रा.शिवाजीराव साळुंके यांचे यशवंतराव चावण आणि महाराष्ट्र याविषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रा.शिवाजीराव साळुंके यांनी यशवंतराव चव्हान साहेबांचे महाराष्ट्र घडवण्यासाठी असलेले योगदान तसेच शिक्षण,सहकार,कला साहित्य आणि संस्कृती यासाठी त्यांची धोरणे काय होती तसेच समाजाच्या प्रत्येक घटकाचा खोलवर विचार करून त्यांच्यासाठी आखलेले धोरण आणि एकुणच चव्हाण साहेबांची नितीमुल्य यावर विस्तृत विचार मांडले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविध्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत चव्हाण यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार विभागीय केंद्राचे सदस्य दत्ता गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमास समाजशास्त्र,राज्यशास्त्र,या विभागाचे विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते.

१३ डिसेंबर २०१७ रोजी साहित्यिक आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत संमेलनाध्यक्ष प्रा.फ.मु.शिंदे यांचा विध्यार्थ्यांशी मुक्त संवाद दयानंद कला महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आला होता. साहित्याची निर्मिती सजगता मांडणी त्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन या विषयावर प्रा.फ.मु.शिंदे यांनी मार्गदर्शन केले, त्याचबरोबर मुक्त संवाद झाला विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न आणि शंका विषयास अनुसरून विचारले हा कार्यक्रम विभागीय केंद्र आणि दयानंद महाविध्यालय मराठी विभाग यांचा संयुक्त विध्यमाने संपन्न झाला.प्रारंभी मराठी विभागाचे प्रमुख प्रा.राजशेखर शिंदे यांनी स्वागत केले. प्राचार्य विजयकुमार उबाळे यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका मांडली विभागीय केंद्राचे सदस्य दत्ता गायकवाड यांच्या हस्ते प्र.फ.मु.शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी मराठी विभागाचे विध्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते.

# विभागीय केंद्र, ठाणे

## कार्यवृत्त

महिला सक्षमीकरण्याच्या हेतूने कतृत्ववान महिलांचे मार्गदर्शन सर्वसामान्य महिलांना मिळावे, या दृष्टीने गुरूवार दिनांक २५ जानेवारी २०१८ रोजी सकाळी ११ वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान ठाणे जिल्हा केंद्रातर्फे 'विचारकुंकू' या एका अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान ठाणे जिल्हा केंद्राचे सचिव श्री. अमोल नाले यांनी प्रास्ताविक केले.त्यानंतर केंद्राचे अध्यक्ष श्री. मुरलीधर नाले, सचिव श्री अमोल नाले आणि मा.खासदार सौ. सुप्रियाताई सुळे यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला आणि लगेच मा.खासदार सौ. सुप्रियाताई सुळे यांची प्रकट मुलाखत सी. एच. एम. महाविद्यालयाचे मराठी भाषा विभागाचे प्रमुख प्रा. नीतिन आरेकर यांनी घेण्यास सुरुवात केली.प्रा.आरेकरसरांनी मा. खासदार सौ. सुप्रियाताई सुळे यांना त्यांच्या लहानपणापासूनचा जीवनप्रवास. राजकीय तसेच सामाजिक प्रवास त्यांची शिक्षणविषयक भूमिका तसेच त्यांचे घरगुती जीवनमान आवडीनिवडी. रॅपीडफायर अशा अनेक विषयांवर खमंग चर्चात्मक प्रश्नोत्तरे झाली आणि तेवढ्याच दिलखुलासपणे ताईंनी त्याची उत्तरे दिली. उपस्थित पत्रकारांमधून तसेच प्रेक्षकांमधून राजकीय तसेच महाराष्ट्र राज्यातील व देशातील परिस्थितीसंदर्भात विचारलेल्या प्रश्नांची समर्पक आणि योग्य उत्तरे देऊन उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर मा. खासदार सौ. सुळे यांच्या हस्ते सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या प्राचार्य सौ.पद्मा देशमुख, सौ. उषा मजिठिया, सौ. भारती मोरे, सौ. रूपा देसाई-जगताप आणि श्रीमती कांताबाई विचारे या पाच महिलांचा सत्कार करण्यात आला.त्यानंतर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान ठाणे जिल्हा केंद्राचे सचिव श्री. अमोल नाले यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले व राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान ठाणे जिल्हा केंद्राचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

**महिलांसाठीच्या आरक्षणाचा-अन्य कित्येकांप्रमाणेच मीही एक खंदा पुरस्कर्ता आहे. परंतु, आरक्षणाचं असं धोरण ही निव्वळ एक प्रतिमात्मक कृती आहे, हे लक्षात घेतलं पाहिजे. खरी गरज आहे ती, या समाजघटकांच्या निर्णयप्रक्रियेतील सहभागाबाबत हमी देणाऱ्या निखळ, ठोस आणि जोमदार प्रयत्नांची. महिला असोत वा समाजातील मागास गटसमूह, प्रयत्नांचा सारा भर सर्वसमावेशक आणि समाजातील या उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यावरच असायला हवा. जन्माने, शिक्षणामुळे किंवा आर्थिक स्थैर्यामुळे विशेष लाभार्थी असलेल्या आपल्यासारख्यांनी यासंदर्भात खरोखरच सखोल, भरीव आत्मचिंतन करण्याची गरज आहे.**

**- मा. शरद पवार**

# विभागीय केंद्र, देवराष्ट्रे

## कार्यवृत्त

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांचा ३३ वा स्मृतिदिन 'देवराष्ट्रे' या त्यांच्या जन्मगावी विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवरांनी त्यांच्या या जन्मगावी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले.

यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मघरी कडेगाव, तहसील-कडेगाव व नाशिकचे ॲड. मयूर जाधव यांच्या हस्ते तसेच समाजकल्याणचे अधिकारी राधाकिशन देवदे, जिल्हा परिषदेचे समाजकल्याणचे सभापती ब्रम्हानंद पडळकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-केंद्र देवराष्ट्रे यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नाशिकचे ॲड मयूर जाधव यांना निमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन यशवंतराव चव्हाण हायस्कूल मध्ये करण्यात आले होते. यावेळी जाधव यांनी चव्हाण साहेब संरक्षणमंत्री असतानाचे विविध प्रसंग सांगितले. भारत-चीन युद्ध असो, किंवा भारत-पाकिस्तान युद्ध असो विविध ठिकाणचे वेगवेगळे प्रसंग त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी 'देव कोठे आहे' ही कविता सादर केली. त्यावेळी सर्व लोक भावुक झाले.

या कार्यक्रमाच्यावेळी प्रशासनाच्या वतीने कडेगावच्या तहसीलदार सौ.अर्चना शेटे, क्रांती कारखान्याचे संचालक भीमराव महिद, सोनहिरा कारखान्याचे संचालक पोपटराव महिद, माजी सभापती सौ. शोभाताई होनमाने, बी.के.शिंदे सर, देवराष्ट्रे गावचे सरपंच प्रकाश मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

**'जीनियस येती घरी' :**

दि. २९ जानेवारी २०१८ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या वतीने देवराष्ट्रे मध्ये 'जीनियस येती घरी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. दीपा देशमुख लाभल्या होत्या.

वैज्ञानिक, तंत्रज्ञ, गणित तज्ज्ञ, अर्थशास्त्र तज्ज्ञ, कलाकार, साहित्यिक या सगळ्यांनी आपलं आयुष्य समृद्ध केलं आहे. विज्ञान आणि गणित या दोन विषयावर तर आपल्या आयुष्याची संपूर्ण इमारत उभी आहे, त्यामुळे वैज्ञानिक आणि गणित तज्ज्ञांच्या आपण कायम ऋणात राहायला पाहिजे. अशा वैज्ञानिकामध्ये गॅलिलिओ, न्यूटन, आईनस्टाइन, स्टीफन हॉकिंग, रॉबट कॉख, लुई पाश्चर, एडवर्ड जेन्नर, अलेक्झांडर फ्लेमिंगो, लिझ माइटनर, मेरी क्युरी, रिचर्ड फाईनमन, रामानुजन, जगदीशचंद्र बोस, विश्वेश्वरय्या, स्वामिनाथन, होमी भाभा यांचं योगदान खूप खूप मोठं आहे.

गॅलिलिओनं पृथ्वी सूर्याभावती फिरते हे सत्य सांगितल्यामुळे त्यांना तर छळाला सामोरं जावं लागलं. न्यूटननं गुरुत्वाकर्षण आणि गतीचे नियम शोधले पण त्याच बरोबर तो त्याच्या विक्षिप्त पणाबद्दल प्रसिद्ध होता. एकदा आईनस्टाइन आणि चार्ली चाप्लीन भेटले असता, आईनस्टाइन हे चार्ली चाप्लीन यांना म्हणाले की, 'तू काहीही बोलत नाहीस, तरीही तू एवढा लोकप्रिय कसा आहेस?' त्यावर चार्ली चाप्लीन आईनस्टाइन यांना म्हणाला की, 'तू एवढा बोलतोस आणि सापेक्षतावाद मांडतोस, त्यातलं लोकांना काहीही समजत नाही, तरी सुद्धा तू लोकप्रिय आहेसच की!'

कॉलरा, टायफॉईड, मलेरिया, प्लेग यासारख्या अनेक रोगांवर संशोधन करणारा आणि पाश्वराइझेशन आणि पिसाळलेल्या कुत्र्यांमुळे होणाऱ्या 'रेबीज' रोगावर लस शोधणारा लुई पाश्चर, देवी सारखा महाभयंकर रोग जगातून हुसकून लावणारा एडवर्ड जेन्नर, तसेच ॲंटीबायोटीकचा शोध लावून लाखो लोकांचे प्राण वाचवणारा अलेक्झांडर फ्लेमिंगो, नोबेल परितोषकास सोळा वेळा नामाकंन होऊनही केवळ स्त्री असल्यामुळे नोबेल पारितोषक दिले जात नाही, त्या लीज माईटनर, जगाला अचंबित करणारा भारतीय गणिततज्ञ रामानुजन, वनस्पती सजीव असतात हे सिद्ध करण्यासाठी प्रयत्नांची पराकष्ठा करणारे जगदीशचंद्र बोस!

शेती, शिक्षण, उद्योग, पाणी प्रश्न, तसेच इंजीनियरींग क्षेत्रातील सगळे प्रश्न सहजपणे हाताळणारे विश्वेश्वरय्या, भारताला अणुउर्जेच्या साह्याने स्वयंपूर्ण बनवण्याचं स्वप्न पाहणारे होमी भाभा, भारतीय कृषीक्रांतीचे जनक आणि शेतकऱ्यांना न्याय आणि हमीभाव मिळण्यासाठी सतत प्रयत्न करणारे स्वमिनाथन अशा सगळ्या जीनियस मंडळींचे आपण नेहमी ऋणी आहोत. त्यांचे आपण काहीतरी देणे लागतो या दृष्टिकोनातून आपण जगाकडे पाहिले पाहिजे.

बरे, त्या वेळेस प्रजेची तरी खाऊन पिऊन सरकारी कर देण्याजोगी स्थिति होती काय? मुळींच बोलावयास नको. तिची जी काही दशा होती, ती सांगतां पुरवत नाही. गरीब बिचारे शुद्र लोकांस रात्रंदिवस भर उन्हाळ्यांत, पावसाळ्यांत आणि हिवाळ्यांत एकसारखे शेतांत कष्ट करावे लागत असत. त्यांचे अंगास जाडेभरडे वस्त्र किंवा पोटास जाडेभरडे अन्नदेखील मिळण्याची मोठी मारामार पडत असे. डोक्यास पहावे तर फाटकी जीर्ण अशी वीस किंवा पंचवीस हात लांबीची चिंधी, जिला पागोटे म्हणण्यास मोठी लाज वाटते. अंगावर सर्व उन्हाळा-पावसाळाभर फाटलेली एखादी खरबरीत घोंगडी, पायांत पांचसात ठिकाणी सांधलेला, वरून दोरीचे तुकड्याने बांधलेला फाटका जोडा, तोहि अगदी जेव्हा भर उन्हाळा असेल तेव्हांच घालावयाचा आणि तो संपला म्हणजे दुसरे वर्षाचे उन्हाळ्यास तसाच जतन करून ठेवावा. बाकी सर्व वर्षभर पायास जोडा म्हणून मुळींच माहीत नाही. फार काय सांगावे, नेसण्याकरिता हात-सव्वाहात लांबीचें फडकेदेखील मिळण्याची भ्रांत. बाजारांतून एखादी दमडी टोलीची वस्तू आणणे झाल्यास ती आणण्याकरिता त्याचेच एक बाजूस अथवा पागोट्यात बांधावी, परंतु ती आणण्यासाठी दुसरे वस्त्रदेखील मिळू नये ही त्यांचे खुद्द पोशाखाची संक्षिप्त हकीकत झाली.

- मा. महात्मा जोतीराव फुले



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई,

विभागीय केंद्र-पुणे चे कार्याध्यक्ष

**मा. लक्ष्मीकांत देशमुख** यांची

९१ व्या

बडोदे येथील अखिल भारतीय मराठी

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल

# हार्दिक अभिनंदन..

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या

कार्यकारिणी मंडळाचे सदस्य आणि

विभागीय केंद्र-अहमदनगर चे अध्यक्ष

**मा. यशवंतराव गडाख** यांना

अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त

# हार्दिक शुभेच्छा..



# यशवंतराव चव्हाण राज्य पारितोषिक पुरस्कारप्राप्त मान्यवर

| सन | पारितोषिक विजेता | पारितोषिक |
|---|---|---|
| १९९० | मा. तात्यासाहेब कोरे | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९१ | मा. बाबा आढाव | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| १९९२ | मा. विजय बोराडे | ग्रामीण विकास पारितोषिक |
| १९९३ | मा. नारायण सुर्वे | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| १९९४ | मा. आप्पासाहेब चमणकर | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९६ | श्रीमती शांताबाई दाणी | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| १९९६ | मा. अरूण निकम | ग्रामीण विकास पारितोषिक |
| १९९७ | मा. शंकरराव खरात | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| १९९८ | डॉ. जयंतराव पाटील | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९९ | मा. दादासाहेब रुपवते | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| २००० | सर्च-शोधग्राम, गडचिरोली | ग्रामीण विकास पारितोषिक |
| २००१ | कवयित्री शांता शेळके | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| २००२ | 'प्रयोग' परिवार | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| २००३ | डॉ. यु. म. पठाण | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| २००४ | डॉ. चित्रा नाईक | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास |
| २००५ | पं. भीमसेन जोशी | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २००६ | श्री. भंवरलाल जैन | कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्था प्रशासन पारितोषिक |
| २००७ | श्री. अनिल काकोडकर | सामाजिक एकात्मता विज्ञान-तंत्रज्ञान पारितोषिक |
| २००८ | प्राचार्या लीला पाटील | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास |
| २००९ | श्रीमती किशोरी आमोणकर | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१० | श्री. सा. रे. पाटील | कृषी-औद्योगिक समाजरचना/ व्यवस्था प्रशासन पारितोषिक |
| २०११ | मराठी विज्ञान परिषद, मुंबई | सामाजिक एकात्मता विज्ञान-तंत्रज्ञान पारितोषिक |
| २०१२ | मातृमंदिर, देवरुख, रत्नागिरी | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास |
| २०१३ | मा. श्री. गोविंदराव तळवलकर | मराठी साहित्य संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१४ | मा. श्री. शरद जोशी | कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्था प्रशासन |
| २०१५ | श्रीमती अरुनिमा सिन्हा | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१६ | श्री. प्रतापशेठ साळुंखे | ग्रामीण विकास/आर्थिक सामाजिक विकास |
| २०१७ | श्री. भुजंगराव कुलकर्णी | कृषि औद्योगिक समाज रचना/व्यवस्थापन प्रशासन |

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त मान्यवर

| अ. नं. | वर्ष | पुरस्कार प्राप्त मान्यवराचे नाव |
|---|---|---|
| १ | १९९५ | प्राध्यापक मधु दंडवते |
| २ | १९९६ | श्री. बियांत सिंग- मरणोत्तर |
| ३ | १९९७ | डॉ. सी. सुब्रमण्यम् |
| ४ | १९९८ | श्रीमती इला भट |
| ५ | १९९९ | श्रीमती आवाबाई वाडिया |
| ६ | २००० | श्री. सुंदरलाल बहुगुणा |
| ७ | २००१ | डॉ. व्ही. कुरियन |
| ८ | २००२ | डॉ. जयंत नारळीकर |
| ९ | २००३ | श्री. आर. के. लक्ष्मण |
| १० | २००४ | न्या. व्ही.आर. कृष्णा अय्यर |
| ११ | २००५ | श्री. सॅम पित्रोदा |
| १२ | २००६ | श्री. नारायण मूर्ती व सौ. सुधा मूर्ती |
| १३ | २००७ | श्री. आर. के पचौरी व श्रीमती सरोज पचौरी |
| १४ | २००८ | इस्रो - (इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन) |
| १५ | २००९ | प्रो. यश पाल |
| १६ | २०१० | श्रीमती महाश्वेता देवी |
| १७ | २०११ | एअर चीफ मार्शल श्री. अर्जुनसिंग |
| १८ | २०१२ | डॉ. ई. श्रीधरन |
| १९ | २०१३ | श्री. झुबिन मेहता |
| २० | २०१४ | श्री. रतन टाटा |
| २१ | २०१५ | डॉ. विजय केळकर |
| २२ | २०१६ | श्री. नंदन निलेकणी |
| २३ | २०१७ | डॉ. एम. एम. शर्मा |

# प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे : भाग १ – संकलन : डॉ व्ही जी खोबरेकर | २५०.०० |
| २. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस – विधिमंडळ – भाग २ – संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट – वाय. बी. चव्हाण – खंड १ ते ४ संपादक : राम प्रधान प्रत्येकी | २५०.०० |
| ४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन – ना. धों. महानोर | १.०० |
| ५. | सह्याद्री वारे – यशवंतराव चव्हाण | २५०.०० |
| ६. | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन – प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास – संपादक – वि. स. पागे | ३५.०० |
| ८. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन – संपादन : अण्णासाहेब शिंदे | २००.०० |
| ९. | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन – शरदराव पवार – भाषणसंग्रह – संपादन : दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास संपादन : पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा – संपादन : पी. बी. पाटील | |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास संशोधक / लेखक – लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल – डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण – चरित्र – लेखक – अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य – संपादन : राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी) | |
| | (यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाउंटीफुल बनियान – डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र – खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा – (काव्यसंग्रह) लेखक : ना. धों. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | 'ई'बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य / फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन – डॉ. वसंत काळपांडे | २००.०० |
| २३. | हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०.०० |

| | | |
|---|---|---|
| २४. | उपक्रम : वेचक–वेधक – डॉ. वसंत काळपांडे | १००.०० |
| २५. | स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले – श्रीनिवास भालेराव | २०.०० |
| २६. | स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना – सुप्रिया सुळे | २०.०० |
| २७. | ‘संवादिनी’ – सुप्रिया सुळे | २०.०० |
| २८. | ‘शाळांचे प्रगतिपुस्तक’ डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |
| २९. | Yashwantrao Chavhan : an Autobiography | ३९५.०० |
| ३०. | यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र – कृष्णाकाठ | ३००.०० |
| ३१. | यशवंतराव चव्हाण व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व | ५००.०० |
| ३२. | शिक्षणवृत्ती – डॉ. कुमुद बन्सल | २००.०० |
| ३३. | शिक्षणकट्टा – बसंती रॉय | २००.०० |
| ३४. | वाटचाल ई–शिक्षणाची – बसंती रॉय | २००.०० |
| ३५. | हवामान बदलास आमचे उत्तर | १००.०० |
| ३६. | विचारसूत्रे – संपादन : पद्मभूषण देशपांडे | २००.०० |
| ३७. | पाणीबाणी – प्रभाकर साळेगावकर | १६०.०० |
| ३८. | पर्व–प्रगतीचे परिवर्तनाचे – पद्मभूषण देशपांडे (मराठीबरोबरच हिंदी, इंग्रजी, ऊर्दूतही उपलब्ध) | खाजगी वितरणासाठी |
| ३९. | Whats App चर्चा– शिक्षण विकासाच्या – संपादक : माधव सुर्यवंशी, नितीन खंडागळे, किशोर भागवत | |

- डीव्हीडी व ऑडीओ कॅसेट्स
- मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- पु. ल. वृत्तान्त : पु. ल. देशपांडे यांचा जीवनपट
- वरील चारही व्हिडिओ कॅसेट्सची निर्मिती दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांची
- कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शक – श्री. राम गबाले
- येस आय ॲम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शक : विनय नेवाळकर

- 'बशर नवाज : ख्वाब, जिंदगी और मै' माहितीपट, दिग्दर्शक – जयप्रद देसाई
- 'जागर हा जाणिवांचा....' लघुपट, दिग्दर्शक – चंद्रकांत कुलकर्णी
- 'कृष्णाकांठ' : ऑडीओ सी. डी. (ध्वनिमुद्रिका)

**चित्रपट**

- यशवंतराव चव्हाण... बखर एका वादळाची : दिग्दर्शक – जब्बार पटेल

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई निर्मित संकेतस्थळे**

- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे संकेतस्थळ – http://ybchavanpratishthan.org/
- यशवंतराव चव्हाण यांचे समग्र संदर्भ साहित्य – http://ybchavan.in
- धर्मानंद कोसंबी यांचे समग्र साहित्य – http://dharmanandkosambi.com/
- केतकरकृत महाराष्ट्रीय ज्ञानकोश – http://ketkardnyankosh.com/
- महर्षि विठ्ठल रामजी शिंदे समग्र साहित्य – http://virashinde.com/
- इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाकडे उपलब्ध दुर्मीळ कागदपत्रांचे डिजिटायझेशन – http://vkrajwade.com

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई,
पुणे फिल्म फाऊंडेशन
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित.

# ८ वा यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०१८

Yashwantrao Chavan Pratishthan Mumbai

Pune Film Foundation

Yashwant International Film Festival













यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

**नवमहाराष्ट्र युवा अभियान**

# यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार

## वितरण सोहळा - २०१७

- सोमवार, १५ जानेवारी २०१८
- कल्चरल सेंटर, सिंहगड इन्स्टिट्यूट कॅम्पस, सिंहगड रोड, वडगाव, पुणे





आकाश चिकटे (भारतीय हॉकीपटू) विशेष युवा क्रीडा पुरस्कार



किशोरी शिंदे
युवा क्रीडा पुरस्कार



शेख मोहम्मद नुबैरशाह सलीमशाह
युवा क्रीडा पुरस्कार



कृपाली बिडये
युवा सामाजिक पुरस्कार



सतीश शिडाम
युवा सामाजिक पुरस्कार



